| (३) महाराष्ट्र छात्र सेना .. | 5987 | 15887 |
| **एकूण (अ) स्थूल ..** | **617135** | **779204** |
| वजा — वसुली .. | 0 | 0 |
| **एकूण (अ) निव्वळ ..** | **617135** | **779204** |
| **(ब) उद्दिष्टवार वर्गीकरण—** | | |
| **१. राष्ट्रीय छात्र सेना—** | | |
| ०१ वेतन .. | 395463 | 490500 |
| १३ कार्यालयीन खर्च .. | 8849 | 9500 |
| २१ सामग्री व पुरवठा .. | 46797 | 70000 |
| इतर उद्दिष्टांवरील खर्च .. | 29624 | 33030 |
| **एकूण १ ..** | **480733** | **603030** |
| **२. बालवीर व वीरबाला—** | | |
| साहाय्यक अनुदाने .. | 130415 | 160287 |
| **एकूण २ ..** | **130415** | **160287** |
| **३ महाराष्ट्र छात्र सेना** .. | 5987 | 15887 |
| **एकूण ३ ..** | **5987** | **15887** |
| **एकूण (ब) स्थूल ..** | **617135** | **779204** |
| वजा — वसुली .. | 0 | 0 |
| **एकूण (ब) निव्वळ ..** | **617135** | **779204** |

## (ii) Financial Requirements

TABLE IV

(रुपये हजारात / Rs. in thousands)

| सुधारित अंदाज Revised Estimates for 2022-2023 | अर्थसंकल्पीय अंदाज Budget Estimates for 2023-2024 | | Classification |
|---|---|---|---|
| 4 | 5 | | 1 |
| | | **(A)** | **Activity Classification–** |
| | | | **Youth Welfare–** |
| 694794 | 685084 | | (1) National Cadet Corps. |
| 142395 | 175642 | | (2) Scouting and Guiding |
| 5885 | 7903 | | (3) Maharashtra Cadet Corps. |
| **843074** | **868629** | .. | **(A) Gross Total** |
| 0 | 0 | .. | Deduct–Recoveries |
| **843074** | **868629** | .. | **(A) Net Total** |
| | | **(B)** | **Objectwise Classification–** |
| | | | **1. National Cadet Corps.–** |
| 490500 | 539550 | | 01 Salaries |
| 3990 | 9975 | | 13 Office Expenses |
| 158527 | 90000 | | 21 Material and Supplies |
| 41777 | 45559 | | Expenditure on other objects |
| **694794** | **685084** | .. | **Total 1** |
| | | | **2. Scouting and Guiding–** |
| 142395 | 175642 | | Grant-in-aid |
| **142395** | **175642** | .. | **Total 2** |
| 5885 | 7903 | | **3. Maharashtra Cadet Corps.–** |
| **5885** | **7903** | .. | **Total 3** |
| **843074** | **868629** | .. | **(B) Gross Total** |
| 0 | 0 | .. | Deduct–Recoveries |
| **843074** | **868629** | .. | **(B) Net Total** |

**जोडपत्र क - पाच**

**विभाग : शालेय शिक्षण**

**विवरणपत्र दोन**

**अर्थसंकल्पीय अंदाज २०२३-२०२४ मधील (अर्थसाहाय्याव्यतिरिक्त) साहाय्यक अनुदान**

(रुपये हजारात)

| अनुक्रमांक | प्रधान/गौण/उपशीर्ष (अर्थसंकल्पीय अंदाज भाग दोनमधील पृष्ठ क्रमांक) | योजनेचे नाव | अर्थसंकल्पीय अंदाज एकूण | ठळक वैशिष्ट्ये |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | २२०२ सर्वसाधारण शिक्षण— ० २<br>माध्यमिक शिक्षण–००१, संचालन व प्रशासन | | | (१) – |
| | ००१ (००) (०१) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ. | साहाय्यक अनुदान | -- | (२) शासन निर्णय, माशाअ-२००९/(५९९/०९)/माशि-१, दिनांक १५ नोव्हेंबर २०११ अन्वये विनाअनुदान तत्त्वावर असणाऱ्या प्राथमिक व माध्यमिक शाळांच्या (इंग्रजी माध्यमाच्या शाळा वगळून) करिता सुधारित मूल्यांकन निकष निश्चित करण्याचा व सुधारित निकषानुसार पात्र ठरलेल्या शाळांना सन २०१२-१३ पासून अनुदान लागू करण्याकरिता अनुदान सूत्र लागू करण्याचा निर्णय शासनाने मंत्रिमंडळाच्या मान्यतेने घेतला आहे. त्यानुसार शाळा ज्या वर्षी मूल्यांकनात पात्र ठरतील त्या वर्षापासून २० टक्के, त्यापुढील वर्षी अनुक्रमे ४० टक्के, ६० टक्के, ८० टक्के व १०० टक्के या प्रमाणात अनुदान अनुज्ञेय करण्याचे सूत्र लागू राहणार होते. शासन निर्णय, माशामु-२०१६/प्र. क्र. १८/एसमए-४, दिनांक १९ सप्टेंबर २०१६ अन्वये ''विनाअनुदान'' व ''कायम विनाअनुदान'' तत्त्वावर परवानगी दिलेल्या व मूल्यांकनात पात्र घोषित करण्यात आलेल्या प्राथमिक व माध्यमिक शाळांना (इंग्रजी माध्यमाच्या शाळा वगळून) सुधारित मूल्यांकन निकष निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार मूल्यांकनात पात्र ठरलेल्या शाळांना शासनाच्या पुढील आदेशापर्यंत सरसकट २० टक्के या प्रमाणात अनुदान अनुज्ञेय करण्याचे सूत्र लागू राहणार आहे. वेतनेतर अनुदान शासन वेळोवेळी जे धोरण निर्धारित करते आणि ज्याप्रमाणे निधी उपलब्ध होतो, त्यानुसार अदा करण्यात येते. |
| २ | ११० अशासकीय माध्यमिक शाळांना व कनिष्ठ महाविद्यालयांना सहाय्य. | साहाय्यक अनुदान | | |
| | (००) (०१) सर्वसाधारण माध्यमिक शाळांना साहाय्यक अनुदान आणि | | -- | |
| | (००) (०२) इतर खर्च (जिल्हा परिषदांना अभिकरण आकार) | | -- | |
| | (००) (०३) पूर्वाध्यायन सैनिकी शाळांना साहाय्यक अनुदान | | -- | |
| | पंचवार्षिक योजनांतर्गत योजना— | | | |
| | (००) (०९) सैनिकी शाळांना साहाय्यक अनुदान | | -- | |
| | (८) सर्वसाधारण माध्यमिक शाळांच्या विकासासाठी साहाय्यक अनुदान. | | | |
| | अनुसूचित जातींसाठी विशेष घटक योजना | | -- | |
| ३ | ११० अशासकीय माध्यमिक शाळांना व कनिष्ठ महाविद्यालयांना सहाय्य-- | | -- | |
| | (००) (०४) अशासकीय कनिष्ठ महाविद्यालयांना साहाय्यक अनुदान आणि पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-- | | -- | |
| | (०७) अशासकीय कनिष्ठ महाविद्यालयांना साहाय्यक अनुदाने | | -- | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | ८० सर्वसाधारण--- | | | |
| | ००३ प्रशिक्षण– | | | |
| | (०१) (०१) शिक्षक प्रशिक्षण | साहाय्यक अनुदान | -- | -- |
| | | **एकूण ..** | **--** | |

## विवरणपत्र तीन

## अर्थसंकल्पीय अंदाज २०२३-२०२४ मधील (सुस्पष्ट अर्थसाहाय्य आणि साहाय्यक अनुदानाव्यतिरिक्त) अप्रकट अर्थसाहाय्यांचा तपशील

(रुपये हजारात)

| अनुक्रमांक | प्रधान / गौण / उपशीर्ष (अर्थसंकल्पीय अंदाज भाग दोनमधील पृष्ठ क्रमांक) | योजनेचे नाव | परिमाणावरील अभिप्राय | परिगणित अर्थसाहाय्य एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | २२०२ सर्वसाधारण शिक्षण– | | | |
| | ८० सर्वसाधारण– | | | |
| | ००३ प्रशिक्षण– | | | |
| | (०१) (०१) शिक्षक प्रशिक्षण | प्रशिक्षण | – | -- |
| | पंचवार्षिक योजनांतर्गत योजना– | | | -- |
| | (०१) (०३) शिक्षक प्रशिक्षण | | | -- |
| २ | ८० सर्वसाधारण– | शिष्यवृत्त्या | वरीलप्रमाणे | -- |
| | १०७ शिष्यवृत्त्या– | | | |
| | (००) (०१) सैनिकी शाळा व महाविद्यालये | | – | -- |
| | (००) (०२) इतर विशेष शाळा | | – | -- |
| | (००) (०७) आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्ती. | | – | -- |
| ३ | ०२ माध्यमिक शिक्षण | | | |
| | १०७ शिष्यवृत्त्या– | | | |
| | (०१) (०१) माध्यमिक शाळांमधील शिष्यवृत्त्या | शिष्यवृत्त्या | वरीलप्रमाणे | -- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | ०२ माध्यमिक शिक्षण– | | -- | -- |
| | १०९ शासकीय माध्यमिक शाळा | | | |
| | (००) (०१) मुलांसाठी व मुलींसाठी शासकीय माध्यमिक शाळा. | शासकीय माध्यमिक शाळांची स्थापना. | | -- |
| ५ | ८०, सर्वसाधारण– | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | -- |
| | ८००. इतर खर्च– | | | |
| | (२) ते (४२) | | | |
| | पंचवार्षिक योजनांतर्गत योजना– | | | |
| | (०२) (०८) प्राथमिक शिक्षकांच्या मुलांना द्यावयाच्या मोफत शिक्षणाचे जादा संच. | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | -- |
| | (०२) (११) ज्यांचे किंवा ज्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. १५,००० पेक्षा जास्त नाही अशा विद्यार्थ्यांना (मुलांना) फी माफी. | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | --<br>-- |
| | (०२) (२०) माजी सैनिकांच्या मुलांना शैक्षणिक सवलती | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | -- |
| | (०२) (२१) इयत्ता बारावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या मुलींना मोफत शिक्षण. | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | -- |
| | | | एकूण .. | -- |
| | | | खर्च .. | -- |
| | | | (–) जमा .. | -- |
| | | | निव्वळ अप्रकट अर्थसहाय्य .. | -- |

* विवरणपत्र दोनमध्ये दर्शविलेली आहे.

**जोडपत्र ड--चार**

**विभाग : शालेय शिक्षण**

**विवरणपत्र दोन**

**अर्थसंकल्पीय अंदाज २०२३-२०२४ मधील (अर्थसाहाय्याव्यतिरिक्त) साहाय्यक अनुदान**

(रुपये हजारात)

| अनुक्रमांक | प्रधान/गौण/उपशीर्ष (अर्थसंकल्पीय अंदाज भाग दोनमधील पृष्ठ क्रमांक) | योजनेचे नाव | अर्थसंकल्पीय अंदाज एकूण | ठळक वैशिष्ट्ये |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | २२३५ सामाजिक सुरक्षा व कल्याण— | | | |
| | ०२ समाजकल्याण— | साहाय्यक अनुदान | -- | १०० टक्के केंद्र पुरस्कृत योजना. |
| | १०४ (००) (०१) वृद्ध, अपंग व निराधारांचे कल्याण<br>१०४ अपंगांकरिता एकत्रीकृत शिक्षण<br>(केंद्र पुरस्कृत योजना) | | | |
| | | एकूण .. | -- | |

## वैधानिक विकास मंडळनिहाय खर्चाची विगतवारी (योजनेतर योजना)

शासन परिपत्रक क्रमांक वित्त विभाग संकीर्ण-२०१४/प्र.क्र. ४/अर्थ-१, दिनांक २७ जानेवारी २०१४

**२२०२ -- सर्वसाधारण शिक्षण** (रुपये हजारांत)

| अ. क्र. | लेखाशीर्ष व योजनेचे नाव | प्रत्यक्ष खर्च २०२१-२२ योजनेतर योजना | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | मराठवाडा | विदर्भ | उर्वरित महाराष्ट्र | अविभाजित | एकूण |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | २२०२ सर्वसाधारण शिक्षण-- ०२ माध्यमिक शिक्षण ००१ संचालन व प्रशासन ००१ (००) (०१) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ (२२०२०२६२). | ५९१० | ७१०१ | २६००३ | ० | ३९०१४ |
| २ | १०१ (००) (०१) माध्यमिक शाळांचे निरीक्षण (२२०२०२७१). | ९०३०० | १३४६६८ | २७८६५३ | ० | ५०३६२१ |
| ३ | ०२ माध्यमिक शिक्षण- १०७ शिष्यवृत्त्या (०१) (०१) माध्यमिक शाळांमधील शिष्यवृत्त्या (०१) ग्रामीण भागातील हुशार विद्यार्थ्यांना राष्ट्रीय शिष्यवृत्ती (२२०२०३४२). | ० | ० | ८५० | ० | ८५० |
| ४ | ०२ माध्यमिक शिक्षण-- १०७ शिष्यवृत्त्या (०१) (०१) माध्यमिक शाळांमधील शिष्यवृत्त्या (०२) खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती (२२०२०३५१) | १ | ० | ८४९९ | ० | ८५०० |
| ५ | ०२ माध्यमिक शिक्षण-- १०७ शिष्यवृत्त्या (०२) (०१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कलम १८२ अन्वये जिल्हा परिषदांना सप्रयोजन अनुदाने (२२०२२३१८). | ० | ० | ६३७५० | ० | ६३७५० |
| ६ | ०२ माध्यमिक शिक्षण-- १०७ शिष्यवृत्त्या (०३) (०१) कनिष्ठ महाविद्यालयातील शिष्यवृत्त्या (२२०२०३७१). | ० | ० | १९७२ | ० | १९७२ |
| ७ | ०२ माध्यमिक शिक्षण-- १०७ शिष्यवृत्त्या (०१) माध्यमिक शाळांमधील (०३) शिष्यवृत्त्या (०३) (०२) प्रज्ञावंत विद्यार्थ्यांना साहाय्य (२२०२०३८९) | ० | ० | १२७५ | ० | १२७५ |
| ८ | ०२ माध्यमिक शिक्षण-- १०९ शासकीय माध्यमिक शाळा (००) (०१) मुलांसाठी व मुलींसाठी शासकीय माध्यमिक शाळा (२२०२०४२२). | २४६४८ | ३९६१० | २८८९७ | ० | ९३१५५ |

## वैधानिक विकास मंडळनिहाय खर्चाची विगतवारी (योजनेतर योजना)--चालू

शासन परिपत्रक क्रमांक वित्त विभाग संकीर्ण-२०१४/प्र.क्र. ४/अर्थ-१, दिनांक २७ जानेवारी २०१४

**२२०२ -- सर्वसाधारण शिक्षण** (रुपये हजारांत)

| अ. क्र. | लेखाशीर्ष व योजनेचे नाव | प्रत्यक्ष खर्च २०२१-२२ | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | योजनेतर योजना | | | | |
| | | मराठवाडा | विदर्भ | उर्वरित महाराष्ट्र | अविभाजित | एकूण |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| ९ | ०२ माध्यमिक शिक्षण-- ११० अशासकीय माध्यमिक शाळांना साहाय्य (००) (०१) सर्वसाधारण माध्यमिक शाळांना साहाय्यक अनुदाने (२२०२०४४२). | ३४४७०६६५ | ४३१३२४२३ | ११८३६४३०६ | ० | १९५९६७३९४ |
| १० | ०२ माध्यमिक शिक्षण-- ११० अशासकीय माध्यमिक शाळांना साहाय्य (००) (०२) इतर खर्च (जिल्हा परिषदांना अभिकरण आकार) (२२०२०४५१). | ० | ० | ० | ० | ० |
| ११ | ०२ माध्यमिक शिक्षण-- ११० अशासकीय माध्यमिक शाळांना साहाय्य (००) (०३) पूर्वाध्यायन सैनिक शाळांना साहाय्यक अनुदान (२२०२०४६९). | २४१५९९ | ३४२१५५ | ४३०९४१ | ० | १०१४६९५ |
| १२ | ०२ माध्यमिक शिक्षण-- ११० अशासकीय कनिष्ठ महाविद्यालयांना साहाय्य (००) (०४) अशासकीय कनिष्ठ महाविद्यालयांना साहाय्यक अनुदाने (२२०२०४७८). | ७४२८८६० | ६९९०२८१ | १९३१७७३६ | ० | ३३७३६८७७ |
| १३ | ०२ माध्यमिक शिक्षण-- १९१ माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षणा-साठी स्थानिक संस्थांना साहाय्य. (००) (०१) भूतपूर्व शासकीय माध्यमिक शाळांकरिता महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कलम १८२ अन्वये जिल्हा परिषदांना सप्रयोजन अनुदाने (२२०२०५३१). | २५४४२८९ | ५६९६०३ | ६६४७० | ० | ३१८०३६२ |
| १४ | ०२ माध्यमिक शिक्षण-- १९१ माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षणा-साठी स्थानिक संस्थांना साहाय्य. (००) (०२) भूतपूर्व कनिष्ठ महाविद्यालयांसाठी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कलम १८२ अन्वये जिल्हा परिषदांना सप्रयोजन अनुदाने (२२०२०५४९). | ११३६७ | ११७१५६ | २८४८१ | ० | १५७००४ |
| १५ | ०२ माध्यमिक शिक्षण-- १९१ माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षणा-साठी इतर स्थानिक संस्थांना साहाय्य. १९१ (००) (०३) माध्यमिक शिक्षणाकरिता इतर स्थानिक संस्थांना अनुदाने (२२०२०५५८). | ९४७२४ | २९३४४२० | २००९३५२ | ० | ५०३८४९६ |

## वैधानिक विकास मंडळनिहाय खर्चाची विगतवारी (योजनेतर योजना)--चालू

शासन परिपत्रक क्रमांक वित्त विभाग संकीर्ण-२०१४/प्र.क्र. ४/अर्थ-१, दिनांक २७ जानेवारी २०१४

**२२०२ -- सर्वसाधारण शिक्षण** (रुपये हजारांत)

| अ. क्र. | लेखाशीर्ष व योजनेचे नाव | प्रत्यक्ष खर्च २०२१-२२ | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | योजनेतर योजना | | | | |
| | | मराठवाडा | विदर्भ | उर्वरित महाराष्ट्र | अविभाजित | एकूण |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १६ | ०२ माध्यमिक शिक्षण-- १९१ (००) (०४) इतर खर्च (जिल्हा परिषदांना अभिकरण आकार) (२२०२०५६७). | ० | ० | ० | ० | ० |
| १७ | ०२ माध्यमिक शिक्षण-- १९१ (००) (०५) कनिष्ठ महाविद्यालयांसाठी इतर स्थानिक संस्थांना साहाय्यक अनुदाने (२२०२०५७६). | ० | १०८६७२ | १०१६०७ | ० | २१०२७९ |
| १८ | ०२ माध्यमिक शिक्षण-- ११० अशासकीय माध्यमिक शाळांना साहाय्य (००) (१३) माध्यमिक शाळेतील पुस्तकपेढी (२२०२३६७३). | ० | ० | ० | ० | ० |
| १९ | ०२ माध्यमिक शिक्षण-- ८०० इतर खर्च सर्वसाधारण (००) (०१) व्यवसाय मार्गदर्शन व माहिती केंद्र (२२०२०६५६). | ० | ० | ० | ० | ० |
| २० | ०२ माध्यमिक शिक्षण-- ११० अशासकीय माध्यमिक शाळांना साहाय्य (००) (०१) सर्वसाधारण माध्यमिक शाळांना साहाय्यक अनुदाने (भारित) (२२०२२४९९). | ० | १२४ | ० | ० | १२४ |
| २१ | ०२ माध्यमिक शिक्षण-- ८०० इतर खर्च (००) (०३) अशासकीय विशेष संस्थांना साहाय्य (२२०२०६७४). | ० | ० | ० | ० | ० |
| | **०२--माध्यमिक** | **४४९१२३६३** | **५४३७६२१३** | **१४०७२७९४२** | **०** | **२४००१६५१८** |
| २२ | ०५ भाषा विकास-- १०२ आधुनिक भारतीय भाषा आणि साहित्य यांना प्रोत्साहन. (००) (०१) हिंदी शिक्षक सनद वर्ग (२२०२१०५३). | ० | ० | ० | ० | ० |
| २३ | ०५ भाषा विकास-- १०३ संस्कृत शिक्षण (००) (०१) माध्यमिक शाळांमधील भारत सरकारची शिष्यवृत्ती (२२०२१०६२). | ० | ४३ | ० | ० | ४३ |

## वैधानिक विकास मंडळनिहाय खर्चाची विगतवारी (योजनेतर योजना)--चालू

शासन परिपत्रक क्रमांक वित्त विभाग संकीर्ण-२०१४/प्र.क्र. ४/अर्थ-१, दिनांक २७ जानेवारी २०१४

**२२०२ -- सर्वसाधारण शिक्षण** (रुपये हजारांत)

| अ. क्र. | लेखाशीर्ष व योजनेचे नाव | प्रत्यक्ष खर्च २०२१-२२ | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | योजनेतर योजना | | | | |
| | | मराठवाडा | विदर्भ | उर्वरित महाराष्ट्र | अविभाजित | एकूण |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| २४ | ०५ भाषा विकास--<br>१०३ संस्कृत शिक्षण<br>(००) (०२) पाठशाळा व संस्कृत विकासाकरिता अनुदाने (२२०२१०७१). | ० | ० | ० | ० | ० |
| | **०५--भाषा** | **०** | **४३** | **०** | **०** | **४३** |
| २५ | ८० सर्वसाधारण--<br>००१ संचालन व प्रशासन<br>(००) (०१) शिक्षण संचालक (२२०२१०९१). | ११४४०० | २२८०११ | ३१४६८२ | ० | ६५७०९३ |
| २६ | ८० सर्वसाधारण--<br>००३ प्रशिक्षण<br>(०१) (०१) शिक्षकांचे प्रशिक्षण (२२०२१११५). | २०९७७ | २०७७७ | १०१५३५ | ० | १४३२८९ |
| २७ | ८० सर्वसाधारण--<br>(०३) (०१) शैक्षणिक तंत्रशास्त्रविषयक कक्ष (२२०२११५१). | ० | ० | ० | ० | ० |
| २८ | ८० सर्वसाधारण--<br>१०७ शिष्यवृत्त्या<br>(००) (०१) सैनिकी शाळा व महाविद्यालये (२२०२११९८). | ० | ० | ७०७ | ० | ७०७ |
| २९ | ८० सर्वसाधारण--<br>१०७ शिष्यवृत्त्या<br>(००) (०२) इतर विशेष शाळा (२२०२१२०४). | ६४ | ६ | ११० | ० | १८० |
| ३० | ८० सर्वसाधारण--<br>१०७ शिष्यवृत्त्या<br>(००) (०७) आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्ती. (२२०२१२५१). | ० | ० | १४०९ | ० | १४०९ |
| ३१ | ८० सर्वसाधारण--<br>१०८ परीक्षा<br>(००) (०१) शासकीय परीक्षा मंडळ. (२२०२१३११). | ० | ० | १७११४ | ० | १७११४ |

## वैधानिक विकास मंडळनिहाय खर्चाची विगतवारी (योजनेतर योजना)--चालू

शासन परिपत्रक क्रमांक वित्त विभाग संकीर्ण-२०१४/प्र.क्र. ४/अर्थ-१, दिनांक २७ जानेवारी २०१४

**२२०२ -- सर्वसाधारण शिक्षण** (रुपये हजारांत)

| अ. क्र. | लेखाशीर्ष व योजनेचे नाव | प्रत्यक्ष खर्च २०२१-२२ | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | योजनेतर योजना | | | | |
| | | मराठवाडा | विदर्भ | उर्वरित महाराष्ट्र | अविभाजित | एकूण |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| ३२ | ८० सर्वसाधारण--<br>८०० इतर खर्च<br>(०१) (०१) शासकीय शिशु केंद्र<br>(२२०२१३३१). | ० | ० | ४६१७ | ० | ४६१७ |
| ३३ | ८० सर्वसाधारण--<br>८०० इतर खर्च<br>(०२) (०१) आदर्श शिक्षकांना पुरस्कार (भारित)<br>(२२०२१३७६). | ० | ० | ० | ० | ० |
| ३४ | ८० सर्वसाधारण--<br>८०० इतर खर्च<br>(०२) (०१) आदर्श शिक्षकांना पुरस्कार (दत्तमत)<br>(२२०२२२९२). | ० | ० | ३०० | ० | ३०० |
| ३५ | ८० सर्वसाधारण--<br>८०० इतर खर्च<br>(०२) (०३) आदर्श शिक्षिका पुरस्कार<br>(२२०२०२८८२). | ० | ० | ० | ० | ० |
| ३६ | ८० सर्वसाधारण--<br>८०० इतर खर्च<br>(०२) (०६) प्राथमिक शिक्षकांच्या मुलांना मोफत शिक्षण (२२०२१४२९). | ५९५ | ३५७ | ९७० | ० | १९२२ |
| ३७ | ८० सर्वसाधारण--<br>८०० इतर खर्च<br>(०२) (०७) इतर खर्च<br>( जिल्हा परिषदांना अभिकरण आकार )<br>(२२०२१४३८). | ७ | ११ | १६ | ० | ३४ |
| ३८ | ८० सर्वसाधारण--<br>(०२) (१२) इतर खर्च<br>( जिल्हा परिषदांना अभिकरण आकार )<br>(२२०२१४८३). | ११० | ४९ | २२१ | ० | ३८० |
| ३९ | ८० सर्वसाधारण--<br>(०२) (१६) इतर खर्च<br>( जिल्हा परिषदांना अभिकरण आकार )<br>(२२०२१५१८). | ० | ० | ९ | ० | ९ |

## वैधानिक विकास मंडळनिहाय खर्चाची विगतवारी (योजनेतर योजना)--चालू

शासन परिपत्रक क्रमांक वित्त विभाग संकीर्ण-२०१४/प्र.क्र. ४/अर्थ-१, दिनांक २७ जानेवारी २०१४

**२२०२ -- सर्वसाधारण शिक्षण** (रुपये हजारांत)

| अ. क्र. | लेखाशीर्ष व योजनेचे नाव | प्रत्यक्ष खर्च २०२१-२२ योजनेतर योजना | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | मराठवाडा | विदर्भ | उर्वरित महाराष्ट्र | अविभाजित | एकूण |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| ४० | ८० सर्वसाधारण-- (०२) (१८) शिक्षणशास्त्र पदविका पाठ्यक्रमाकरिता मुलींना मोफत शिक्षण (२२०२२९४४). | ० | ० | ० | ० | ० |
| ४१ | ८० सर्वसाधारण-- (०२) (४२) माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, तसेच शिक्षणशास्त्र पदविका विद्यालयातील अध्यापकांच्या/ कर्मचारीवर्गाच्या मुलांना मोफत शिक्षण (२२०२२९२६). | ० | ० | ० | ० | ० |
| ४२ | ८० सर्वसाधारण-- ८०० इतर खर्च (०२) (११) ज्यांचे किंवा ज्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रुपये १५,००० पेक्षा अधिक नाही, अशा इयत्ता १० वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना फी माफी (२२०२१४७४). | ७५२ | ९९९ | २०१६ | ० | ३७६७ |
| ४३ | ८० सर्वसाधारण-- ८०० इतर खर्च (०२) (१७) इयत्ता १२ वी पर्यंत शिक्षण घेणाऱ्या मुलींना मोफत शिक्षण (२२०२२५२३). | १५९६ | २१७० | ९२५१ | ० | १३०१७ |
| ४४ | ८० सर्वसाधारण-- (०२) (२२) शिक्षक प्रतिष्ठानास अंशदान (२२०२०२२६५). | ० | ० | ० | ० | ० |
| ४५ | ८० सर्वसाधारण-- ८०० इतर खर्च (०२) (४४) इयत्ता १० वी पर्यंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण (२२०२३०५६). | ० | ० | ० | ० | ० |
| ४६ | ८० सर्वसाधारण-- (०२) (१५) माजी सैनिकांच्या मुलांना शैक्षणिक सवलत (२२०२१५०९). | ४८ | ७ | ६८ | ० | १२३ |
| ४७ | ८० सर्वसाधारण-- ८०० इतर खर्च (०३) (०१) शाळा न्यायाधिकरणे (२२०२१६१६). | १२०१३ | १५९५५ | २६४६६ | ० | ५४४३४ |
| ४८ | ८० सर्वसाधारण-- ८०० इतर खर्च (०२) (४६) आदिवासी क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरी-साठी शिक्षकांना राज्य पुरस्कार (२२०२३६८२). | ० | ० | ० | ० | ० |

## वैधानिक विकास मंडळनिहाय खर्चाची विगतवारी (योजनेतर योजना)--चालू

शासन परिपत्रक क्रमांक वित्त विभाग संकीर्ण-२०१४/प्र.क्र. ४/अर्थ-१, दिनांक २७ जानेवारी २०१४

**२२०२ -- सर्वसाधारण शिक्षण** (रुपये हजारांत)

| अ. क्र. | लेखाशीर्ष व योजनेचे नाव | प्रत्यक्ष खर्च २०२१-२२ | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | योजनेतर योजना | | | | |
| | | मराठवाडा | विदर्भ | उर्वरित महाराष्ट्र | अविभाजित | एकूण |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| ४९ | ८० सर्वसाधारण--<br>८०० इतर खर्च<br>(०४) (०१) अवर्षणग्रस्त खेड्यातील विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफी / प्रतिपूर्ती (२२०२२५८८). | ० | ० | ४६७५ | ० | ४६७५ |
| ५० | ८० सर्वसाधारण--<br>८०० इतर खर्च<br>(०२) (०४) इतर खर्च<br>( जिल्हा परिषदांना अभिकरण आकार )<br>(२२०२१४०२). | ० | ० | ० | ० | ० |
| | **८०--सर्वसाधारण--** | **१५०५६२** | **२६८३४२** | **४८४१६६** | **०** | **९०३०७०** |
| | **एकूण सर्वसाधारण शिक्षण** | **४५०६२९२५** | **५४६४४५९८** | **१४१२१२१०८** | **०** | **२४०९१९६३१** |
| | **२२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण ०२, समाजकल्याण** | | | | | |
| ५१ | ६० इतर सामाजिक सुरक्षा व कल्याण--<br>१०४ ठेव संलग्न विमा योजनेबद्दल प्रदाने<br>(००) (०१) ठेव संलग्न विमा योजना-<br>शासकीय भविष्य निर्वाहनिधी<br>(२२३५०४८१). | ११३ | १३८ | ३४९ | ० | ६०० |
| ५२ | ६० इतर सामाजिक सुरक्षा व कल्याण--<br>१०४ ठेव संलग्न विमा योजनेबद्दल प्रदान<br>(००) (०२) ठेव संलग्न विमा योजना-<br>अनुदानित अशासकीय माध्यमिक शाळा आणि त्यांना संलग्न असलेल्या कनिष्ठ महाविद्यालयातील कर्मचारी<br>(२२३५०४९२). | २५०९ | ३०८० | ७७९० | ० | १३३७९ |
| ५३ | ६० इतर सामाजिक सुरक्षा व कल्याण--<br>१०४ ठेव संलग्न विमा योजनेबद्दल प्रदान<br>(००) (०२) वृद्ध, अपंग आणि निराधारांचे कल्याण - अपंगांकरिता एकत्रिकृत शिक्षण<br>(२२३५२९७६). | ४०४९ | ४९७३ | १२५७१ | ० | २१५९३ |
| ५४ | ६० इतर सामाजिक सुरक्षा व कल्याण--<br>१०४ ठेव संलग्न विमा योजनेबद्दल प्रदान.<br>(००) (०४) अनुदानित अशासकीय प्राथमिक शाळांतील कर्मचारी (२२३५ए२२२). | १६९ | २०७ | ५२४ | ० | ९०० |

## वैधानिक विकास मंडळनिहाय खर्चाची विगतवारी (योजनेतर योजना)--चालू

शासन परिपत्रक क्रमांक वित्त विभाग संकीर्ण-२०१४/प्र.क्र. ४/अर्थ-१, दिनांक २७ जानेवारी २०१४

**२२०२ -- सर्वसाधारण शिक्षण** (रुपये हजारांत)

| अ. क्र. | लेखाशीर्ष व योजनेचे नाव | प्रत्यक्ष खर्च २०२१-२२ योजनेतर योजना | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | मराठवाडा | विदर्भ | उर्वरित महाराष्ट्र | अविभाजित | एकूण |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| ५५ | २२२५ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण-- (००) (०२) जनजाती बोलीभाषा पुस्तकांची निर्मिती (२२२५००८३). | १०७ | १३१ | ३३२ | ० | ५७० |
| ५६ | २२०५ कला व संस्कृती-- १०२ कला व संस्कृती यांचे प्रचालन (०२) (०१) उल्लेखनीय पुस्तकांना बक्षिसे (२२०५०१०८). | ० | ० | ० | ० | ० |
| | **एकूण (इतर लेखाशीर्षे)** | **६९४७** | **८५२९** | **२१५६६** | **०** | **३७०४२** |
| ५७ | ७६१० शासकीय कर्मचाऱ्यांना कर्जे | ० | ० | ० | ० | ० |
| ५८ | २२०४ क्रीडा व युवक सेवा-- (०२) (०३) महाराष्ट्र छात्रसेना (२२०४१३१७). | ११३० | १३८८ | ३५०९ | ० | ६०२७ |
| | **भारीत - २०४९ व्याज प्रदाने** | | | | | |
| ५९ | २०४९ व्याज प्रदाने-- ०३ अल्पबचत, भविष्यनिर्वाह निधी इत्यादींवरील व्याज (०२) अनुदानित अशासकीय माध्यमिक व विशेष शाळा यांमधील कर्मचारीवर्गाच्या भविष्यनिर्वाह निधीवरील व्याज (०२) (०१) अंशदानेतर (२०४९०२२५). | ० | ० | ० | ० | ० |
| ६० | २०४९ व्याज प्रदाने-- ०३ अल्पबचत, भविष्यनिर्वाह निधी इत्यादींवरील व्याज. (०२) (०३) अनुदानित अशासकीय प्राथमिक शाळांमधील कर्मचारीवर्गाच्या भविष्यनिर्वाह निधीवरील व्याज (२०४९०२९९). | ० | ० | ० | ० | ० |
| | **एकूण २०४९ व्याज प्रदाने (भारित)** | ० | ० | ० | ० | ० |
| | **एकूण शालेय शिक्षण** | **४५०७१००२** | **५४६५४५१५** | **१४१२३७१८३** | **०** | **२४०९६२७००** |

## खाजगी संस्थांनी चालविलेल्या अशासकीय माध्यमिक शाळांना अनुदान

१. योजनेचे नाव व प्रस्तावना .. खाजगी संस्थांनी चालविलेल्या अशासकीय माध्यमिक शाळांना अनुदान.

२. योजना/कार्यक्रमाचे स्वरूप/ माहिती व व्याप्ती. .. अशासकीय माध्यमिक शाळांचे मूल्यांकन करून त्यांना अनुदानास पात्र घोषित करणेबाबत शासन निर्णय क्रमांक माशाअ/२००८/(५९९/०८)/प्राशि १, दिनांक १५ नोव्हेंबर २०११, निर्गमित केलेला आहे. त्यामध्ये दिनांक १६ जुलै २०१३ च्या शासन निर्णय अन्वये सुधारणा करण्यात आलेली आहे. शासन निर्णय, दिनांक १९ सप्टेंबर २०१६ अन्वये १४ जून २०१६ पूर्वी अनुदानास पात्र घोषित करण्यात आलेल्या तथापि, अद्याप अनुदान सुरू न झालेल्या १६२८ शाळा व २४५२ तुकड्यांवरील १९२४७ शिक्षक व शिक्षकेतर पदांना सरसकट २० टक्के प्रमाणे अनुदान मंजूर करण्यात आले आहे. त्यामध्ये प्राथमिक व माध्यमिक शाळांचा समावेश आहे.

(१) शासन निर्णय, क्रमांक माशाअ-२०२०/प्र.क्र.६१ (भाग-२)/एसएम-४, दिनांक १२ फेब्रुवारी २०२१, नुसार अनुदानास पात्र ठरविण्यात आलेल्या माध्यमिक शाळा/वर्ग तुकड्यांवरील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना दिनांक १ नोव्हेंबर २०२० पासून २० टक्के वेतन सुरू करण्यात आले आहे.

(२) शासन निर्णय, क्रमांक माशाअ-२०२०/प्र.क्र.६१/एसएम-४, दिनांक १२ फेब्रुवारी २०२१, नुसार या पूर्वी २० टक्के अनुदान सुरू असलेल्या माध्यमिक शाळा/वर्ग तुकड्यांवरील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना दिनांक १ नोव्हेंबर २०२० पासून **वाढीव २० टक्के** वेतन सुरू करण्यात आले आहे.

३. योजनेचा उद्देश .. निकषानुसार पात्र विनाअनुदानित माध्यमिक शाळांना वेतन अनुदान मंजूर करणे.

४. अंमलबजावणी यंत्रणा .. शिक्षण संचालनालय, विभागीय शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचे कार्यालयाकडून नियंत्रण केले जाते.

५. योजनेची उद्दिष्टे, आर्थिक तरतूद तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च :

**लेखाशीर्ष २२०२३३६१ (३६)** (रुपये हजारांत)

| अ. क्र. | वर्ष | | तरतूद | लाभार्थी | खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ |
| १ | २०१८-१९ | .. | २५५७९६७ | अशासकीय माध्यमिक शाळेतील कर्मचाऱ्यांचा वेतनाचा खर्च | २१५१५८१ |
| २ | २०१९-२० | .. | १९८३८२६ | | १६९५३२८ |
| ३ | २०२०-२१ | .. | १८२०८३३ | | २१८१०४२ |
| ४ | २०२१-२२ (प्रत्यक्ष) | .. | ४२०५९९१ | | ४०२९१८० |
| ५ | २०२२-२३ (अपेक्षित) | .. | ४२०५९९१ | | ४६७३२६५ (अपेक्षित) |
| ६ | २०२३-२४ (अंदाजित) | .. | ४९७४७४९ (प्रस्तावित) | | -- |

* शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक संकीर्ण-२४१८/(५६/१८) अर्थसंकल्प, दिनांक २१ ऑगस्ट २०१८ अन्वये लेखाशीर्ष-२२०२०३३६१ खाली १०० टक्के अनुदानावर सध्या कार्यरत असलेल्या ३०९३ पदांवरील वेतनाचा खर्च तसेच लेखाशीर्ष-२२०२०३३७९ खाली १०० टक्के अनुदानावर सध्या कार्यरत असलेल्या ३९२४ पदांवरील वेतनाचा खर्च ऑगस्ट २०१८ वर्षापासून बांधील करण्यात आला आहे.

६. उद्दिष्टांपेक्षा कमी साध्य झालेले असल्यास, त्याची कारणे. .. निकषानुसार निकषपात्र शाळांना अनुदानासाठी घोषित केले जाते. शासनाने मंजूर पदांचे प्रमाणात मासिक निधी वितरित झाल्यास व कर्मचारीवृंद पुरेसा उपलब्ध करून दिल्यास दरमहा निर्धारित दिनांकास वेतन करणे शक्य होईल.

७. योजना अंमलबजावणीतील अडचणी ..

८. अडचणी निवारण करण्यासाठी करण्यात आलेली उपाययोजना. .. ऑनलाईन पद्धतीने देयके शाळांकडून स्वीकारणे, ई-गव्हर्नन्सचा सर्व स्तरावर वापर करणे, शासनाने दिलेल्या सूचनांनुसार जुलै, २०१३ पासून शालार्थ संगणक प्रणालीद्वारे शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन करण्याची कार्यवाही सुरू करणेत आलेली आहे.

## स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत चालविल्या जाणाऱ्या माध्यमिक शाळांना साहाय्य

१. योजनेचे नाव व प्रस्तावना .. स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत चालविल्या जाणाऱ्या माध्यमिक शाळांना साहाय्य.

२. योजना/कार्यक्रमाचे स्वरूप/ माहिती/व्याप्ती. .. राज्यातील बहुसंख्य माध्यमिक शाळा जरी खाजगी व्यवस्थापनामार्फत चालविल्या जात असल्या, तरी जिल्हा परिषदा, महानगरपालिका, नगरपालिका, कटक मंडळे इत्यादी संस्थाही माध्यमिक शाळा चालवितात. महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी सेवा शर्ती, नियम १९८१ नुसार माध्यमिक शिक्षकांच्या सेवेच्या शर्ती ठरवून दिलेल्या आहेत. शासन या शाळांना सहाय्यक अनुदान देते. अशासकीय माध्यमिक शाळांना ज्या अनुदान सूत्रानुसार अनुदान दिले जाते, तेच सूत्र या शाळांनाही लागू करण्यात आले आहे. या सर्व माध्यमिक शाळांना, माध्यमिक शाळा अनुदान संहितेतील नियमानुसार मान्यता दिली जाते. प्राथमिक शिक्षणाच्या विस्तारामुळे माध्यमिक शिक्षणाच्या स्तरावरही शाळेत जाणाऱ्या मुलांच्या संख्येत वाढ झाली आहे. तसेच शासनाने कमी उत्पन्नाच्या गटाला विविध शैक्षणिक सवलती दिल्या आहेत. त्याचप्रमाणे इयत्ता १२ वी पर्यंतचे शिक्षणासाठी मुलींना शिक्षणशुल्क माफ आहे आणि म्हणून माध्यमिक शिक्षणाच्या स्तरावर विद्यार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. याचा परिणाम माध्यमिक शिक्षणाचा विस्तार होण्यात झाला आहे. माध्यमिक शिक्षणातील सर्व विकासात्मक बाबींवरील खर्च योजनांतर्गत घेतला आहे आणि माध्यमिक शिक्षणाच्या नैसर्गिक विस्ताराचा भाग म्हणून माध्यमिक शाळांना गरजेनुसार जादा तुकड्या उघडण्यास प्रतिवर्षी परवानगी दिली आहे.

शासकीय कर्मचाऱ्यांना दिले जाणारे निवृत्तिवेतनांचे व सेवानिवृत्तीचे इतर लाभ अनुदानप्राप्त खाजगी माध्यमिक शाळांमधील कर्मचारी व स्थानिक संस्थांच्या माध्यमिक शाळांतील कर्मचारीवर्गालाही दिले जातात.

३. योजनेचा उद्देश .. स्थानिक संस्थांनी चालविलेल्या शाळांना प्रोत्साहन मिळावे.

४. अंमलबजावणी यंत्रणा .. राज्य स्तरावर शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक), विभाग स्तरावर विभागीय शिक्षण उपसंचालक व जिल्हा स्तरावर शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, महानगरपालिका, कटक मंडळे.

५. योजनेची उद्दिष्टे, आर्थिक तरतूद तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च.

**लेखाशीर्ष २२०२०५५८ (३६)** (रुपये हजारांत)

| अ. क्र. | वर्ष | | तरतूद | लाभार्थी | खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ |
| १ | २०१८-१९ | .. | ४८०७७६२ | स्थानिक स्वराज्य संस्थांमधील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा खर्च | ३८४१४३२ |
| २ | २०१९-२० | .. | ६२०२०१२ | | ३८२६७६९ |
| ३ | २०२०-२१ | .. | ४३६१९३५ | | ४३६०९५० |
| ४ | २०२१-२२ (प्रत्यक्ष) | .. | ५०६३९५९ | | ५०३८४९६ (प्रत्यक्ष) |
| ५ | २०२२-२३ (अपेक्षित) | .. | ६३७३९१७ | | ५८३५५२३ (अपेक्षित) |
| ६ | २०२३-२४ (अंदाजित) | .. | ६७७३१२३ | | -- (अंदाजित) |

६. उद्दिष्टांपेक्षा कमी साध्य झालेले असल्यास, त्याची कारणे. ..

## भूतपूर्व शासकीय (जिल्हा परिषद) माध्यमिक शाळांतील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना द्यावयाचे वेतन अनुदान

१. योजनेचे नाव व प्रस्तावना .. भूतपूर्व शासकीय (जिल्हा परिषद) माध्यमिक शाळांतील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी यांना द्यावयाचे वेतन अनुदान.

२. योजना/कार्यक्रमाचे स्वरूप/ माहिती व व्याप्ती. .. स्वातंत्र्यपूर्व काळात मराठवाडा व विदर्भ विभागात अनुक्रमे पूर्वीच्या हैद्राबाद व मध्य प्रदेश शासनाद्वारे माध्यमिक शिक्षण देण्यात येत होते. शासकीय आदर्श शाळा म्हणून चालवित असलेल्या काही शाळा पश्चिम महाराष्ट्रातही होत्या. महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम, १९६१, कलम १०० अन्वये जिल्हा परिषदांची स्थापना झाल्यानंतर, या शाळांचे व्यवस्थापन जिल्हा परिषदांकडे हस्तांतरित करण्यात आले. या शाळांतील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वेतनासाठी जिल्हा परिषदांना अनुदान दिले जाते.

३. योजनेचा उद्देश .. भूतपूर्व शासकीय (जिल्हा परिषद) माध्यमिक शाळांतील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी यांना वेतन अनुदान देणे.

४. अंमलबजावणी यंत्रणा .. शिक्षण संचालनालय, विभागीय शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद यांचेकडून नियंत्रण केले जाते.

५. योजनेची उद्दिष्टे, आर्थिक तरतूद तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च :

(रुपये हजारांत)

| अ. क्र. | वर्ष | | तरतूद | लाभार्थी | खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ |
| १ | २०१८-१९ | .. | ३१२२२६५ | ४२७ शाळा | २५६७५६४ |
| २ | २०१९-२० | .. | ३९८९६५० | ४२७ शाळा | ३३६९२५५ |
| ३ | २०२०-२१ | .. | ३३७३०६९ | ४२७ शाळा | ३०११७२० |
| ४ | २०२१-२२ (प्रत्यक्ष) | .. | ३५२५८०४ | ४२७ शाळा | ३१८०३६२ |
| ५ | २०२२-२३ (अपेक्षित) | .. | ४४१७५४१ | ४२७ शाळा | ४१५४६५८ (अपेक्षित) |
| ६ | २०२३-२४ (अंदाजित) | .. | ४३७६००१ | ४२७ शाळा | -- |

६. उद्दिष्टांपेक्षा कमी साध्य झालेले असल्यास, त्याची कारणे. .. मंजूर तरतुदींमधून प्राथम्यानुसार रक्कम दिली जाते.

७. योजना अंमलबजावणीतील अडचणी. .. आवश्यक तरतुदींपेक्षा प्राप्त तरतूद कमी असल्याने, मागणीप्रमाणे तरतूद वितरित करता येत नाही.

८. अडचणी निवारण करण्यासाठी करण्यात आलेली उपाययोजना. .. पुरवणी मागणी प्रस्ताव सादर करण्यात येतो.

# भूतपूर्व शासकीय माध्यमिक शाळांकरिता (जिल्हा परिषद) सप्रयोजन अनुदान
## ( इमारत बांधकामे )

१. योजनेचे नाव व प्रस्तावना .. भूतपूर्व शासकीय माध्यमिक शाळांकरिता जिल्हा परिषद सप्रयोजन अनुदान (इमारत बांधकामे).

२. योजना/कार्यक्रमाचे स्वरूप/माहिती व व्याप्ती. .. स्वातंत्र्यपूर्व काळात मराठवाडा व विदर्भ विभागात अनुक्रमे पूर्वीच्या हैद्राबाद व मध्य प्रदेश शासनाद्वारे माध्यमिक शिक्षण देण्यात येत होते. शासकीय आदर्श शाळा म्हणून चालवित असलेल्या काही शाळा पश्चिम महाराष्ट्रातही होत्या. महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम, १९६१, कलम १०० अन्वये जिल्हा परिषदांची स्थापना झाल्यानंतर, या शाळांचे व्यवस्थापन जिल्हा परिषदांकडे हस्तांतरित करण्यात आले. या शाळांच्या नव्याने बांधावयाच्या इमारतींसाठी शासनामार्फत पूर्ण अर्थसाहाय्य दिले जाते.

३. योजनेचा उद्देश .. इमारत बांधकाम.

४. अंमलबजावणी यंत्रणा .. जिल्हा परिषद, कार्यकारी अभियंता.

५. योजनेची उद्दिष्टे, आर्थिक तरतूद तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च :

(रुपये हजारांत)

| वर्ष | | भौतिक उद्दिष्टे शाळा संख्या | आर्थिक तरतूद | | योजनेवरील खर्च | भौतिक साध्य |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | अर्थसंकल्पीय तरतूद | वितरित तरतूद | | |
| १ | | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| प्रत्यक्ष २०१८-१९ | .. | -- | -- | * तरतूद प्राप्त झालेली नाही. | -- | -- |
| अपेक्षित २०१९-२० | .. | | | * तरतूद प्राप्त झालेली नाही. | | |
| अंदाजित २०२०-२१ | .. | -- | -- | * तरतूद प्राप्त झालेली नाही. | -- | -- |

* शासन पत्र क्र. जिवायो-११०७/(८८/२००७)/अर्थ सं, दिनांक १७ एप्रिल २००८ नुसार सन २००८-०९ या आर्थिक वर्षापासून जिल्हास्तरीय योजनांची अंमलबजावणी संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांमार्फत करण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतला आहे.

६. उद्दिष्टांपेक्षा कमी साध्य झालेले असल्यास, त्याची कारणे. .. -----

७. योजना अंमलबजावणीतील अडचणी. .. -----

८. अडचणी निवारण करण्यासाठी करण्यात आलेली उपाययोजना. .. -----

## भूतपूर्व शासकीय माध्यमिक शाळांकरिता (जिल्हा परिषद) सप्रयोजन अनुदान
## ( इमारत दुरुस्ती )

१. योजनेचे नाव व प्रस्तावना .. भूतपूर्व शासकीय माध्यमिक शाळांकरिता (जिल्हा परिषद) सप्रयोजन अनुदान (इमारत दुरुस्ती).

२. योजना/कार्यक्रमाचे स्वरूप/माहिती व व्याप्ती. .. स्वातंत्र्यपूर्व काळात मराठवाडा व विदर्भ विभागात अनुक्रमे पूर्वीच्या हैद्राबाद व मध्य प्रदेश शासनाद्वारे माध्यमिक शिक्षण देण्यात येत होते. शासकीय आदर्श शाळा म्हणून चालवित असलेल्या काही शाळा महाराष्ट्रातही होत्या. महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम, १९६१, कलम १०० अन्वये जिल्हा परिषदांची स्थापना झाल्यानंतर, या शाळांचे व्यवस्थापन जिल्हा परिषदांकडे हस्तांतरित करण्यात आले. या शाळांच्या इमारत दुरुस्तीसाठी शासनामार्फत अर्थसाहाय्य दिले जाते.

३. योजनेचा उद्देश .. इमारत दुरुस्ती.

४. अंमलबजावणी यंत्रणा .. जिल्हा परिषद, कार्यकारी अभियंता.

५. योजनेची उद्दिष्टे, आर्थिक तरतूद तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च :

(रुपये हजारांत)

| वर्ष | | भौतिक उद्दिष्टे शाळा संख्या | आर्थिक तरतूद अर्थसंकल्पीय तरतूद | आर्थिक तरतूद वितरित तरतूद | योजनेवरील खर्च | भौतिक साध्य |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| प्रत्यक्ष २०१८-१९ | .. | -- | -- | * तरतूद प्राप्त झालेली नाही. | -- | -- |
| अपेक्षित २०१९-२० | .. | | | * तरतूद प्राप्त झालेली नाही. | | |
| अंदाजित २०२०-२१ | .. | -- | -- | * तरतूद प्राप्त झालेली नाही. | -- | -- |

* शासन पत्र क्र. जिवायो-११०७/(८८/२००७)/अर्थसं, दिनांक १७ एप्रिल २००८ नुसार सन २००८-०९ या आर्थिक वर्षापासून जिल्हास्तरीय योजनांची अंमलबजावणी संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांमार्फत करण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतला आहे.

६. उद्दिष्टांपेक्षा कमी साध्य झालेले असल्यास, त्याची कारणे. .. -----

७. योजना अंमलबजावणीतील अडचणी. .. -----

८. अडचणी निवारण करण्यासाठी करण्यात आलेली उपाययोजना. .. -----

# शासकीय  विद्यानिकेतने

१. योजनेचे नाव व प्रस्तावना .. शासकीय विद्यानिकेतन.

विद्यार्थ्यांच्या अंगी बौद्धिक व शारीरिक शिस्त बाणावी, त्यांना सहजीवनाची सवय लागावी, त्यांच्या ठिकाणी सहकार्याने काम करण्याची वृत्ती निर्माण व्हावी, अंगीकृत सामाजिक कर्तव्यात व सेवेत निष्ठापूर्वक परिश्रम करण्याची वृत्ती त्यांच्यात वृद्धींगत व्हावी व निर्भयता वाढावी यासाठी या विद्यानिकेतनामध्ये वसतिगृहात्मक शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून दिलेल्या आहेत.

२. योजना/कार्यक्रमाचे स्वरूप/माहिती व व्याप्ती. .. ग्रामीण भागांतील विद्यार्थ्यांना माध्यमिक शिक्षणाच्या चांगल्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात आणि हुषार व गुणी विद्यार्थ्यांना चांगल्या दर्जाचे शिक्षण मिळावे यासाठी पुसेगाव, जिल्हा सातारा, धुळे, औरंगाबाद, अमरावती आणि केळापूर, जिल्हा यवतमाळ ही पाच शासकीय वसतिगृहात्मक विद्यानिकेतने आहेत. त्यात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना गुणवत्तेच्या निकषानुसार प्रवेश दिला जातो. त्यासाठी त्यांना पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती स्पर्धात्मक परीक्षा उत्तीर्ण व्हावी लागते व गुणाक्रमे दरवर्षी इयत्ता ५ वी मध्ये ४० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. शासन निर्णय क्रमांक एसएसजी-१०९५/८१९५/९५/माशि-८, दिनांक २७ सप्टेंबर १९९५ अन्वये १९९६-९७ पासून शासकीय विद्यानिकेतन, केळापूर यांचे सामान्य विद्यानिकेतनात रूपांतर करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होणारा खर्च उत्पन्नाच्या निकषानुसार शासन करते. विद्यानिकेतनाची कार्यपद्धती आणि व्यवस्थापन यासाठी एक राज्यस्तरीय नियामक मंडळ नियुक्त करण्यात आले असून, राज्यमंत्री (शालेय शिक्षण) हे या नियामक मंडळाचे अध्यक्ष आहेत व सचिव, शालेय शिक्षण हे या नियामक मंडळाचे उपाध्यक्ष आहेत.

३. योजनेचा उद्देश .. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना माध्यमिक शिक्षणाच्या चांगल्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात आणि हुशार व गुणी विद्यार्थ्यांना चांगल्या दर्जाचे शिक्षण मिळावे. तसेच आदिवासी विद्यार्थ्यांना प्रवेश देऊन, त्यांना शिक्षण सुविधा दिल्या जाव्यात. विद्यार्थ्यांच्या अंगी बौद्धिक व शारीरिक शिस्त बाणावी, त्यांना सहजीवनाची सवय लागावी, त्यांच्या ठिकाणी सहकार्याने काम करण्याची वृत्ती निर्माण व्हावी, अंगीकृत सामाजिक कर्तव्यात व सेवेत निष्ठापूर्वक परिश्रम करण्याची वृत्ती त्यांच्यात वृद्धींगत व्हावी व निर्भयता वाढावी यासाठी या विद्यानिकेतनांमध्ये वसतिगृहात्मक शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून दिलेल्या आहेत. यासाठी पाच शासकीय वसतिगृहात्मक विद्यानिकेतने  आहेत.

४. अंमलबजावणी यंत्रणा .. शासन आदेशानुसार संचालनालयाकडून शासकीय विद्यानिकेतन यांना अनुदान दिले जाते. विभागीय शिक्षण उपसंचालक यांच्यामार्फत कार्यवाही व नियंत्रण केले जाते.

५. योजनेची उद्दिष्टे, आर्थिक तरतूद तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च :

**लेखाशीर्ष - २२०२०४२२** **शासकीय  विद्यानिकेतने** (रुपये हजारांत)

| अ. क्र. | वर्ष | | अर्थसंकल्पीय तरतूद | योजनेवरील प्रत्यक्ष खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ |
| १ | २०१६-१७ | .. | १७,२६,४५ | १०,५८,३५ |
| २ | २०१७-१८ | .. | १३,२१,२६ | ८,८७,५४ |
| ३ | २०१८-१९ | .. | १२,५९,७९ | ८,११,४८ |
| ४ | २०१९-२० | .. | १५,८६,९८ | ९,४१,१५ |
| ५ | २०२०-२१ | .. | १३,७६,८० | ७,६४,०३ |
| ६ | २०२१-२२ | .. | १४,६६,७३ | ९,३०,९८ |
| ७ | २०२२-२३ | .. | १४,९०,१८ | ७,०७,११ (दि. ६ डिसेंबर २०२२ अखेरचा खर्च ) |
| ८ | २०२३-२४ | .. | १५,७१,६१  (प्रस्तावित) | -- |

६. उद्दिष्टांपेक्षा कमी साध्य झालेले असल्यास, त्याची कारणे. .. -----

७. योजना अंमलबजावणीतील अडचणी. .. -----

८. अडचणी निवारण करण्यासाठी करण्यात आलेली उपाययोजना. .. -----

# भारत सरकारकडून अनुदानित व प्रायोजित नवोदय विद्यालये

१. योजनेचे नाव व प्रस्तावना .. भारत सरकारकडून अनुदानित व प्रायोजित नवोदय विद्यालये.

२. योजना/कार्यक्रमाचे स्वरूप/माहिती व व्याप्ती .. संपूर्ण भारतात व प्रामुख्याने ग्रामीण भागांमध्ये निवासी शाळा सुरू करणे.

३. योजनेचा उद्देश .. (१) ग्रामीण भागातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांना त्यांची सामाजिक व आर्थिक स्थिती न पाहाता चांगली संस्कृतीमूल्ये, पर्यावरणाची जाणीव, साहसी उपक्रम व शारीरिक शिक्षणासह चांगल्या प्रतीचे आधुनिक शिक्षण देणे.

(२) त्रिभाषीय सूत्रामध्ये विचार केल्यानुसार नवोदय विद्यालयांतील सर्व विद्यार्थी तीन भाषांमध्ये आवश्यक ती क्षमता प्राप्त करतील याची खात्री करणे.

(३) सर्वसाधारणपणे अनुभव व सुविधा यांच्या देवाण-घेवाणीतून शालेय शिक्षणाच्या दर्जामध्ये सुधारणा व्हावी, म्हणून प्रत्येक जिल्ह्यामध्ये केंद्रबिंदू म्हणून कार्यरत राहणे.

४. अंमलबजावणी यंत्रणा .. राज्य शासनाच्या मदतीने आयुक्त व नवोदय विद्यालय समिती ही योजना राबवितात.

५. योजनेचे लक्ष, आर्थिक नियतव्यय, साध्य व खर्च : प्रत्येक जिल्ह्यामध्ये किमान १ जवाहर नवोदय विद्यालय स्थापन करणे.

(रुपये हजारांत)

| वर्ष | | जिल्ह्यांची संख्या | विद्यार्थी संख्या (इ. ५ वी ते १०) | विद्यार्थी संख्या (इ. ११ वी व १२ वी) | शिक्षक कर्मचारी | शिक्षकेतर कर्मचारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| प्रत्यक्ष २०१६-१७ | .. | ३२ | ११९०५ | २८०० | ७९३ | ५७६ |
| अपेक्षित २०१७-१८ | .. | ३२ | ११९०५ | २८०० | ७९३ | ५७६ |
| अंदाजित २०१८-१९ | .. | ३२ | ११९०५ | २८०० | ७९३ | ५७६ |

६. उद्दिष्टांपेक्षा कमी साध्य झालेले असल्यास, त्याची कारणे. .. खालील जिल्ह्यांमध्ये जिल्हा प्रशासनाकडून सरकारी जमीन उपलब्ध न झाल्याने, विद्यालये सुरू होऊ शकली नाहीत.
(१) भंडारा, (२) मुंबई, (३) मुंबई उपनगर.

७. योजनेमधील अडचणी .. जिल्हा प्रशासनाकडून नवोदय विद्यालयासाठी जमीन व तात्पुरत्या निवासासाठी इमारत उपलब्ध न होणे.

८. अडचणी निवारण करण्यासाठी करण्यात आलेली उपाययोजना. .. ज्या जिल्ह्यांमध्ये नवोदय विद्यालये सुरू झालेली नाहीत, त्या जिल्ह्यांमध्ये जागा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने जिल्हा व राज्य प्रशासनाशी पत्रव्यवहार करणे, समितीच्या अधिकाऱ्यांना अशा जिल्ह्यांच्या जिल्हा मॅजिस्ट्रेटशी जमीन उपलब्ध करून देणेबाबत चर्चा करण्यासाठी नियुक्त करणे.

# पूर्वाध्यायन सैनिकी शाळांना साहाय्यक अनुदान (अनिवार्य खर्च)

१. योजनेचे नाव व प्रस्तावना .. पूर्वाध्यायन सैनिकी शाळांना साहाय्यक अनुदान (योजनेतर योजना).

२. योजना/कार्यक्रमाचे स्वरूप/ माहिती व व्याप्ती. .. सदर योजनेअंतर्गत भोसला मिलीटरी स्कूल, नाशिक, सैनिक स्कूल, सातारा व जिल्हा खाजगी सैनिक शाळांना अनुदान दिले जाते. सदर योजनेअंतर्गत भोसला मिलीटरी स्कूल, नाशिक या सैनिक शाळेच्या वेतन / वेतनेतर खर्चासाठी परिरक्षण अनुदान स्वरूपात मदत केली जाते. तसेच प्रत्येक जिल्ह्यात सैनिक शाळा सुरू करणे या १९९६-९७ साली सुरू झालेल्या योजनेअंतर्गत सन २००१-२००२ पर्यंत झालेल्या ३८ सैनिक शाळांतील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन व त्यावरील अनुज्ञेय वेतनेतर अनुदानाची अदायगी केली जाते.

**चंद्रपूर / सातारा सैनिक स्कूल :** चंद्रपूर / सातारा स्कूल, चंद्रपूर / सातारा या केंद्र शासनाच्या राज्यात असणाऱ्या सैनिकी शाळेसाठी शिष्यवृत्ती स्वरूपात अनुदान प्रदान केले जाते. सदर अनुदानातून सैनिक स्कूल, चंद्रपूर / सातारा येथे विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती, भोजन भत्ता, सैनिक स्कूल, चंद्रपूर / सातारच्या वार्षिक आवर्ती खर्चाच्या बाबी, अंदाजपत्रकीय तुटीची पूर्तता आदी बाबींसाठी राज्य शासनाकडून अनुदान प्रदान केले जाते. सैनिक शिक्षणाची जोड असलेली उच्च माध्यमिक स्तरापर्यंत शिक्षण देणारी राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या परीक्षेची तयारी करून घेणारी चंद्रपूर / साताऱ्याची सैनिकी शाळा ही संरक्षण मंत्रालय, भारत सरकार यांचे अधिपत्याखालील राज्यातील सैनिक शाळा आहेत. या शाळेतील $\frac{२}{३}$ जागा म्हणजे ६७ टक्के जागा महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांसाठी राखून ठेवल्या आहेत. शाळेतील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती स्वरुपात राज्य शासन अनुदान प्रदान करते. शाळेतील विद्यार्थ्यांना त्यांच्या पालकांच्या उत्पन्नाच्या प्रमाणात पूर्ण, $\frac{३}{४}$ , अर्धी व $\frac{१}{४}$ शिष्यवृत्ती गुणवत्तेच्या निकषानुसार मंजूर करण्यात येते. या शाळेत प्रवेश देण्यासाठी नियामक मंडळ, या सैनिकी शाळा सोसायटीच्या स्वायत्त मंडळामार्फत राष्ट्रीय स्तरावर प्रवेश परीक्षा घेतली जाते. साहित्य खरेदी, फर्निचर व इमारत सुस्थितीत ठेवणे इत्यादींसाठी राज्य शासन विशेष अनावर्ती अनुदान देते. शासन निर्णय क्रमांक सासैशा/१०९८/(१३४)/ ९८/माशि-७, दिनांक २६ नोव्हेंबर २००२ अन्वये सन २००२-०३ पासून विद्यार्थ्यांना गणवेश दरात पहिल्या वर्षापासून रुपये १,००० वरून रुपये १,४०० व त्यापुढील प्रत्येक वर्षासाठी रुपये ५०० वरून रुपये ७५० अशी वाढ करण्यात आली आहे. सातारा सैनिक स्कूलमधील विद्यार्थ्यांना राज्य शासनातर्फे देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती अनुदानात २००१-२००२ पासून वाढ करण्यात आली आहे. सुधारित दरानुसार पूर्ण शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यास रुपये १४,०००, $\frac{३}{४}$ शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांस रुपये १०,५००, अर्धशिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांस रुपये ७,०००, $\frac{१}{४}$ शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांस रुपये ३,५०० एवढी शिष्यवृत्ती अनुदानाची रक्कम अदा केली जाते. शिष्यवृत्ती प्राप्तीसाठी विद्यार्थ्यांचे पालकांचे उत्पन्न मर्यादेची अट राज्य शासनाकडून शिथिल करण्यात आल्यामुळे, सदर दोन्ही सैनिक शाळेतील ८० टक्के विद्यार्थी शिष्यवृत्तीचे लाभधारक झाले आहेत.

३. योजनेचा उद्देश .. राज्यातील तरुण वर्गातील विद्यार्थ्यांना देशप्रेम/शौर्य/त्याग आदी गुण वाढीस लागणे, राज्यातील जास्तीत-जास्त विद्यार्थी सैन्यातील अधिकारी पदांकरिता राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी प्रवेश परीक्षेत उत्तीर्ण होतील, अशा प्रकारे तयारी करून घेणे.

४. अंमलबजावणी यंत्रणा .. शिक्षण संचालनालय, शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) मार्फत.

५. योजनेची उद्दिष्टे, आर्थिक तरतूद तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च :

**लेखाशीर्ष २२०२०४६९ (३६)** (रुपये हजारांत)

| अ. क्र. | वर्ष | | तरतूद | लाभार्थी | खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ |
| १ | २०१८-१९ | .. | ५९४७७६ | पूर्वाध्यायन सैनिकी शाळेतील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा खर्च | ५५९३४३ |
| २ | २०१९-२० | .. | ७४६७४१ | | ७३२००९ |
| ३ | २०२०-२१ | .. | ७५१४१५ | | ७४४८९० |
| ४ | २०२१-२२ (प्रत्यक्ष) | .. | ८७८९१४ | | ९१६४७३ |
| ५ | २०२२-२३ (अपेक्षित) | .. | ९३८०१६ | | ११६२९२१ |
| ६ | २०२३-२४ (अंदाजित) | .. | १२०६३८२ | | -- |

* शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक संकीर्ण-२४१८/(५६/१८) अर्थसंकल्प, दिनांक २१ ऑगस्ट २०१८ अन्वये सदर लेखाशीर्षाखालील १०० टक्के अनुदानावर सध्या कार्यरत असलेल्या २६१ पदांवरील वेतनाचा खर्च चालू आर्थिक वर्षापासून लेखाशीर्ष-२२०२०४६९ मध्ये बांधील करण्यात आला आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| ६. | उद्दिष्टांपेक्षा कमी साध्य झालेले असल्यास, त्याची कारणे. | .. | नाही. |
| ७. | योजना अंमलबजावणीतील अडचणी. | .. | नाही. |
| ८. | अडचणी निवारण करण्यासाठी करण्यात आलेली उपाययोजना. | .. | नाही. |

# प्रत्येक जिल्ह्यात सैनिक शाळा सुरू करणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | योजनेचे नाव व प्रस्तावना | .. | प्रत्येक जिल्ह्यात सैनिक शाळा सुरू करणे. |
| २. | योजना/कार्यक्रमाचे स्वरूप/ माहिती व व्याप्ती. | .. | शासनाच्या शालेय शिक्षण विभागाकडील क्रमांक इसैशा-१०९५/(२७८/९५)/माशि-८, दिनांक २६ सप्टेंबर १९९५ अन्वये राज्यात प्रत्येक जिल्ह्यात एक याप्रमाणे सैनिकी शाळा १९९६-९७ पासून सुरू करण्यास सक्षम, स्वयंसेवी संस्थांना परवानगी देण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. वर्ष २००५-२००६ पर्यंत राज्यातील ३२ जिल्ह्यांत ३८ सैनिक शाळा सुरू झालेल्या आहेत. त्यापैकी पुणे, औरंगाबाद, बुलढाणा या जिल्ह्यांत मुलींच्या सैनिक शाळा सुरू झाल्या आहेत.<br><br>विद्यार्थ्यांमध्ये सांघिक वृत्ती, शिस्त, नेतृत्व, आत्मविश्वास, शौर्य, देशभक्ती इत्यादी गुणांची जोपासना व्हावी व आत्मीय विकास व्हावा हा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे. राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीमध्ये प्रवेश घेऊन तरुणांनी राष्ट्रसेवा करावी, या व्यापक उद्देशाने शासनाने ही योजना कार्यान्वित केली आहे. अशा प्रकारचा उपक्रम राबविणारे महाराष्ट्र हे देशातील पहिलेच राज्य आहे.<br><br>शासन निर्णय क्रमांक इसैशा-१००१/(१८५/२००१)/माशि-७, दिनांक ५ जुलै २००२ अन्वये वर्ष २००२-२००३ पासून सैनिकी शाळांना जोडून कनिष्ठ महाविद्यालयाचे वर्ग जोडण्यास शासनाने परवानगी दिली आहे. सन २००५-२००६ पर्यंत १४ सैनिक शाळांत उच्च माध्यमिकचे वर्ग सुरू झाले आहेत.<br><br>२००२-२००३ या शैक्षणिक वर्षापासून वार्षिक शुल्क रुपये १५,००० करण्यात आले आहे. तसेच एका तुकडीत ४० विद्यार्थ्यांच्या ऐवजी ४५ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यास परवानगी दिलेली आहे.<br><br>प्रत्येक सैनिकी शाळेला पहिल्या वर्षी ११ शिक्षक/शिक्षकेतर पदे मंजूर करण्यात येतात. नंतर प्रतिवर्षी नैसर्गिक वाढीने निर्माण होणाऱ्या प्रत्येक तुकडीसाठी दोन शिक्षकांची पदे अनुज्ञेय आहेत. प्रथम वर्षापासून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्त्यावरील खर्च, तसेच वेतनेतर बाबींवरील खर्च शासकीय अनुदानास पात्र ठरविला आहे. राज्यातील सैनिकी शिक्षण देणाऱ्या सैनिकी शाळांचे व्यवस्थापन नामवंत खाजगी संस्थांकडे देण्यात आले असून, या सैनिकी शाळांकरिता स्वयंसेवी संस्थांना ३० एकर जागा ३० वर्षांच्या कराराने नाममात्र भाड्याने शासनाकडून उपलब्ध करून देण्यात येते. |
| ३. | योजनेचा उद्देश | .. | राज्यातील तरुण वर्गातील विद्यार्थ्यांना देशप्रेम/शौर्य/त्याग आदी गुण वाढीस लागणे, राज्यातील जास्तीत-जास्त विद्यार्थी सैन्यातील अधिकारी पदांकरिता राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीत प्रशिक्षणप्रविष्ट होणे. |
| ४. | अंमलबजावणी यंत्रणा | .. | शिक्षण संचालनालय, विभागीय शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचे कार्यालयाकडून नियंत्रण केले जाते. |

५. योजनेची उद्दिष्टे, आर्थिक तरतूद, तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च :

**लेखाशीर्ष २२०२०५०२ (३६)** (रुपये हजारांत)

| अ. क्र. | वर्ष | | तरतूद | लाभार्थी | खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ |
| १ | २०१८-१९ | .. | १३०७०४ | सैनिकी शाळेतील अतिरिक्त तुकड्यांवरील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा खर्च | ९०६०१ |
| २ | २०१९-२० | .. | ४७३६ | | ४००५ |
| ३ | २०२०-२१ | .. | ५२११ | | ५००९ |
| ४ | २०२१-२२ (प्रत्यक्ष) | .. | ५५७५ | | ६७७९ |
| ५ | २०२२-२३ (अपेक्षित) | .. | ६०७७ | | ८९४७ |
| ६ | २०२३-२४ (अंदाजित) | .. | ९८०० | | -- |

* शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक संकीर्ण-२४१८/(५६/१८) अर्थसंकल्प, दिनांक २१ ऑगस्ट २०१८ अन्वये सदर लेखाशीर्षाखालील १०० टक्के अनुदानावर सध्या कार्यरत असलेल्या २६१ पदांवरील वेतनाचा खर्च ऑगस्ट २०१८ पासून लेखाशीर्ष-२२०२०४६९ मध्ये बांधील करण्यात आला आहे.

* शासन निर्णय, क्रमांक ईसैशा-२०१७/प्र.क्र. ३६/एसएम-६, दिनांक ७ जून २०१८ नुसार वाशिम, बुलढाणा व यवतमाळ जिल्ह्यातील ३ सैनिक शाळेतील १८ तुकड्यांवरील ३६ शिक्षकांना २० टक्के अनुदान मंजूर करण्यात आलेनुसार असून दिनांक १ जून २०१८ पासून देय करण्यात आले आहे. तसेच शासन निर्णय, क्रमांक ईसैशा-२०१७/प्र.क्र. ११७/एसएम-६, दिनांक २९ जून २०२० नुसार जालना जिल्ह्यातील १ सैनिकी शाळेतील १० शिक्षक पदांना सरसकट २० टक्के अनुदान मंजूर करण्यात आले आहे. तसेच दिनांक २० डिसेंबर २०२१ च्या शासन निर्णया अन्वये जालना जिल्ह्यातील पाच सैनिकी शाळेला वाढीव २० टक्के अनुदान मंजूर करण्यात आले आहे. सध्या या लेखाशिर्षाखाली मंजूर पदे ४२ असून कार्यरत पदे ३९ आहेत. या पदांसाठी आवश्यक असणाऱ्या वेतन अनुदानाचा समावेश अंदाजपत्रकात करण्यात येतो.

६. उद्दिष्टांपेक्षा कमी साध्य झालेले असल्यास, त्याची कारणे. .. नाही.

७. योजना अंमलबजावणीतील अडचणी .. नाही.

८. अडचणी निवारण करण्यासाठी करण्यात आलेली उपाययोजना. .. नाही.

## अशासकीय विशेष संस्थांना साहाय्य

| | | | |
|---|---|---|---|
| १. | योजनेचे नाव व प्रस्तावना | .. | अशासकीय विशेष संस्थांना साहाय्य. |
| २. | योजना/कार्यक्रमाचे स्वरूप/माहिती व व्याप्ती. | .. | योग केंद्रे, कीर्तन संस्था आणि सामाजिक सेवा यांसारख्या विशेष संस्थांना त्यांच्या एकूण खर्चाच्या ३३ टक्के किंवा तुटीच्या मर्यादेपर्यंत यांपैकी जी रक्कम कमी असेल, तेवढे अनुदान निधीच्या उपलब्धतेनुसार दिले जाते. |
| ३. | योजनेचा उद्देश | .. | संस्थांनी चालविलेल्या योजनांना प्रोत्साहन मिळावे. |
| ४. | अंमलबजावणी यंत्रणा | .. | लेखाधिकारी, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, मुंबई. |

५. योजनेची उद्दिष्टे, आर्थिक तरतूद, तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च :

**लेखाशीर्ष २२०२०६७४ (३१)** (रुपये हजारांत)

| वर्ष | | भौतिक उद्दिष्टे संस्था संख्या | आर्थिक तरतूद: अर्थसंकल्पीय तरतूद | आर्थिक तरतूद: वितरित तरतूद | योजनेवरील खर्च | भौतिक साध्य संस्था संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| २०१८-१९ | .. | ३ | ० | ० | ० | -- |
| २०१९-२० | .. | ३ | ३५ | २५.४ | ० | -- |
| २०२०-२१ | .. | १ रयत शिक्षण संस्था विशेष अनुदान | ११०००० | ० | ११०००० | १ |
| २०२१-२२ (प्रत्यक्ष) | .. | ३ | ४५ | ० | ० | ० |
| २०२२-२३ (अपेक्षित) | .. | ३ | ४५ | ० | ४५ (अपेक्षित) | ०३ |
| २०२३-२४ (अंदाजित) | .. | -- | ४५ अंदाजित | -- | -- | ०३ |

| | | | |
|---|---|---|---|
| ६. | उद्दिष्टांपेक्षा कमी साध्य झालेले असल्यास, त्याची कारणे. | .. | -- |
| ७. | योजना अंमलबजावणीतील अडचणी | .. | -- |
| ८. | अडचणी निवारण करण्यासाठी करण्यात आलेली उपाययोजना. | .. | वेळोवेळी सुधारित अंदाजात मागणी केली जाते. तशी शासनाकडून तरतूद उपलब्ध होते. |

# शाळा न्यायाधिकरणे

१. योजनेचे नाव व प्रस्तावना .. शाळा न्यायाधिकरणे.

खाजगी शाळांमधील सेवकांच्या नेमणुका व सेवाशर्ती यांवर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने व त्यांना सेवाशाश्वती देण्याच्या दृष्टीने शासनाने महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवाशर्ती) विनियमन व अधिनियम, १९७७ पारित केलेला आहे. त्याची अंमलबजावणी १५ जुलै १९८१ पासून झाल्याचे शासनाने अधिसूचनेद्वारे अधिसूचित केलेले आहे.

सदर अधिनियमातील कलम ८ (१) अन्वये शासनाने सात विभागांसाठी प्रत्येकी एक याप्रमाणे शाळा न्यायाधिकरणे स्थापन केली असून, शासनाच्या शालेय शिक्षण विभागाकडील शासन निर्णय क्रमांक एसएसएन/१०९५/४६३/माशि-२, सोबतच्या दिनांक २९ ऑक्टोबर १९९६ च्या अधिसूचनेअन्वये सोलापूर व चंद्रपूर, तसेच शासन निर्णय क्रमांक एसएसएन/१०९५/४६३/एसएफ-२, सोबतच्या दिनांक १९ फेब्रुवारी १९९७ या अधिसूचनेअन्वये नवी मुंबई येथे अशा ३ अतिरिक्त शाळा न्यायाधिकरणांची स्थापना करण्यात आली आहे. याप्रमाणे ही कार्यालये कार्यान्वित आहेत.

शासन पत्र क्रमांक एसएससी-२००५/(१९३/०५)/उमाशि-२, दिनांक २९ जून २००५ नुसार असे कळविले आहे की, दिनांक १५ जून २००५ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत " लातूर " येथे शाळा न्यायाधिकरण स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर बैठकीत झालेल्या निर्णयानुसार शाळा न्यायाधिकरण, लातूर या न्यायाधिकरणाकडे (१) परभणी, (२) हिंगोली, (३) नांदेड, (४) लातूर हे जिल्हे संलग्न राहतील. याप्रमाणे हे कार्यालय कार्यान्वित आहे.

अधिसूचना शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक खाशान्या/२००८/(२४८/०८)/उमाशि-२, दिनांक १ सप्टेंबर २००८ अन्वये शाळा न्यायाधिकरण, नागपूर व अतिरिक्त शाळा न्यायाधिकरण, नागपूर (चंद्रपूर) यामध्ये अधिकारिता फेरनिश्चिती करण्यात आली आहे.

२. योजना/कार्यक्रमाचे स्वरूप/ माहिती व व्याप्ती. .. प्रत्येक न्यायाधिकरणाच्या अधिकारकक्षेत पुढे दिलेल्या जिल्ह्यांतील खाजगी शाळा अंतर्भूत आहेत.--

(१) मुंबई : मुंबई, मुंबई उपनगरे.

(२) नवी मुंबई : ठाणे.

(३) सोलापूर : सोलापूर, अहमदनगर, उस्मानाबाद.

(४) चंद्रपूर : चंद्रपूर, गडचिरोली, वर्धा.

(५) पुणे : पुणे, रायगड.

(६) नागपूर : नागपूर, भंडारा, गोंदिया.

(७) औरंगाबाद : औरंगाबाद, जालना, बीड.

(८) अमरावती : बुलढाणा, अकोला, अमरावती, यवतमाळ, वाशिम.

(९) नाशिक : नाशिक, धुळे, जळगाव, नंदुरबार.

(१०) कोल्हापूर : कोल्हापूर, सातारा, सांगली, रत्नागिरी, सिंधुदुर्ग.

(११) लातूर : लातूर, परभणी, नांदेड, हिंगोली.

३. योजनेचा उद्देश .. महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन व अधिनियम, १९७७ अधिनियमातील नियम क्रमांक ९ नुसार खाजगी शाळेतील कर्मचाऱ्यांना न्यायाधिकरणाकडे अपील करण्याचा अधिकार असून, सदर तरतुदींनुसार शाळा व्यवस्थापनाने ज्या व्यक्तीस बडतर्फ केले आहे किंवा नोकरीतून कमी केले आहे, किंवा त्याची सेवा समाप्त केली आहे, अथवा ज्याचा दर्जा कमी करण्यात आला आहे किंवा अन्य कारणाने अन्याय झाला आहे अशा कर्मचाऱ्यास (शाळा न्यायाधिकरणाकडे अपील करण्याचा अधिकार आहे) व अशा आदेशाविरुद्ध आदेश मिळाल्यापासून ३० दिवसांचे आत संबंधित कर्मचाऱ्यास न्यायाधिकरणाकडे अपील करून न्याय मिळविता येईल.

४. अंमलबजावणी यंत्रणा .. शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक),
विभागीय शिक्षण उपसंचालक, शाळा न्यायाधिकरण.

५. योजनेची उद्दिष्टे, आर्थिक तरतूद तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च :

## शाळा न्यायाधिकरणे

### लेखाशिर्ष -- २२०२१६१६

(रुपये हजारांत)

| अ. क्र. | वर्ष | | शाळा न्यायाधिकरण | अर्थसंकल्पिय तरतूद | योजनेवरील प्रत्यक्ष खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ |
| १ | २०१६-१७ | .. | ११ | ३,८१,२० | ३,८४,६९ |
| २ | २०१७-१८ | .. | ११ | ४,४२,४७ | ३,८५,७३ |
| ३ | २०१८-१९ | .. | ११ | ४,२४,१८ | ४,२१,३८ |
| ४ | २०१९-२० | .. | ११ | ५,३७,७१ | ५,१५,५७ |
| ५ | २०२०-२१ | .. | ११ | ५,८४,०५ | ४,८६,७२ |
| ६ | २०२१-२२ | .. | ११ | ६,२२,७० | ५,४३,९६ |
| ७ | २०२२-२३ | .. | ११ | ६,७८,९२ | ४,५८,७० (दि. ६ डिसेंबर २०२२ अखेर पर्यंतचा खर्च ) |
| ८ | २०२३-२४ | .. | ११ | ९,२१,१२ (प्रस्तावित) | ० |

६. उद्दिष्टांपेक्षा कमी साध्य झालेले असल्यास, त्याची कारणे. .. --

७. योजना अंमलबजावणीतील अडचणी .. शाळा न्यायाधिकरणांच्या पीठासीन अधिकाऱ्यांची नियुक्ती मा. उच्च न्यायालयाकडून होते. काहीवेळी सदर पद काही कालावधीसाठी रिक्त रहाते. काही शाळा न्यायाधिकरणामध्ये भौतिक सुविधा कमी आहेत.

८. अडचणी निवारण करण्यासाठी करण्यात आलेली उपाययोजना. .. मा. उच्च न्यायालयाच्या प्रबंधकांकडे रिक्त पदे भरण्यासाठी पाठपुरावा केला जातो. अन्य पीठासीन अधिकाऱ्यांकडे अतिरिक्त कार्यभार दिला जातो.

# माध्यमिक पुस्तकपेढी योजना

१. योजनेचे नाव व प्रस्तावना .. माध्यमिक पुस्तकपेढी योजना.

२. योजना/कार्यक्रमाचे स्वरूप/ माहिती व व्याप्ती. .. जिल्हा परिषदा, महानगरपालिका आणि मान्यताप्राप्त व अनुदानित माध्यमिक शाळांतील अनुसूचित जाती/जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, समाजातील इतर दुर्बल घटक वर्गातील विद्यार्थ्यांना क्रमिक पुस्तकांचे संच कर्जाऊ देण्याची व्यवस्था शाळांमध्ये स्थापन होणाऱ्या/झालेल्या पुस्तक पेढीद्वारे करण्यात येते. या योजनेचे शैक्षणिक वर्ष संपताच दिलेले पुस्तकसंच विद्यार्थ्यांनी परत करावयाचे असतात. प्रत्येक तीन वर्षांनी पेढीतील पुस्तकसंच बदलण्याची तरतूद या योजनेमध्ये आहे. लाभार्थींची संख्या एकूण पटसंख्येच्या २५ टक्के एवढी मर्यादित आहे. सन २०१६-२०१७ मध्ये इयत्ता १० वी च्या मुलांना लाभ देण्यात आला आहे. तसेच सन २०१७-१८ चे उद्दिष्ट ठरवत असताना माध्यमिक शिक्षण अंतर्गत केवळ दोन इयत्ता असल्यामुळे आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये इयत्ता ९ वी अथवा १० वी पैकी कोणताच वर्ग पात्र ठरत नसल्याने सन २०१७-१८ हे आरामाचे वर्ष (Rest Year) समजून नाममात्र रुपये एक हजार एवढी मागणी तदर्थ मागणी म्हणून करण्यात आली होती. तसेच सन २०१८-१९ मध्ये शासनाकडून तरतूद प्राप्त न झाल्यामुळे, सन २०१८-१९ मध्ये इयत्ता ९ वी च्या पात्र लाभार्थ्यांना राज्यात पाठ्यपुस्तके पुरविण्यासाठी सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद यांचेकडून संचालनालयास प्राप्त झालेली मागणी बालभारतीकडे नोंदविण्यात आली नाही. त्यामुळे सन २०१८-१९ मध्ये बालभारतीस देय ठरणारी रक्कम निरंक असल्याने, लागणारी तरतूद नाममात्र १ हजार यावर्षीच्या खर्चामध्ये दर्शविण्यात आली आहे.

३. योजनेचा उद्देश .. समाजातील आर्थिक व दुर्बल घटकातील मुलांना पुस्तके पुरविणे.

४. अंमलबजावणी यंत्रणा .. शिक्षणाधिकारी (माध्यमिक).

५. योजनेची उद्दिष्टे, आर्थिक तरतूद तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च :

(रुपये हजारांत)

| अ. क्र. | वर्ष | | तरतूद | लाभार्थी | खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ |
| १ | २०१६-१७ | .. | २६१०६ | ४५१५८ | २६१०६ |
| २ | २०१७-१८ | .. | १ | -- | -- |
| ३ | २०१८-१९ | .. | ० | ० | १ |
| ४ | २०१९-२० | .. | १००००० | -- | -- |
| ५ | २०२०-२१ | .. | १००००० | ० | ० |
| ६ | २०२१-२२ (अपेक्षित) | .. | १००००० | १७२४१४ | -- |
| ७ | २०२२-२३ (अंदाजित) | .. | १.०० | १७२४१४ | -- |

६. उद्दिष्टांपेक्षा कमी साध्य झालेले असल्यास, त्याची कारणे. .. --

७. योजना अंमलबजावणीतील अडचणी .. --

८. अडचणी निवारण करण्यासाठी करण्यात आलेली उपाययोजना. .. (१) सन २०१३-१४ पासून यु-डायस पद्धतीतून विद्यार्थी संख्या विचारात घेऊन सर्व लाभार्थ्यांना पुस्तके देण्याचे विचारात आहे.

(२) सन २०१९-२० या आर्थिक वर्षाचे नियोजन करत असताना पुस्तक पेढी योजनेअंतर्गत माध्यमिक संचालनालयाकडून इयत्ता १० वी च्या वर्गातील लाभार्थ्यांना लाभ देण्याचा उद्दिष्ट गट आहे.

# माध्यमिक शाळेस जोडलेल्या उच्च माध्यमिक शिक्षणाचे अतिरिक्त वर्ग उघडणे

१. योजनेचे नाव व प्रस्तावना .. माध्यमिक शाळेस जोडलेल्या उच्च माध्यमिक शिक्षणाचे अतिरिक्त वर्ग उघडणे.

सन १९७५-७६ या शैक्षणिक वर्षापासून १०+२+३ या शैक्षणिक आकृतीबंधामध्ये उच्च माध्यमिक शिक्षण योजना सुरू करण्यात आली. सदर योजनेखाली १० वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या प्रमाणात उच्च माध्यमिक शिक्षणाचे वर्ग माध्यमिक शाळांना व महाविद्यालयांना जोडून सुरू करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या नैसर्गिक वाढीनुसार माध्यमिक शाळेस जोडलेल्या उच्च माध्यमिक शिक्षणाचे अतिरिक्त वर्ग उघडणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे विहित निकषानुसार अतिरिक्त तुकड्या, उच्च माध्यमिक शिक्षणासाठी शासनाकडून मंजूर होतात व उपलब्ध तरतुदीनुसार विनाअनुदान तत्त्वावर मंजूर केलेल्या तुकड्या अनुदानावर आणल्या जातात. सन २००१ पासून कायम विनाअनुदान तत्त्वावर तुकड्या मंजूर करण्यात येत आहेत. सद्य:स्थितीत स्वयंअर्थसाहाय्यित तत्त्वावर तुकड्या मंजूर करण्यात येतात.

२. योजना/कार्यक्रमाचे स्वरूप/ माहिती व व्याप्ती. .. इयत्ता ११ वी/१२ वी च्या वर्ग/तुकड्यांवरील शिक्षकांना व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेतन अदा करणे. या योजनेअंतर्गत खाजगी संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, तसेच माजी शासकीय शाळांना जोडलेल्या उच्च माध्यमिक वर्गाच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व खर्चासाठी अनुदान दिले जाते.

३. योजनेचा उद्देश .. विद्यार्थ्यांना उच्च माध्यमिक शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी इयत्ता ११ वी व १२ वी च्या तुकड्यांना मान्यता देणे व विनाअनुदान तत्त्वावर मंजूर केलेल्या वर्ग/तुकड्यावरील शिक्षकांना व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना तुकड्या अनुदानावर आणल्यानंतर वेतन अदा करणे.

४. अंमलबजावणी यंत्रणा .. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.

विभागीय शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, शिक्षण निरीक्षण, बृहन्मुंबई.

५. योजनेची उद्दिष्टे, आर्थिक तरतूद तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च :

(रुपये हजारांत)

| अ. क्र. | वर्ष | | तरतूद | लाभार्थी | खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ |
| १ | २०१८-१९ | .. | ५९९८५० | -- | ३२९४२३ |
| २ | २०१९-२० | .. | १३६१५० | -- | ७४५६ |
| ३ | २०२०-२१ | .. | ९०४३४० | -- | ३१५७०९ |
| ४ | २०२१-२२ | .. | १४०१०९७ | -- | ११९१७६२ |
| ५ | २०२२-२३ (अपेक्षित) | .. | १९०४१८६ | -- | १७६१४११ |
| ६ | २०२३-२४ (अंदाजित) | .. | १९२३८९८ | -- | -- |

* शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक संकीर्ण-२४१८(५६/१८) अर्थसंकल्प, दिनांक २१ ऑगस्ट २०१८ अन्वये, सदर लेखाशीर्षाखालील १०० टक्के अनुदानावर सध्या कार्यरत असलेल्या ७६४ पदांवरील वेतनाचा खर्च लेखाशीर्ष-२२०२०४७८ मध्ये बांधील करण्यात आला आहे.

६. उद्दिष्टांपेक्षा कमी साध्य झालेले असल्यास, त्याची कारणे. .. खाजगी संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था तसेच शासकीय शाळांना जोडलेले उच्च माध्यमिकचे वर्गावरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन अदा केले जाते. यासाठी शासनस्तरावरून नियमित वेतन व खर्चासाठी तरतूद उपलब्ध करून दिली जाते. त्यामुळे संबंधित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन दरमहा विहित वेळेत अदा करण्याचे उद्दिष्ट बहुतांशी साध्य झालेले आहे, तसेच इच्छुक सर्व विद्यार्थ्यांना इयत्ता ११ वी व १२ वी च्या वर्गात प्रवेश दिला जात असल्याने त्या योजनेचे उद्दिष्ट साध्य झालेले दिसते.

| | | | |
|---|---|---|---|
| ७. | योजना अंमलबजावणीतील अडचणी | .. | विद्यार्थी संख्येनुसार व मागणीनुसार इयत्ता ११ वी मध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येतो. तथापि, इयत्ता अकरावीच्या जादा प्रवेश संख्येच्या मानाने त्या त्या प्रमाणात नवीन तुकड्या उघडणे क्रमप्राप्त ठरते. नवीन तुकड्या निर्माण करण्यासाठी शिक्षकांची नियुक्ती करणे, तसेच नवीन तुकड्यांसाठी वर्ग खोल्या नसणे या प्रमुख अडचणी आहेत. |
| ८. | अडचणी निवारण करण्यासाठी करण्यात आलेली उपाययोजना. | .. | विद्यार्थी संख्येनुसार व मागणीनुसार इयत्ता ११ वी च्या वर्गास प्रवेश देण्यासाठी तुकड्या कमी पडत असतील तर जादा तुकड्या मंजूर करून घेऊन सर्व इच्छुक विद्यार्थ्यांना इयत्ता ११ वी च्या वर्गास प्रवेश दिला जातो. |

# उत्तम पुस्तकांना उत्तेजन

१. योजनेचे नाव व प्रस्तावना .. उत्तम पुस्तकांना उत्तेजन.

नवोदित लेखक/प्रकाशकांनी प्रकाशित केलेल्या पुस्तकांना प्रोत्साहन देण्यासाठी पुस्तके स्वीकारली जातात. अशा पुस्तकांचे मूल्यमापन विषय तज्ज्ञांकडून करून घेण्यात येते. त्यासाठी त्यांना नियमानुसार मानधन दिले जाते. सर्व पुस्तके मूल्यमापन अहवालासह पुस्तक निवड समितीपुढे विचारार्थ ठेवण्यात येतात. पुस्तक निवड समितीच्या मान्यतेने शिफारस केलेली पुस्तके राज्यातील शिक्षण संस्था/शाळांच्या निदर्शनास परिपत्रकाद्वारे आणली जातात.

२. योजना/कार्यक्रमाचे स्वरूप/ माहिती व व्याप्ती. .. या योजनेखाली पुस्तक स्वीकारताना लेखक/प्रकाशक यांचेकडून प्रवेश शुल्क रुपये २५० रोखीने व रुपये २५० पेक्षा जास्त रक्कम असेल तर चलनाने कोषागारात भरणा करून चलनाची मूळ प्रत, पुस्तकाच्या दोन प्रतींसह विहित नमुन्यातील प्रपत्र संचालनालयात सादर केल्यावर पुस्तकाचे मूल्यमापन करून निवड समितीच्या शिफारशींप्रमाणे पुस्तकांची निवड करण्याबाबत निर्णय घेण्यात येतो. या योजनेखाली पुस्तके विकत घेतली जात नाहीत.

३. योजनेचा उद्देश .. नवोदित लेखकांच्या पुस्तकास प्रोत्साहन देणे.

४. अंमलबजावणी यंत्रणा .. शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक), म.रा., पुणे.

५. योजनेची उद्दिष्टे, आर्थिक तरतूद तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च :

(रुपये हजारांत)

| अ. क्र. | वर्ष | | तरतूद | लाभार्थी | खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ |
| १ | २०१८-१९ | .. | ५३ | ३ | ३ |
| २ | २०१९-२० | .. | १० | ० | ० |
| ३ | २०२०-२१ | .. | १ | ० | ० |
| ४ | २०२१-२२ | .. | ५३ | -- | -- |
| ५ | २०२२-२३ (अपेक्षित) | .. | १ | -- | -- |
| ६ | २०२३-२४ (अंदाजित) | .. | १ | -- | -- |

६. उद्दिष्टांपेक्षा कमी साध्य झालेले असल्यास, त्याची कारणे. .. उद्दिष्टाएवढे साध्य झालेले आहे.

७. योजना अंमलबजावणीतील अडचणी .. अडचणी नाहीत.

८. अडचणी निवारण करण्यासाठी करण्यात आलेली उपाययोजना. .. --

# संस्कृत पाठशाळा / महाविद्यालय यांना अनुदाने

१. योजनेचे नाव व प्रस्तावना .. संस्कृत पाठशाळा / महाविद्यालय यांना अनुदाने.
सन १९७५-७६ पासून राज्यातील मान्यताप्राप्त संस्कृत पाठशाळा / महाविद्यालयांना शासनामार्फत अनुदान देण्यात येते. संस्कृत भाषेचे जतन व संवर्धन करण्यासाठी तसेच या भाषेचा प्रचार व प्रसार करण्यासाठी अनुदान देण्यात येते. महाराष्ट्र राज्य संस्कृत स्थायी समिती सदस्यामार्फत पाठशाळांची वार्षिक तपासणी करण्यात येते.

२. योजना/कार्यक्रमाचे स्वरूप/ माहिती व व्याप्ती. .. राज्यातील सर्व मान्यताप्राप्त संस्कृत पाठशाळा / महाविद्यालय यांना दरवर्षी २ हप्त्यात विभागीय शिक्षण उपसंचालक यांचेमार्फत अनुदान प्रदान केले जाते. यासाठी अनुदानाच्या मागणीचे अहवाल प्रत्यक्ष खर्च व उपयोगिता प्रमाणपत्र विभागीय शिक्षण उपसंचालक यांचेकडून प्राप्त करून घेण्यात येतात. उपलब्ध तरतुदीनुसार विहित निकषाच्या अधीन राहून विभागीय शिक्षण उपसंचालक यांना अनुदान मंजूर केले जाते व विभागीय शिक्षण उपसंचालक हे त्यांच्या अखत्यारितील मान्यता प्राप्त संस्कृत पाठशाळा/महाविद्यालय यांना अनुदानाचे वाटप करतात. पाठशाळांना त्यांच्या मागील वर्षाच्या मान्य खर्चाच्या $\frac{३}{४}$ अथवा कमाल रुपये २५,००० पर्यंत अनुदान देण्यात येते.

३. योजनेचा उद्देश .. संस्कृत भाषेचा प्रचार व प्रसार करणे. राज्यातील मान्यताप्राप्त संस्कृत पाठशाळांना अनुदान देणे.

४. अंमलबजावणी यंत्रणा .. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक, महाराष्ट्र राज्य.

५. योजनेची उद्दिष्टे, आर्थिक तरतूद तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च :

(रुपये हजारांत)

| अ. क्र. | वर्ष | | तरतूद | लाभार्थी | खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ |
| १ | २०१८-१९ | .. | ८५० | २५ | ६५० |
| २ | २०१९-२० | .. | ५९५ | ० | ० |
| ३ | २०२०-२१ | .. | १ | -- | -- |
| ४ | २०२१-२२ | .. | २३७ | -- | -- |
| ५ | २०२२-२३ (अपेक्षित) | .. | ८५० | -- | -- |
| ६ | २०२३-२४ (अंदाजित) | .. | १ | -- | -- |

६. उद्दिष्टांपेक्षा कमी साध्य झालेले असल्यास, त्याची कारणे. .. उद्दिष्टाएवढे साध्य झालेले आहे.

७. योजना अंमलबजावणीतील अडचणी .. नाहीत.

८. अडचणी निवारण करण्यासाठी करण्यात आलेली उपाययोजना. .. ---

# टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या वासंतिक संस्कृत प्रशिक्षण वर्गास अनुदान देणे

१. योजनेचे नाव व प्रस्तावना .. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या वासंतिक संस्कृत प्रशिक्षण वर्गास अनुदान देणे. टिळक महाराष्ट्र विद्यापीठामार्फत दरवर्षी उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये राज्यातील माध्यमिक संस्कृत शिक्षकांसाठी संस्कृत प्रशिक्षण वर्ग आयोजित केला जातो. शालेय विद्यार्थ्यांचे संस्कृतचे ज्ञान प्रभावी होण्यासाठी हे सत्र आयोजित केले जाते. प्रशिक्षणार्थींचा प्रशिक्षण कालावधी कर्तव्यकाल म्हणून गणला जातो.

२. योजना/कार्यक्रमाचे स्वरूप/माहिती व व्याप्ती. .. वासंतिक संस्कृत प्रशिक्षण वर्ग ५ आठवड्यांचा असून, या वर्गामध्ये किमान १५ व कमाल ३० माध्यमिक संस्कृत शिक्षकांस प्रवेश दिला जातो. वासंतिक वर्गास उपस्थित राहणाऱ्या शिक्षकांचा ५ आठवड्यांचा कालावधी कर्तव्यकाल समजण्यात येतो. प्रशिक्षणास उपस्थित राहणाऱ्या शिक्षकांना रुपये ७५० प्रमाणे विद्यावेतन देण्यात येते. त्यासाठी विद्यापीठास विभागीय शिक्षण उपसंचालकामार्फत संचालनालयाकडून अनुदान दिले जाते.

३. योजनेचा उद्देश .. शालेय विद्यार्थ्यांचे संस्कृतचे ज्ञान प्रभावीपणे होण्यासाठी संस्कृत प्रशिक्षण वर्गाच्या खर्चासाठी टिळक महाराष्ट्र विद्यापीठास अनुदान देणे.

४. अंमलबजावणी यंत्रणा .. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे.

५. योजनेची उद्दिष्टे, आर्थिक तरतूद, तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च :

(रुपये हजारांत)

| अ. क्र. | वर्ष | | तरतूद | लाभार्थी | खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ |
| १ | २०१८-१९ | .. | ५१ | १ | ५१ |
| २ | २०१९-२० | .. | ५१ | ० | ० |
| ३ | २०२०-२१ | .. | ५१ | ० | ० |
| ४ | २०२१-२२ | .. | ५१ | ० | ० |
| ५ | २०२२-२३ (अपेक्षित) | .. | ५१ | -- | -- |
| ६ | २०२३-२४ (अंदाजित) | .. | १ | -- | -- |

६. उद्दिष्टांपेक्षा कमी साध्य झालेले असल्यास, त्याची कारणे. .. उद्दिष्टाएवढे साध्य झालेले आहे.

७. योजना अंमलबजावणीतील अडचणी .. अडचणी नाहीत.

८. अडचणी निवारण करण्यासाठी करण्यात आलेली उपाययोजना. .. ---

# स्वैच्छिक हिंदी संस्थांना अनुदाने

१. योजनेचे नाव व प्रस्तावना .. स्वैच्छिक हिंदी संस्थांना अनुदाने.
ज्या शासनमान्य हिंदी संस्था स्वेच्छेने भाषा विकासाचे कार्य करतात, त्यांना राज्य शासनाकडून दरवर्षी अनुदान देण्यात येते.

२. योजना/कार्यक्रमाचे स्वरूप/माहिती व व्याप्ती. .. महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यापासून भूतपूर्व राज्याची जबाबदारी म्हणून हिंदीच्या खालील तीन संस्थांना राष्ट्रभाषेच्या प्रचारासाठी दरवर्षी तदर्थ अनुदान देण्यात येते. या संस्था राज्यस्तरावर हिंदी भाषेचा प्रचार व प्रसार करतात. त्यांना राज्य शासनाकडून अनुदान देण्यात येते.

| संस्थेचे नाव | अटी |
|---|---|
| विदर्भ हिंदी साहित्य संमेलन, नागपूर | रुपये ७,५०० किंवा अनुज्ञेय खर्चाच्या ५० टक्के यापैकी कमी असेल, ती रक्कम. |
| विदर्भ राष्ट्रभाषा प्रसार समिती, नागपूर | रुपये ५,००० किंवा अनुज्ञेय खर्चाच्या ५० टक्के यापैकी कमी असेल, ती रक्कम. |
| महाराष्ट्र हिंदी प्रचार सभा, औरंगाबाद | रुपये ५,००० किंवा अनुज्ञेय खर्चाच्या ५० टक्के यापैकी कमी असेल, ती रक्कम. |

३. योजनेचा उद्देश .. हिंदी भाषेचा प्रचार व प्रसार करणे.

४. अंमलबजावणी यंत्रणा .. विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर/औरंगाबाद.

५. योजनेची उद्दिष्टे, आर्थिक तरतूद तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च :

(रुपये हजारांत)

| अ. क्र. | वर्ष | | तरतूद | लाभार्थी | खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ |
| १ | २०१८-१९ | .. | १८ | ३ | १८ |
| २ | २०१९-२० | .. | १८ | ० | ० |
| ३ | २०२०-२१ | .. | १ | ० | ० |
| ४ | २०२१-२२ | .. | १८ | ० | ० |
| ५ | २०२२-२३ (अपेक्षित) | .. | १८ | -- | -- |
| ६ | २०२३-२४ (अंदाजित) | .. | १ | -- | -- |

६. उद्दिष्टांपेक्षा कमी साध्य झालेले असल्यास, त्याची कारणे. .. उद्दिष्टाएवढे साध्य झालेले आहे.

७. योजना अंमलबजावणीतील अडचणी .. अडचणी नाहीत.

८. अडचणी निवारण करण्यासाठी करण्यात आलेली उपाययोजना. .. ---

## पूर्व माध्यमिक व माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांसाठी खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती (लेखाशीर्ष -- २२०२२३१८)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | योजनेचे नाव व प्रस्तावना | .. | पूर्व माध्यमिक व माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांसाठी खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती. |
| २. | योजना/कार्यक्रमाचे स्वरूप/माहिती व व्याप्ती. | .. | गुणवान विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी पूर्व माध्यमिक व माध्यमिक शाळातील विद्यार्थ्यांसाठी खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती देण्याची योजना अस्तित्वात आहे. पुणे येथील महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद दरवर्षी घेत असलेल्या स्पर्धात्मक परीक्षांच्या निकालावर, प्रामुख्याने गुणवत्तेनुसार शिष्यवृत्त्या दिल्या जातात. ही शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांची समाधानकारक प्रगती व चांगल्या वर्तणुकीच्या आधारे पुढे चालू राहते. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक एससीएच-२००९/(९०/९०) / केंपुयो, दिनांक २२ जुलै २०१० अन्वये सन २००९-१० या शैक्षणिक वर्षापासून पूर्व माध्यमिक शिष्यवृत्तीचे ( इयत्ता ५ वी ते ७ वी ) सुधारित दर रुपये १०० दरमहा व माध्यमिक शिष्यवृत्तीचे ( इयत्ता ८ वी ते १० वी ) सुधारित दर रुपये १५० दरमहा करण्यात आले आहेत. प्रत्येक टप्प्यात शिष्यवृत्तीचा कालावधी तीन वर्षांचा आहे. ही शिष्यवृत्ती शैक्षणिक वर्षात १० महिन्यांसाठी दिली जाते. तसेच उपरोक्त शासन निर्णयान्वये संचात वाढ करण्यात आली आहे. प्रत्येक जिल्ह्याचे ग्रामीण व नागरी क्षेत्रासाठी शिष्यवृत्त्यांचे स्वतंत्र व ठराविक संच निर्धारित केलेले आहेत. त्यामुळे आता पूर्व माध्यमिक शिष्यवृत्तीचे एकूण १५,९८७ संच मंजूर असून ग्रामीण भागासाठी ८,१२४ व शहरी भागासाठी ७,८६३ संच मंजूर आहेत. तसेच माध्यमिक शिष्यवृत्तीचे १३,०८० संच मंजूर असून त्यापैकी ग्रामीण भागासाठी ६,६५० संच व शहरी भागासाठी ६,४३० संच मंजूर आहेत. सन २०१०-११ पासून शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थ्यांना राष्ट्रीयकृत बँकेमार्फत शिष्यवृत्ती अदा करण्यात येत आहे.<br><br>विदर्भातील विद्यार्थ्यांना विद्यावेतन.—<br>तसेच महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फत घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षेच्या आधारे पूर्व माध्यमिक, माध्यमिक शिष्यवृत्ती योजनेमध्येच विदर्भातील विद्यार्थ्यांना विद्यावेतन पूर्व माध्यमिक व माध्यमिक स्तरावर देण्यात येते. सदर योजना फक्त नागपूर, अमरावती विभागासाठीच असून त्याचे एकूण पूर्व माध्यमिक स्तरावर ३६६ व माध्यमिक स्तरावर १९८ संच मंजूर आहेत. सदर विद्यार्थ्यांना जुन्या दरानेच शिष्यवृत्तीची रक्कम देण्यात येते. दिनांक २९ जून २०१५ च्या शासन निर्णयान्वये केंद्र शासनाच्या बालकांचा मोफत सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ या कायद्यातील तरतुदी विचारात घेऊन राज्यात कार्यान्वित असलेली पूर्व माध्यमिक व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षेचा इयत्ता ४ थी ऐवजी इयत्ता ५ वी व इयत्ता ७ वी ऐवजी ८ वी करण्यात आला आहे. सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वी या इयत्तेकरिता घेण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती परीक्षेच्या परीक्षेकरिता दिनांक २२ जुलै २०१० च्या शासन निर्णयामधील प्रचलित अटी व शर्तीमध्ये दिनांक १५ नोव्हेंबर २०१६ च्या शासन निर्णयान्वये सुधारणा केल्या आहेत. सद्य:स्थितीत सन २०११ च्या जनगणनेनुसार विद्यार्थ्यांना अधिक प्रोत्साहन मिळण्यासाठी शिष्यवृत्तीच्या संचात व दरात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. |
| ३. | योजनेचा उद्देश | .. | गुणवान विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणास प्रोत्साहन देण्यासाठी पूर्व माध्यमिक व माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येते. |
| ४. | अंमलबजावणी यंत्रणा | .. | शिक्षणाधिकारी, (माध्यमिक) (प्राथमिक) जिल्हा परिषदेमार्फत राबविली जाते. |

५. योजनेची उद्दिष्टे, आर्थिक तरतूद तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च.

(रुपये हजारांत)

| अ. क्र. | वर्ष | | तरतूद | लाभार्थी | खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ |
| १ | २०१८-१९ | .. | ७८८८८ | ४३९९४ | ७००८३ |
| २ | २०१९-२० | .. | ९४७४४ | ६४३९४ | ६८७१७ |
| ३ | २०२०-२१ | .. | ७५०० | ० | ० |
| ४ | २०२१-२२ | .. | ७५००० | ६३५३६ | ७५००० |
| ५ | २०२२-२३ (अपेक्षित) | .. | ८०००० | | ८०००० |
| ६ | २०२३-२४ (अंदाजित) | .. | ८०००० | | ८०००० |

७. उद्दिष्टांपेक्षा कमी साध्य झालेले असल्यास, त्याची कारणे .. मागणीनुसार ९९.६ टक्के साध्य झालेले आहे व १०० टक्के साध्य होण्याचे दृष्टीने कार्यवाही चालू आहे.

८. योजना अंमलबजावणीतील अडचणी .. विद्यार्थ्यांच्या बँक खाते क्रमांकाबाबतची माहिती अचूक व वेळेत प्राप्त होत नाही.

९. अडचणी निवारण करण्यासाठी करण्यात आलेली उपाययोजना. .. प्रश्न निर्माण होत नाही.

## ग्रामीण भागातील हुशार (प्रज्ञावान) विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय शिष्यवृत्ती योजना

### (लेखाशीर्ष -- २२०२०३८९)

१. योजनेचे नाव व प्रस्तावना .. ग्रामीण भागातील हुशार (प्रज्ञावान) विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय शिष्यवृत्ती योजना.

२. योजना/कार्यक्रमाचे स्वरूप/माहिती व व्याप्ती. .. ग्रामीण भागातील हुशार व पात्र विद्यार्थ्यांना माध्यमिक शालान्त परीक्षेनंतरचे पुढील शिक्षण घेता यावे म्हणून भारत सरकारने सन १९७१-७२ पासून राष्ट्रीय शिष्यवृत्ती योजना अंमलात आणली आहे.

सन २०१० पासून शिष्यवृत्ती संचात व दरामध्ये वाढ झाली आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांचेमार्फत इयत्ता ७ वी च्या घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शिष्यवृत्तीच्या स्पर्धात्मक परीक्षेच्या गुणांच्या आधारे इयत्ता ८ वी पासून प्रदान करण्यात येते. इयत्ता ७ वीत शिकत असलेल्या व ज्यांचे वय १५ वर्षांपेक्षा अधिक नाही अशा विद्यार्थ्यांना या परीक्षेसाठी बसता येते. ही शिष्यवृत्ती इयत्ता ८ वी पासून मंजूर करण्यात येऊन, ती १० वी पर्यंत म्हणजे एकूण २ वर्षे ही शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांची समाधानकारक प्रगती व चांगली वर्तणूक असल्यास, पुढे चालू राहते. शासन निर्णय, क्रमांक एसपीई-१००४/११७११/(७०/०४)/साशि-१, दिनांक १४ मे २००४ अन्वये नव्याने निर्माण झालेल्या ५४ तालुक्यांच्या विकासगटांना माध्यमिक शिष्यवृत्ती संच मंजूर केले आहेत. त्यामुळे आता सदर शिष्यवृत्तीसाठी प्रत्येक सामूहिक विकासगटांतील ग्रामीण सर्वसाधारण गटास १,३८९ शिष्यवृत्ती, या व्यतिरिक्त प्रत्येक सामूहिक विकास गटातील भूमिहीन शेतमजुरांच्या मुलांस १ प्रमाणे ९५५ शिष्यवृत्त्या, प्रत्येक सामूहिक विकासगटातील अनुसूचित जातीतील मुलांस १ प्रमाणे ४३४ शिष्यवृत्या तसेच ग्रामीण आदिवासी जनजाती विकास गटाला ३ प्रमाणे एकूण १९२ शिष्यवृत्त्यांचे संच मंजूर केले आहेत. शिष्यवृत्त्यांचे दर पुढीलप्रमाणे आहेत.

(१) दरमहा रुपये ३० (दहा महिन्यांकरिता) इयत्ता ८ वी ते १० वीतील अनिवासी शाळेतील शिष्यवृत्तीधारकास.

(२) दरमहा रुपये ६० (दहा महिन्यांकरिता) इयत्ता ११ वी ते १२ वीतील अनिवासी शाळेतील शिष्यवृत्तीधारकास.

(३) दरमहा रुपये १०० (दहा महिन्यांकरिता) माध्यमिक व उच्च माध्यमिक इयत्ता ८ वी ते १० वी तील कोणत्याही माध्यमिक शाळेतील निवासी शिष्यवृत्तीधारकास शासन निर्णय क्रमांक एससीएच-२००९/(९०/०९) / केंपुयो, दिनांक २२ जुलै २०१० अन्वये सन २०१०-२०११ या शैक्षणिक वर्षापासून सदर शिष्यवृत्ती राष्ट्रीयकृत बँकेमार्फत अदा करण्यात येत आहे.

३. योजनेचा उद्देश .. ग्रामीण भागातील हुशार व पात्र विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याचे उद्देशाने.

४. अंमलबजावणी यंत्रणा .. शिक्षणाधिकारी माध्यमिक यांचेमार्फत.

५. योजनेची उद्दिष्टे, आर्थिक तरतूद तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च.

(रुपये हजारांत)

| अ. क्र. | वर्ष | | तरतूद | लाभार्थी | खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ |
| १ | २०१८-१९ | .. | ८५० | १२७६ | ८५० |
| २ | २०१९-२० | .. | १३६० | २१८० | १३६० |
| ३ | २०२०-२१ | .. | १५०० | १२०० | ७५० |
| ४ | २०२१-२२ | .. | १५०० | २९५० | १२७५ |
| ५ | २०२२-२३ (अपेक्षित) | .. | १५०० | २९५० | १५०० |
| ६ | २०२३-२४ (अंदाजित) | .. | १५०० | २९५० | १५०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ६. | उद्दिष्टांपेक्षा कमी साध्य झालेले असल्यास, त्याची कारणे. | .. | या शिष्यवृत्तीअंतर्गत पात्र असलेले मागासवर्गीय विद्यार्थी सामाजिक न्याय विभागामार्फत त्याची मिळणाऱ्या शिष्यवृत्तीचा लाभ घेतात. सामाजिक न्याय विभागामार्फत इयत्ता ८ वी ते १० वी च्या मागासवर्गीय सामाजिक न्याय विभागामार्फत इयत्ता ८ वी ते १० वीच्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना, तसेच इयत्ता ११ वी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती इत्यादी विविध प्रकाराच्या शिष्यवृत्त्या देण्यात येतात. सदर शिष्यवृत्त्यांचे दर जास्त असल्याने विद्यार्थी सामाजिक न्याय विभागामार्फत देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीचा लाभ घेतात. त्यामुळे साध्य कमी झाले आहे. |
| ७. | योजना अंमलबजावणीतील अडचणी. | .. | विद्यार्थ्यांच्या बँक खाते क्रमांकाबाबतची माहिती अचूक व वेळेत प्राप्त होत नाही. |
| ८. | अडचणी निवारण करण्यासाठी करण्यात आलेली उपाययोजना. | .. | शिक्षणाधिकारी (माध्यमिक) व शिक्षण उपसंचालक (सर्व) यांना सभेमध्ये व कार्यशाळा घेऊन सूचना देण्यात आलेल्या आहेत. |

## ग्रामीण भागातील हुशार व होतकरू विद्यार्थ्यांना राज्य शासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती

## (लेखाशीर्ष -- २२०२०३४२)

१. योजनेचे नाव व प्रस्तावना .. ग्रामीण भागातील हुशार आणि पात्र विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्त्या, होतकरू विद्यार्थ्यांना राज्य शासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती.

२. योजना/कार्यक्रमाचे स्वरूप/माहिती.. व व्याप्ती. ग्रामीण भागातील हुशार व पात्र विद्यार्थ्यांना दिनांक ४ डिसेंबर १९५९ व दिनांक २६ एप्रिल १९८३ च्या आदेशाप्रमाणे शिष्यवृत्त्या प्रदान केल्या जातात. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने घेतलेल्या पूर्व माध्यमिक व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती स्पर्धा परीक्षेच्या निकालावरून या शिष्यवृत्त्या दिल्या जातात. शिष्यवृत्तीधारकांच्या समाधानकारक प्रगतीला अनुसरून शिष्यवृत्तीचे प्रत्येक वर्षी नूतनीकरण करण्यात येते आणि वार्षिक परीक्षेत किंवा शालान्त परीक्षेत किंवा पुढे येणाऱ्या पाठ्यक्रमापर्यंतच्या सर्व परीक्षांना ६५ टक्के गुण मिळालेल्या गुणवत्ताधारकाला सदर शिष्यवृत्त्या देण्यात येतात. शासन निर्णय, दिनांक २ ऑगस्ट १९९५ अन्वये सदर शिष्यवृत्त्या संचात व दरात सन १९९५-९६ या वर्षापासून खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात आली आहे. बृहन्मुंबई वगळून राज्यातील प्रत्येक जिल्ह्यासाठी (अ) वरिष्ठ प्राथमिक, (ब) माध्यमिक, (क) उच्च माध्यमिक या प्रत्येक शैक्षणिक स्तरावर ३ संचाऐवजी १० संच मंजूर करण्यात आले आहे. शिष्यवृत्त्याचे सध्याचे सुधारित दर व मंजूर संच खालीलप्रमाणे आहेत.

(अ) वरिष्ठ प्राथमिक (पूर्व माध्यमिक) -- ३३० संच, ५ वी ते ७ वी रुपये ५० दरमहा

(ब) माध्यमिक -- ३३० संच, ५ वी ते ७ वी रुपये ५० दरमहा

(क) उच्च माध्यमिक -- ३३० संच, ८ वी ते ९ वी रुपये १०० दरमहा

शासन निर्णय, क्रमांक एससीएस-२००९/(९०/०९) केंपुयो, दिनांक २२ जुलै २०१० अन्वये सन २००९-२०१० या शैक्षणिक वर्षापासून सदर शिष्यवृत्त्या राष्ट्रीयकृत बँकेमार्फत अदा करण्यात येत आहे.

३. योजनेचा उद्देश .. ग्रामीण भागातील हुशार व पात्र विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी व पुढील शिक्षण घेता यावे या उद्देशाने शिष्यवृत्त्या दिल्या जातात.

४. अंमलबजावणी यंत्रणा .. विभागीय शिक्षण उपसंचालक यांचेमार्फत.

५. योजनेची उद्दिष्टे, आर्थिक तरतूद तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च :

(रुपये हजारांत)

| अ. क्र. | वर्ष | | तरतूद | लाभार्थी | खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ |
| १ | २०१८-१९ | .. | ११९६ | ३३४६ | ११९६ |
| २ | २०१९-२० | .. | १००४ | ३३४६ | ११९६ |
| ३ | २०२०-२१ | .. | १००४ | ३९६० | ५००० |
| ४ | २०२१-२२ | .. | १००० | १३६० | ८५० |
| ५ | २०२२-२३ (अपेक्षित) | .. | १००० | १३६० | १००० |
| ६ | २०२३-२४ (अंदाजित) | .. | १००० | १३६० | १००० |

६. उद्दिष्टांपेक्षा कमी साध्य झालेले असल्यास, त्याची कारणे. .. इयत्ता १० वी नंतर विद्यार्थी शाळा सोडून जात असल्याने व उत्पन्न मर्यादा कमी असल्यामुळे विद्यार्थी इयत्ता ११ वी मध्ये शिष्यवृत्तीसाठी मागणी करीत नाहीत. त्यामुळे उद्दिष्टापेक्षा साध्य कमी झाले आहे.

७. योजना अंमलबजावणीतील अडचणी.. --

८. अडचणी निवारण करण्यासाठी करण्यात आलेली उपाययोजना. ..

## कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शासकीय (खुल्या) गुणवत्ता शिष्यवृत्त्या

### ( लेखाशीर्ष - २२०२०३७१ )

१. योजनेचे नाव व प्रस्तावना .. कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शासकीय (खुल्या) गुणवत्ता शिष्यवृत्त्या.

२. योजना/कार्यक्रमाचे स्वरूप/माहिती व व्याप्ती. .. नवीन आकृतिबंधानुसार वर्ष १९७६-७७ पासून कनिष्ठ महाविद्यालयीन टप्पा अस्तित्वात आल्यापासून, या स्तरावरील विद्यार्थ्यांना खुल्या गुणवत्ता शिष्यवृत्त्या देण्यात येतात. माध्यमिक शालान्त परीक्षेत कमीतकमी ६० टक्के गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार ही शिष्यवृत्ती देण्यात येते. समाधानकारक प्रगती आणि कनिष्ठ महाविद्यालय पहिल्या वर्षाच्या (११ वी च्या) अखेरीस घेण्यात येणाऱ्या परीक्षेत किमान ४५ टक्के गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना या शिष्यवृत्त्या इयत्ता १२ वी मध्ये पुढे चालू राहतात. शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, दिनांक १५ ऑक्टोबर १९९६ अन्वये सदरहू शिष्यवृत्ती दर रुपये २५ ऐवजी दरमहा रुपये ५० याप्रमाणे सुधारले आहेत. त्याचप्रमाणे शिष्यवृत्तीच्या संचातही वाढ केलेली आहे. सन १९९८-९९ पासून या योजनेखाली एकूण ४८०० संच मंजूर आहेत.

३. योजनेचा उद्देश .. विद्यार्थ्यांस उच्च शिक्षण घेण्यास उत्तेजन मिळावे या उद्देशाने ही शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येते.

४. अंमलबजावणी यंत्रणा .. शिक्षण अधिकारी (माध्यमिक / योजना) यांचेमार्फत राबविण्यात येते.

५. योजनेची उद्दिष्टे, आर्थिक तरतूद तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च :

(रुपये हजारांत)

| अ. क्र. | वर्ष | | तरतूद | लाभार्थी | खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ |
| १ | २०१८-२०१९ | .. | २५२२ | ८८० | १७८४ |
| २ | २०१९-२०२० | .. | २५२२ | ८८० | १७८४ |
| ३ | २०२०-२०२१ | .. | २५०० | ० | ० |
| ४ | २०२१-२०२२ | .. | २५०० | १५०७ | १४०८ |
| ५ | २०२२-२०२३ (अपेक्षित) | .. | २५०० | ८८० | २५०० |
| ६ | २०२३-२०२४ (अंदाजित) | .. | २५०० | ०० | २५०० |

६. उद्दिष्टांपेक्षा कमी साध्य झालेले असल्यास, त्याची कारणे. .. मागणीनुसार साध्य झालेले आहे.

७. योजना अंमलबजावणीतील अडचणी ..

८. अडचणी निवारण करण्यासाठी करण्यात आलेली उपाययोजना. .. –

## संस्कृत शिक्षण-माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना भारत सरकारच्या शिष्यवृत्त्या

### ( लेखाशीर्ष - २२०२१०६२ )

१. योजनेचे नाव व प्रस्तावना .. संस्कृत शिक्षण-माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना भारत सरकारच्या शिष्यवृत्त्या.

२. योजना/कार्यक्रमाचे स्वरूप/माहिती व व्याप्ती. .. माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेमधील विद्यार्थ्यांना संस्कृत भाषेच्या अभ्यासाकडे आकर्षित करण्यासाठी विद्यार्थ्यांना संस्कृत भाषेच्या गुणवत्ता शिष्यवृत्त्या दिल्या जातात. इयत्ता ८ वी मधील वार्षिक परीक्षेमध्ये संस्कृत या विषयात प्राप्त केलेल्या गुणवत्तेवर इयत्ता ९ वी व १० वीच्या गुणवत्तेवर इयत्ता ११ वी व १२ वीमध्ये शिष्यवृत्ती प्रदान केली जाते. शालेय शिक्षण विभाग, क्रमांक एसकेई-१०९८/४२४०/(२२९/९८)/माशि-८, दिनांक २० ऑक्टोबर १९९८ अन्वये संस्कृत शिष्यवृत्तीच्या संचात व दरात सुधारणा करण्यात आली आहे. इयत्ता ९ वी व इयत्ता १० वी मधील विद्यार्थ्यांसाठी रुपये १०० दरमहा व इयत्ता ११ वी व १२ वी मधील विद्यार्थ्यांसाठी रुपये १२५ दरमहा शिष्यवृत्ती १९९८-९९ या वर्षापासून दिली जाते. इयत्ता ९ वी ते १२ वी पर्यंत इयत्तेला १०० संच याप्रमाणे एकूण ४०० शिष्यवृत्त्या संच मंजूर आहेत. इयत्ता १० वी व १२ वी मध्ये ही शिष्यवृत्ती मिळण्यास विद्यार्थ्यास संस्कृत विषय घेणे आवश्यक असते. इयत्ता ९ वी व ११ वी मध्ये प्रथम मंजुरीच्यावेळी ही शिष्यवृत्ती दहा महिन्यांसाठी दिली जाते आणि इयत्ता १० वी व १२ वीत संस्कृत विषय घेणाऱ्या विद्यार्थ्यास ही शिष्यवृत्ती बारा महिन्यांसाठी दिली जाते.

३. योजनेचा उद्देश .. माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये संस्कृत भाषेच्या अध्ययनासाठी आकर्षित करण्यासाठी विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती दिली जाते.

४. अंमलबजावणी यंत्रणा .. विभागीय शिक्षण उपसंचालक यांचेमार्फत मंजूर केली जाते.

५. योजनेची उद्दिष्टे, आर्थिक तरतूद तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च :

(रुपये हजारांत)

| अ. क्र. | वर्ष | | तरतूद | लाभार्थी | खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ |
| १ | २०१८-२०१९ | .. | ४०० | ३१९ | ३०३ |
| २ | २०१९-२०२० | .. | ४०० | ४०० | ३१९ |
| ३ | २०२०-२०२१ | .. | १ | ० | ० |
| ४ | २०२१-२०२२ | .. | २०० | १५८ | ४२ |
| ५ | २०२२-२०२३ (अपेक्षित) | .. | ४०० | ४०० | ४०० |
| ६ | २०२३-२०२४ (अंदाजित) | .. | ४०० | ४०० | ४०० |

६. उद्दिष्टांपेक्षा कमी साध्य झालेले असल्यास, त्याची कारणे. .. --- --

७. योजना अंमलबजावणीतील अडचणी .. --- --

८. अडचणी निवारण करण्यासाठी करण्यात आलेली उपाययोजना. .. --- --

# राष्ट्रीय भारतीय सैनिक महाविद्यालय, डेहराडून येथील सरकारी शिष्यवृत्त्या

## ( लेखाशीर्ष - २२०२११९८ )

१. योजनेचे नाव व प्रस्तावना .. राष्ट्रीय भारतीय सैनिक महाविद्यालय, डेहराडून येथील सरकारी शिष्यवृत्त्या.

२. योजना/कार्यक्रमाचे स्वरूप/माहिती व व्याप्ती. .. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज, डेहराडून ही प्रवेश परीक्षा जून व डिसेंबर अशा दोन सत्रांत घेतली जाते व प्रत्येक सत्रात दोन अशा एकूण चार विद्यार्थ्यांची प्रतिवर्षी निवड करण्यात येते. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना इयत्ता ८ वी ते १२ वी पर्यंत असे पाच वर्षांचे प्रशिक्षण दिले जाते. शासन निर्णय, क्रमांक एससीएच-१०९८/(८०/९८)/माशि-८, दिनांक ६ नोव्हेंबर १९९८ अन्वये प्रतिवर्षी प्रति विद्यार्थ्यास रुपये ११,००० देण्यात येतात. दिनांक १२ मार्च २०१४ च्या शासन निर्णयान्वये शिष्यवृत्तीची रक्कम ११,००० वरून २०,००० इतकी वाढविण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. विद्यार्थ्यांच्या प्रगती अहवालाआधारे व शिक्षण पुढे चालू ठेवलेल्या, अशा प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर केली जाते. शासन निर्णय, क्रमांक एससीएच-२००५/(७०/०५)/साशि-१, दिनांक ४ जुलै २००९ अन्वये चार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यास मंजुरी दिली आहे.

३. योजनेचा उद्देश .. महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना शिक्षण पूर्ण झाल्यावर भारतीय सैनिक सेवेत भरती होता यावे, या उद्देशाने व संरक्षण दलात उत्कृष्ट दर्जाची सेवा करणाऱ्या अधिकाऱ्यांची निर्मिती करणे.

४. अंमलबजावणी यंत्रणा .. शिक्षण संचालक, योजना शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

५. योजनेची उद्दिष्टे, आर्थिक तरतूद तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च :

(रुपये हजारांत)

| अ. क्र. | वर्ष | तरतूद | लाभार्थी | खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | २०१८-२०१९ .. | ८०० | २० | ७९७ |
| २ | २०१९-२०२० .. | ८०० | २० | ४०० |
| ३ | २०२०-२०२१ .. | ८०० | १६ | ४५० |
| ४ | २०२१-२०२२ .. | ८०० | १५ | ७०६ |
| ५ | २०२२-२०२३ (अपेक्षित) .. | ८०० | २० | ७९७ |
| ६ | २०२३-२०२४ (अंदाजित) .. | ८०० | २० | ०० |

६. उद्दिष्टांपेक्षा कमी साध्य झालेले असल्यास, त्याची कारणे. .. -- --

७. योजना अंमलबजावणीतील अडचणी .. --- --

८. अडचणी निवारण करण्यासाठी करण्यात आलेली उपाययोजना. .. --- --

# आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती

## ( लेखाशीर्ष - २२०२१२५१ )

१. योजनेचे नाव व प्रस्तावना .. आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती.

२. योजना/कार्यक्रमाचे स्वरूप/माहिती व व्याप्ती. .. आर्थिकदृष्ट्या मागासवर्गातील हुशार मुले/मुली जे माध्यमिक शालान्त परीक्षेत पहिल्याच वेळी ५० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाले आहेत, अशांना पुढील उच्च शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय, दिनांक १५ ऑक्टोबर १९९६ च्या निर्णयान्वये ३,२०० शिष्यवृत्त्या मंजूर केल्या आहेत. ही शिष्यवृत्ती फक्त कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरासाठी उपलब्ध आहे. सन १९९८-९९ पासून शिष्यवृत्तीची विभागणी (१) विज्ञान शाखा-२,०००, (२) वाणिज्य शाखा-८००, (३) कला शाखा-४०० आहे. पालकांच्या वार्षिक उत्पन्नाची मर्यादा रुपये ३०,००० करण्यात आली आहे. वसतिगृहात राहणाऱ्या मुलांकरिता शिष्यवृत्ती दर उच्च माध्यमिक अभ्यासक्रमाकरिता मुलांसाठी दरमहा रुपये १४० व मुलींकरिता दरमहा रुपये १६० आहे. तसेच वसतिगृहात न राहणाऱ्या मुलांना रुपये ८० व मुलींना रुपये १०० आहेत. ही शिष्यवृत्ती १० महिन्यांकरिता दिली जाते. इयत्ता १० वी मध्ये ५० टक्के गुण मिळवून पहिल्याच वेळी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती १२ वी पर्यंत चालू राहते.

३. योजनेचा उद्देश .. आर्थिकदृष्ट्या मागासवर्गातील विद्यार्थ्यांना पुढील शिक्षण घेता यावे या दृष्टीने सदर योजना कार्यान्वित आहे.

४. अंमलबजावणी यंत्रणा .. ही शिष्यवृत्ती शिक्षण संचालक, योजना यांचेकडून मंजूर केली जाते व तिचे नूतनीकरण संबंधित शिक्षणाधिकारी/ शिक्षण निरीक्षक यांचेकडून केले जाते.

५. योजनेची उद्दिष्टे, आर्थिक तरतूद तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च :

(रुपये हजारांत)

| अ. क्र. | वर्ष | | तरतूद | लाभार्थी | खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ |
| १ | २०१८-२०१९ | .. | ४७४३ | ३०६९ | २२४१ |
| २ | २०१९-२०२० | .. | २८८० | ११७६ | ५८८ |
| ३ | २०२०-२०२१ | .. | २००० | ० | ० |
| ४ | २०२१-२०२२ | .. | ४००० | २६२८ | १३१४ |
| ५ | २०२२-२०२३ (अपेक्षित) | .. | ४००० | ४८०० | ४००० |
| ६ | २०२३-२०२४ (अंदाजित) | .. | ४००० | ०० | ४००० |

६. उद्दिष्टांपेक्षा कमी साध्य झालेले असल्यास, त्याची कारणे. .. ही शिष्यवृत्ती कला, विज्ञान वाणिज्य शाखेच्या कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी लागू आहे शालान्त परीक्षेनंतर तंत्रशिक्षण (आय.टी.आय., शासकीय तंत्रनिकेतन) व्यावसायिक अभ्यासक्रमाकडे विद्यार्थी प्रवेश घेतात. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सामाजिक न्याय विभागामार्फत मोफत शिक्षणाची सुविधा उपलब्ध आहे. तसेच सामाजिक न्याय, शासन निर्णय, दिनांक ११ जून २००३ व २५ जुलै २००३ अन्वये मागासवर्गीय विद्यार्थ्यांना (रुपये ३०० प्रमाणे दहा महिन्यांसाठी रुपये ३०००) राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती दिली जाते. तसेच उत्पन्नाच्या मर्यादेची अट शिथिल करणे आवश्यक आहे.

७. योजनेमधील अंमलबजावणी अडचणी .. सर्व समाजातील नागरिकांचे राहणीमान दर्जा उंचावला असल्याने, उत्पन्नाची मर्यादा वाढविणे आवश्यक आहे.

८. अडचणी निवारण करण्यासाठी करण्यात आलेली उपाययोजना. .. उत्पन्नाची मर्यादा वाढविण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

## स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना शैक्षणिक सवलती

### ( लेखाशीर्ष - २२०२१३९४ )

१. योजनेचे नाव व प्रस्तावना .. स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना शैक्षणिक सवलती.

२. योजना/कार्यक्रमाचे स्वरूप/माहिती व व्याप्ती. .. शासन निर्णय क्रमांक एमआयएस/१४६५-एच, दिनांक २३ नोव्हेंबर १९६५ पासून ही योजना अंमलात आणली आहे तसेच शिक्षण व सेवायोजना विभाग, शासन निर्णय क्रमांक एफएफई-१०८८/(५४३/८४)/साशि-५, दिनांक ३१ डिसेंबर १९९० अन्वये गोवा मुक्ती संग्रामात भाग घेतलेल्या महाराष्ट्रातील स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना १९९०-९१ च्या शैक्षणिक वर्षापासून ही शुल्कमाफी सवलत दिली जात आहे. सवलती प्राथमिक/माध्यमिक/उच्च माध्यमिक अशा सर्व स्तरांवर दिल्या जातात. या योजनेखाली उत्पन्न मर्यादेची अट १९८२-८३ सालापासून काढून टाकण्यात आली आहे. शासन निर्णय क्रमांक एनडीएफ-१०९४/(१६६८/९४)/साशि-५, दिनांक १३ सप्टेंबर १९९४ अन्वये १९९४-९५ पासून शिष्यवृत्ती व पुस्तक अनुदानाच्या दरात वाढ केली आहे.

३. योजनेचा उद्देश .. स्वातंत्र्यपूर्व काळात भारताच्या स्वातंत्र्यासाठी ज्यांनी कारावास भोगला, अशा स्वातंत्र्य सैनिकांच्या पत्नींना/मुलांना/नातवंडाना (हयात नसलेल्या मुलांच्या मुलांना) ही शुल्कमाफीची सवलत दिली जाते.

४. अंमलबजावणी यंत्रणा .. शिक्षणाधिकारी (माध्यमिक योजना), जिल्हा परिषद.

५. योजनेची उद्दिष्टे, आर्थिक तरतूद तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च :

(रुपये हजारांत)

| अ. क्र. | वर्ष | तरतूद | लाभार्थी | खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | २०१८-२०१९ .. | १ | -- | -- |
| २ | २०१९-२०२० .. | १ | -- | -- |
| ३ | २०२०-२०२१ .. | १ | -- | -- |
| ४ | २०२१-२०२२ .. | १ | -- | -- |
| ५ | २०२२-२०२३ (अपेक्षित) .. | १ | -- | -- |
| ६ | २०२३-२०२४ (अंदाजित) .. | १ | -- | -- |

६. उद्दिष्टांपेक्षा कमी साध्य झालेले असल्यास, त्याची कारणे. .. लाभार्थी संख्येत दिवसेंदिवस घट होत आहे.
सदरची योजना ही स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना/पत्नीला/मुलांना/नातवडांना (हयात नसलेल्या आई व मुलाच्या मुलांना) ही शुल्क माफीची सवलत दिली जाते. लाभार्थी मिळत नसल्याने खर्च झालेला नाही.

७. योजना अंमलबजावणीतील अडचणी ..

८. अडचणी निवारण करण्यासाठी करण्यात आलेली उपाययोजना. .. --

# आजी / माजी सैनिकांच्या मुलांना / मुलींना / पत्नींना / विधवांना शैक्षणिक सवलती

## ( लेखाशीर्ष - २२०२१५०९ )

१. योजनेचे नाव व प्रस्तावना .. आजी / माजी सैनिकांच्या मुलांना / मुलींना / पत्नींना / विधवांना शैक्षणिक सवलती.

२. योजना/कार्यक्रमाचे स्वरूप/माहिती व व्याप्ती. .. शासन निर्णय क्रमांक एनडीएफ/१०७२/२४८७-एस, दिनांक १० नोव्हेंबर १९७२ अन्वये सैनिकांच्या मुलांना / मुलींना / पत्नींना / विधवांना शैक्षणिक सवलती प्राथमिक / माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालय व इतर सर्व स्तरांवर देण्याबाबतची सुधारित योजना सुरू करण्यात आली. त्यानंतर या योजनेची व्याप्ती वाढवून माजी मुलांना / मुलींना / पत्नींना / विधवांना त्यांनी महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र दाखल केल्यास अथवा महाराष्ट्रात भरती झालेल्या मेजर वा नौदल आणि वायुदलातील तत्सम दर्जाच्या हुद्यापर्यंत वा हुद्यापेक्षा कमी हुद्यावरून निवृत्त झालेल्या माजी सैनिकांच्या मुलांना / मुलींना /पत्नींना / विधवांना शैक्षणिक सवलत देण्याची योजना शासन निर्णय क्रमांक एनडीएफ-१०७९/२२२९२०/(५३७)/साशि-५, दिनांक १४ जानेवारी १९८५ च्या वर्षापासून कार्यान्वित करण्यात आली. शासन निर्णय क्रमांक एनडीएफ-१०९४/(१६६८/९४)/साशि-५, दिनांक १३ सप्टेंबर १९९४ अन्वये १९९४-९५ पासून शिष्यवृत्ती व पुस्तक अनुदानाच्या दरात वाढ केली आहे.

३. योजनेचा उद्देश .. राष्ट्रीय संरक्षणासाठी ज्या जवानांनी लष्करी सेवा केली आहे किंवा करीत आहे अशा सैनिकांच्या पाल्यांना शैक्षणिक प्रगती करता यावी यासाठी ही योजना राबविण्यात येते.

४. अंमलबजावणी यंत्रणा .. शिक्षणाधिकारी (माध्यमिक योजना), जिल्हा परिषद.

५. योजनेची उद्दिष्टे, आर्थिक तरतूद तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च :

(रुपये हजारांत)

| अ. क्र. | वर्ष | तरतूद | लाभार्थी | खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | २०१८-२०१९ .. | ४८७ | १३०८ | १९५ |
| २ | २०१९-२०२० .. | ४८७ | ३५० | १६५ |
| ३ | २०२०-२०२१ .. | ४८७ | ० | ० |
| ४ | २०२१-२०२२ .. | ४८७ | २७० | १२२.७२९ |
| ५ | २०२२-२०२३ (अपेक्षित) .. | ५०० | ९७० | ५०० |
| ६ | २०२३-२०२४ (अंदाजित) .. | ५०० | ९०० | ५०० |

६. उद्दिष्टांपेक्षा कमी साध्य झालेले असल्यास, त्याची कारणे. .. लाभार्थी संख्येत दिवसेंदिवस घट होत आहे.

७. योजना अंमलबजावणीतील अडचणी .. --

८. अडचणी निवारण करण्यासाठी करण्यात आलेली उपाययोजना. .. --

## ज्यांचे किंवा ज्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रुपये १ लाख पेक्षा जास्त नाही अशा विद्यार्थ्यांना फी माफी

**( लेखाशीर्ष - २२०२१४७४ )**

१. योजनेचे नाव व प्रस्तावना .. ज्यांचे किंवा ज्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रुपये १ लाख पेक्षा जास्त नाही अशा विद्यार्थ्यांना फी माफी.

२. योजना/कार्यक्रमाचे स्वरूप/माहिती व व्याप्ती. .. आर्थिकदृष्ट्या (मागासवर्गीय) दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना फी माफीची सवलत (ई.बी.सी.) ही योजना सन १९५९ पासून राज्यात राबविली जाते. त्यामध्ये शासन निर्णय, शिक्षण व समाजकल्याण विभाग ईबीसी/१७६३/एच, दिनांक १९ जून १९६४ अन्वये सुधारित नियम अमंलात आले. शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजना विभाग क्रमांक एफईडी-१०८३/१५१६७२/साशि-५, दिनांक २४ ऑगस्ट १९८३ अन्वये राज्यातील शासनमान्य अनुदानित माध्यमिक शाळांतील मुलींना इयत्ता १० वी पर्यंतचे (इयत्ता ५ वी ते १० वी) शिक्षण मोफत करण्यात आले व शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजना विभाग क्रमांक एफईडी-१०८४/(२५६८)/साशि-५, दिनांक ६ फेब्रुवारी १९८७ च्या निर्णयान्वये इयत्ता १२ वी पर्यंत मुलींना मोफत शिक्षण करण्यात आले. त्यानंतर शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्रमांक एफईडी/१०९६/प्र.क्र./१९७८/९६/साशि-५, दिनांक १३ जून १९९६ अन्वये इयत्ता १ ली ते १० वी पर्यंत सर्वांना नि:शुल्क शिक्षण योजना सुरू करण्यात आल्याने उपरोक्त योजनेचा लाभ सध्या इयत्ता ११ वी व १२ वी मधील विद्यार्थी (मुले) घेतात. अनुदानित उच्च माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांना प्रवेश शुल्क व सत्र शुल्क यांची आणि विनाअनुदानित उच्च माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांना प्रवेश शुल्क, सत्र शुल्क आणि शिक्षण शुल्क यांची प्रमाणित दराने प्रतिपूर्ती शाळांना केली जाते.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी फी सवलतीच्या योजनेअंतर्गत शालेय शिक्षण विभागाच्या क्रमांक ईबीसी-२०११/प्र.क्र. ५३/११/वि.वि.-५, दिनांक ३० मे २०१४ अन्वये पालकांची वार्षिक उत्पन्न मर्यादा सन २०१४-१५ पासून रुपये १५,००० वरून रुपये १ लाख करण्यात आली आहे.

३. योजनेचा उद्देश .. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून शासनाने मोफत शिक्षणाची सुविधा उपलब्ध केली आहे.

४. अंमलबजावणी यंत्रणा .. शिक्षणाधिकारी (माध्यमिक योजना), जिल्हा परिषद.

५. योजनेची उद्दिष्टे, आर्थिक तरतूद तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च :

(रुपये हजारांत)

| अ. क्र. | वर्ष | | तरतूद | लाभार्थी | खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ |
| १ | २०१८-२०१९ | .. | १७०२४ | १३६११ | १२७९४ |
| २ | २०१९-२०२० | .. | १७०२४ | १३६११ | ८१२८ |
| ३ | २०२०-२०२१ | .. | १५००० | ० | ० |
| ४ | २०२१-२०२२ | .. | ५००० | ६१९८ | ३७०१.६२७ |
| ५ | २०२२-२०२३ (अपेक्षित) | .. | १५००० | १३६११ | १५००० |
| ६ | २०२३-२०२४ (अंदाजित) | .. | १५००० | १३६११ | १५००० |

६. उद्दिष्टांपेक्षा कमी साध्य झालेले असल्यास, त्याची कारणे. .. --

७. योजना अंमलबजावणीतील अडचणी .. कनिष्ठ महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांखेरीज इतर व्यवसायिक प्रमाणपत्र अभ्यासक्रमातील ई.बी.सी. धारक विद्यार्थ्यांसाठी देण्यात येणारी सवलत संबंधित विभागाकडे वर्ग करणे उचित होईल.

८. अडचणी निवारण करण्यासाठी करण्यात आलेली उपाययोजना. .. --

---

# इयत्ता १० वी पर्यंतचे सर्वांना मोफत शिक्षण

## ( लेखाशीर्ष - २२०२३०५६ )

१. योजनेचे नाव व प्रस्तावना .. इयत्ता १० वी पर्यंतचे सर्वांना मोफत शिक्षण.

२. योजना/कार्यक्रमाचे स्वरूप/माहिती व व्याप्ती. .. शालेय शिक्षण विभाग, निर्णय क्रमांक एफईडी-उ-१०९६/प्र.क्र. १९७८/९६/साशि-५, दिनांक १३ जून १९९६ अन्वये १९९६-९७ पासून शासनमान्य अनुदानित व विनाअनुदानित शाळांमधील इयत्ता १ ली ते १० वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणित शुल्क दराने मोफत शिक्षण योजना लागू करण्यात आली आहे. किमान १५ वर्षे महाराष्ट्रात वास्तव्य असणाऱ्या पालकांच्या पाल्यांना ही सवलत मिळू शकते. या सवलतीसाठी ७५ टक्के उपस्थिती व चांगली वर्तणूक असणे आवश्यक असून, अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलत त्या वर्षापुरती रोखण्यात येईल. मात्र तो उत्तीर्ण होताच ही सवलत पुढील वर्षात पूर्ववत चालू होत असते. अनुदानित माध्यमिक शाळांच्या वेतनावर १०० टक्के अनुदान शासनाकडून दिले जात असल्याने या योजनेखाली अनुदानित शाळांना फक्त सत्र शुल्क / प्रवेश शुल्क यांची प्रतिपूर्ती करण्यात येते आणि विनाअनुदानित शाळांच्या बाबतीत शैक्षणिक शुल्क, सत्र शुल्क, प्रवेश शुल्क यांची प्रमाणित दराने प्रतिपूर्ती करण्यात येते.

३. योजनेचा उद्देश .. सर्व विद्यार्थ्यांना मोफत शिक्षणाची संधी उपलब्ध केल्याने जास्तीतजास्त विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे.

४. अंमलबजावणी यंत्रणा .. शिक्षणाधिकारी (माध्यमिक योजना), जिल्हा परिषद.

५. योजनेची उद्दिष्टे, आर्थिक तरतूद तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च :

(रुपये हजारांत)

| अ. क्र. | वर्ष | | तरतूद | लाभार्थी | खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ |
| १ | २०१८-२०१९ | .. | ५०००० | २४८०२६६ | ३२७२०४ |
| २ | २०१९-२०२० | .. | ७४७११ | १५९१४०० | २३८७१ |
| ३ | २०२०-२०२१ | .. | २००००० | ० | ० |
| ४ | २०२१-२०२२ | .. | २००००० | ० | ० |
| ५ | २०२२-२०२३ (अपेक्षित) | .. | २००००० | १९३९८५४ | २००००० |
| ६ | २०२३-२०२४ (अंदाजित) | .. | २००००० | १९३९८५४ | २००००० |

६. उद्दिष्टांपेक्षा कमी साध्य झालेले असल्यास, त्याची कारणे. .. --

७. योजना अंमलबजावणीतील झालेले असल्यास, त्याची कारणे. .. --

८. अडचणी निवारण करण्यासाठी करण्यात आलेली उपाययोजना. .. --

# इयत्ता ११ वी, १२ वीमध्ये मुलींना मोफत शिक्षण

## ( लेखाशीर्ष - २२०२२५२३ )

| | | | |
|---|---|---|---|
| १. | योजनेचे नाव व प्रस्तावना | .. | इयत्ता ११ वी, १२ वीमध्ये मुलींना मोफत शिक्षण. |
| २. | योजना/कार्यक्रमाचे स्वरूप/माहिती व व्याप्ती. | .. | शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजना विभाग, क्रमांक एफईडी-१९८३/१५६७२/साशि-५, दिनांक २४ ऑगस्ट १९८३ अन्वये राज्यातील शासनमान्य अनुदानित व विनाअनुदानित माध्यमिक शाळांतील मुलींना इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंतचे शिक्षण मोफत करण्याचा निर्णय जाहीर केला. त्यानंतर पुन्हा शासनाने राज्यातील सर्वच मुलींना मोफत शिक्षण देण्याच्या हेतूने शासन निर्णय, दिनांक ६ फेब्रुवारी १९८७ अन्वये १ ली ते १२ वी पर्यंतचे शिक्षण मोफत केलेले आहे. या योजनेचा समावेश १ ली ते १० वी पर्यंत सर्वांना मोफत शिक्षण या योजनेत १९९६-९७ पासून झाला आहे. त्यामुळे सद्य:स्थितीत इयत्ता ११ वी, १२ वी या दोन इयत्तांना फक्त मुलींचा समावेश या योजनेत होतो. शैक्षणिक वर्षात किमान आवश्यक उपस्थिती आणि समाधानकारक प्रगती या अटींवर पुढील शैक्षणिक वर्षी ही सवलत चालू राहते. एखादी विद्यार्थिनी शैक्षणिक वर्षात अनुत्तीर्ण झाल्यास आणि तिने त्याच वर्षात पुन्हा प्रवेश घेतल्यास विद्यार्थिनीला या योजनेचा लाभ मिळू शकत नाही. अनुदानित उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालये यांच्या वेतनावर १०० टक्के अनुदान शासनाकडून दिले जात असल्याने या योजनेखाली अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयांना फक्त सत्र शुल्क / प्रवेश शुल्क यांची प्रतिपूर्ती करण्यात येते आणि विना अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयाच्या बाबतीत शैक्षणिक शुल्क, सत्र शुल्क यांची प्रमाणित दराने प्रतिपूर्ती करण्यात येते.<br>या योजनेच्या लाभासाठी कोणत्याही प्रकारच्या उत्पन्नाची अट नाही. त्यामुळे सर्व आर्थिक स्तरावरील विद्यार्थिनी आपोआपच या योजनेला पात्र ठरतात. कुटुंबातील पहिल्या तीन अपत्यांपर्यंत या योजनेचा लाभ मिळेल. |
| ३. | योजनेचा उद्देश | .. | राज्यातील सर्वच मुलींना मोफत शिक्षण मिळावे. |
| ४. | अंमलबजावणी यंत्रणा | .. | शिक्षणाधिकारी (माध्यमिक योजना), जिल्हा परिषद. |

५. योजनेची उद्दिष्टे, आर्थिक तरतूद तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च :

(रुपये हजारांत)

| अ. क्र. | वर्ष | | तरतूद | लाभार्थी | खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ |
| १ | २०१८-२०१९ | .. | २५१०७ | २४४५६१ | १८३४२ |
| २ | २०१९-२०२० | .. | २५१०७ | २९८८८९ | १२३८३ |
| ३ | २०२०-२०२१ | .. | २०००० | ० | ० |
| ४ | २०२१-२०२२ | .. | २०००० | ३१४१९१ | १३०१७.४७ |
| ५ | २०२२-२०२३ (अपेक्षित) | .. | २०००० | १२९९३६४ | २०००० |
| ६ | २०२३-२०२४ (अंदाजित) | .. | २०००० | १२९९३६४ | २०००० |

| | | | |
|---|---|---|---|
| ६. | उद्दिष्टांपेक्षा कमी साध्य झालेले असल्यास, त्याची कारणे. | .. | -- |
| ७. | योजना अंमलबजावणीतील अडचणी | .. | -- |
| ८. | अडचणी निवारण करण्यासाठी करण्यात आलेली उपाययोजना. | .. | -- |

# आदिवासी विद्यार्थ्यांना विद्यावेतन

## ( लेखाशीर्ष - २२०२१२०४ )

१. योजनेचे नाव व प्रस्तावना .. आदिवासी विद्यार्थ्यांना विद्यावेतन.

२. योजना/कार्यक्रमाचे स्वरूप/माहिती व व्याप्ती. .. गरिबीमुळे आदिवासी विद्यार्थी-विद्यार्थिनींचे शाळेत उपस्थित राहण्याचे प्रमाण कमी आहे ते नियमित शाळेत उपस्थित रहावेत याकरिता त्यांना मोफत गणवेश, पुस्तके, पाट्या इत्यादी साहित्य पुरविण्यात येत असले तरीही ते शाळेत येत नाहीत म्हणून त्या मुलांना शाळेत येण्याकरिता प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने त्यांना विद्यावेतन देण्याची योजना शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य विभाग, क्रमांक टीएसी-१३७७/इडी-२२६०७/१२०८-(एसी)-१५/पर्यटन, दिनांक ११ ऑगस्ट १९७७ अन्वये राबविण्यात येत आहे. या योजनेद्वारे अनुसूचित जमातीच्या (इयत्ता ५ वी ते १० वी) विद्यार्थ्यांना वर्षाला रुपये ५०० सरासरी विद्यावेतन देण्यात येते.

| इयत्ता | मुलांना | मुलींना |
|---|---|---|
| ५ वी ते ७ वी | रुपये ४० | रुपये ५० |
| ८ वी ते १० वी | रुपये ५० | रुपये ६० |

ज्या ठिकाणी मोफत राहण्याची व जेवणाची सोय असते अशा आश्रम व निवासी शाळेतील विद्यार्थी विद्यावेतनास पात्र नाहीत. विद्यावेतन मिळण्यासाठी चांगली वर्तणूक व कमीत कमी ७५ टक्के उपस्थिती, अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र एवढ्याच अटी आहेत.

३. योजनेचा उद्देश .. गरीब आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणाची गोडी निर्माण व्हावी व शैक्षणिक उन्नती व्हावी.

४. अंमलबजावणी यंत्रणा .. शिक्षणाधिकारी (माध्यमिक योजना), जिल्हा परिषद.

५. योजनेची उद्दिष्टे, आर्थिक तरतूद तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च :

(रुपये हजारांत)

| अ. क्र. | वर्ष | तरतूद | लाभार्थी | खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | २०१८-२०१९ .. | १०३२ | ११५० | ६९२ |
| २ | २०१९-२०२० .. | १००० | २५६ | १५४ |
| ३ | २०२०-२०२१ .. | ५०० | ० | ० |
| ४ | २०२१-२०२२ .. | ५०० | २९९ | १८०.४ |
| ५ | २०२२-२०२३ (अपेक्षित) .. | ५०० | ४५० | ५०० |
| ६ | २०२३-२०२४ (अंदाजित) .. | ५०० | ४५० | ५०० |

६. उद्दिष्टांपेक्षा कमी साध्य झालेले असल्यास, त्याची कारणे. .. आदिवासी विभागाची समांतर योजना सुरू झाल्याने लाभार्थी कमी मिळतात.

७. योजना अंमलबजावणीतील अडचणी .. --

८. अडचणी निवारण करण्यासाठी करण्यात आलेली उपाययोजना. .. --

# अध्यापक विद्यालयामधील महिलांसाठी ३० टक्के आरक्षण व मोफत शिक्षण

१. योजनेचे नाव व प्रस्तावना .. अध्यापक विद्यालयामधील महिलांसाठी ३० टक्के आरक्षण व मोफत शिक्षण.

२. योजना/कार्यक्रमाचे स्वरूप/माहिती व व्याप्ती. .. स्त्री शिक्षणास प्रोत्साहन दिल्यामुळे महिला शिक्षकांच्या संख्येत वाढ व्हावी या उद्देशाने महिला साक्षरतेच्या राष्ट्रीय प्रमाणापेक्षा स्त्री साक्षरतेचे प्रमाण कमी असलेल्या महाराष्ट्रातील औरंगाबाद, जालना, लातूर, नांदेड, उस्मानाबाद, परभणी, बीड, धुळे, नंदुरबार व गडचिरोली या जिल्ह्यांतील शासकीय अनुदानित व विनाअनुदानित अध्यापक विद्यालयातील प्रवेश क्षमतेच्या ५० टक्के जागा महिलांसाठी आरक्षित ठेवण्यास शासन निर्णय, क्रमांक टीसीएम-१०९६/(८/९६) माशि-४, दिनांक ५ सप्टेंबर १९९६ अन्वये संमती देण्यात आली होती. शासन निर्णय, क्रमांक टीसीएम-१००१/१५६/२००१/माशि-४, दिनांक ३ ऑगस्ट २००१ अन्वये हे आरक्षण ३० टक्के एवढे करण्यात आले आहे. राज्यातील राज्यस्तरीय गुणवत्तेनुसार करावयाची बी.एड. प्रवेश प्रक्रिया व डी.एड. प्रवेशाकरिता राज्यातील महिलांसाठी ठेवण्यात आलेले ३० टक्के आरक्षण या बाबी विचारात घेऊन राज्यस्तरीय गुणवत्तेनुसार वरील ९ जिल्ह्यातील ज्या मुलींना ३० टक्के महिला आरक्षणातंर्गत प्रवेश देण्यात येईल व त्यापैकी ज्या मुली दारिद्र्य रेषेखाली असतील त्यांना गुणवत्तेनुसार व त्यांच्या पसंतीनुसार राज्यातील कोणत्याही मान्यताप्राप्त शासकीय अनुदानित/विनाअनुदानित विद्यालयात प्रवेश दिला तरी त्यांना मोफत शिक्षण देण्यात येईल. या सवलतीसाठी संबंधित स्त्री उमेदवारांनी त्या जिल्ह्यात १५ वर्षे रहिवास असल्याचे प्रमाणपत्र व दारिद्र्य रेषेखाली असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

३. योजनेचा उद्देश .. साक्षरतेच्या राष्ट्रीय प्रमाणापेक्षा स्त्री साक्षरतेचे प्रमाण कमी असलेल्या जिल्ह्यातील दारिद्र्य रेषेखालील महिलांना शिक्षण मिळावे.

४. अंमलबजावणी यंत्रणा .. शिक्षणाधिकारी (माध्यमिक योजना), जिल्हा परिषद.

५. योजनेची उद्दिष्टे, आर्थिक तरतूद तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च :

(रुपये हजारांत)

| अ. क्र. | वर्ष | तरतूद | लाभार्थी | खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | २०१८-२०१९ .. | १२० | -- | -- |
| २ | २०१९-२०२० .. | -- | -- | -- |
| ३ | २०२०-२०२१ .. | -- | -- | -- |
| ४ | २०२१-२०२२ .. | -- | -- | -- |
| ५ | २०२२-२०२३ (अपेक्षित) .. | -- | -- | -- |
| ६ | २०२३-२०२४ (अंदाजित) .. | -- | -- | -- |

६. उद्दिष्टांपेक्षा कमी साध्य झालेले असल्यास, त्याची कारणे. .. दारिद्र्य रेषेखालील उत्पन्नाची मर्यादा अत्यल्प असल्याने पात्र महिलांची प्रकरणे कमी प्रमाणात उपलब्ध होतात. त्यामुळे खर्च कमी होतो. त्यामुळे प्रस्तावित खर्च कमी आहे.

७. योजना अंमलबजावणीतील अडचणी .. दारिद्र्य रेषेच्या मर्यादेनुसार लाभार्थी प्राप्त होत नाहीत.

८. अडचणी निवारण करण्यासाठी करण्यात आलेली उपाययोजना. .. --

# टंचाईग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफी / प्रतिपूर्ती

## ( लेखाशीर्ष - २२०२२५८८ )

| | | | |
|---|---|---|---|
| १. | योजनेचे नाव व प्रस्तावना | .. | टंचाईग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफी / प्रतिपूर्ती. |
| २. | योजना/कार्यक्रमाचे स्वरूप/माहिती व व्याप्ती. | .. | शासन निर्णय, क्रमांक एफईडी/१५९२/१२०२/(११३२) साशि-५, दिनांक १८ ऑक्टोबर १९९३ अन्वये राज्यातील टंचाईग्रस्त भागातील विद्यार्थ्यांची विद्यापीठे व परीक्षा मंडळे यांची परीक्षा फी माफ करण्याची योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. दिनांक १ ऑगस्ट २०१९ च्या शासन निर्णयानुसार सदर योजनेत सुधारणा करण्यात आली असून यामध्ये प्रात्यक्षित शुल्क, गुणवत्ता प्रमाणपत्र शुल्क इत्यादी समाविष्ट करण्यात आला आहे. त्यानुसार शासनाने जाहीर केलेल्या दुष्काळी गावातील इ. बी. सी. धारक विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफी सवलतीचा लाभ दिला जातो. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या इयत्ता १० वी/१२ वी च्या विद्यार्थ्यांना परीक्षा फी-ची प्रतिपूर्ती शालेय शिक्षण विभागाकडून करण्यात येते. ज्या गावांची अंतिम पैसेवारी ५० पेक्षा कमी असते ती गावे टंचाईग्रस्त म्हणून जिल्हाधिकाऱ्यांकडून जाहीर केली जातात. |
| ३. | योजनेचा उद्देश | .. | दुष्काळ पडलेल्या गावातील आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय मुलांना परीक्षा फीची प्रतिपूर्ती करून आर्थिक साहाय्य करण्याच्या उद्देशाने. |
| ४. | अंमलबजावणी यंत्रणा | .. | विभागीय शिक्षण उपसंचालक. |

५. योजनेची उद्दिष्टे, आर्थिक तरतूद तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च :

(रुपये हजारांत)

| अ. क्र. | वर्ष | तरतूद | लाभार्थी | खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | २०१८-२०१९ .. | ५४३९ | १०८७८ | ५४३९ |
| २ | २०१९-२०२० .. | ५४३९ | २२७०९५ | २१९१०९ |
| ३ | २०२०-२०२१ .. | ५५०० | १०८७८ | ५५०० |
| ४ | २०२१-२०२२ .. | ५५०० | ९२४६ | ४६७५ |
| ५ | २०२२-२०२३ (अपेक्षित) .. | ५५०० | १०५०० | ५५०० |
| ६ | २०२३-२०२४ (अंदाजित) .. | ५५०० | १०५०० | ५५०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ६. | उद्दिष्टांपेक्षा कमी साध्य झालेले असल्यास, त्याची कारणे. | .. | टंचाई जाहीर झाल्यानुसार मागणी असल्यामुळे खर्च कमी/जास्त होतो. |
| ७. | योजना अंमलबजावणीतील अडचणी | .. | प्रतिवर्षी दुष्काळ पडतोच असे नाही किंवा दुष्काळ भागातील गावांची नावे आर्थिक वर्षाच्या शेवटी जाहीर केली जातात. त्यामुळे प्रस्तावित तरतुदीचा अंदाज निश्चित करणे अवघड जाते. आर्थिक वर्षात जाहीर केलेली दुष्काळी गावांची नावे निश्चित झाल्यानंतर त्या विद्यार्थ्यांना त्याच आर्थिक वर्षात फी ची प्रतिपूर्ती करणे शक्य होत नाही, पुढील वर्षी लाभ देण्यात येतो. |
| ८. | अडचणी निवारण करण्यासाठी करण्यात आलेली उपाययोजना. | .. | संबंधित विद्यार्थ्यास परीक्षा फी-ची प्रतिपूर्ती त्याच वर्षी करण्यासाठी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांचेमार्फत सदर योजना राबविण्यात यावी असे शिक्षण संचालनालयाचे मत आहे. |

## प्राथमिक शिक्षकांच्या मुलांना मोफत शिक्षण

## ( लेखाशीर्ष - २२०२१४२९ )

१. योजनेचे नाव व प्रस्तावना .. प्राथमिक शिक्षकांच्या मुलांना मोफत शिक्षण

२. योजना/कार्यक्रमाचे स्वरूप/माहिती व व्याप्ती. .. राज्यातील शासनमान्य खाजगी संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था यामधील प्राथमिक शिक्षकांच्या मुलांना, मुलींना फी माफीची सवलत शासन निर्णय, क्रमांक पीआरई/७०६७/एफ, दिनांक १८ जून १९६८ अन्वये देण्यात येते. शासन निर्णय, क्रमांक पीआरई/७०८१/१५५५४७/(१२११) जीइएन-५, दिनांक २५ मार्च १९८१ पासून माध्यमिक शाळांना जोडल्या गेलेल्या इयत्ता ५ वी ते ७ वी च्या वर्गांना शिकविणाऱ्या एस.सी./डी.एड्. अथवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण झालेल्या शिक्षकांच्या पाल्यांना प्राथमिक पदव्युत्तर स्तरापर्यंत मोफत शिक्षण जाहीर झाले. पूर्वी जी सवलत प्राथमिक शाळेत शिकवत असलेल्या शिक्षकांच्या पाल्यांना होती त्याची व्याप्ती वाढविण्यात आलेली आहे. शासन निर्णय, क्रमांक एफईडी-१०९६/२१८६/९६/(२७०/९८) माशि-८, दिनांक ३ फेब्रुवारी १९९९ अनुसार विनाअनुदानित शिक्षण संस्थेतील वैद्यकीय, अभियांत्रिकी व इतर व्यावसायिक अभ्यासक्रमाची पदवी प्राप्त करण्यासाठी (मुक्त जागी) प्रवेश मिळालेल्या तसेच विनाअनुदानित संस्थेतील इतर मान्यताप्राप्त सर्वसाधारण अभ्यासक्रमासाठी ज्याकरिता प्रमाणित दराने फी आकारली जाते अशा अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या प्राथमिक शिक्षकांच्या पाल्यांना मोफत शिक्षण देण्याची योजना १९९८-९९ या शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्यात आली आहे. ही सवलत प्राथमिक शिक्षकांच्या कोणत्याही दोन पाल्यांना अनुज्ञेय राहील.

३. योजनेचा उद्देश .. शासनाच्या धोरणात्मक निर्णयानुसार योजना राबविण्यात येते.

४. अंमलबजावणी यंत्रणा .. शिक्षणाधिकारी (माध्यमिक योजना), जिल्हा परिषद.

५. योजनेची उद्दिष्टे, आर्थिक तरतूद तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च :

(रुपये हजारांत)

| अ. क्र. | वर्ष | | तरतूद | लाभार्थी | खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ |
| १ | २०१८-२०१९ | .. | १०६४० | २३५४ | ४७०९ |
| २ | २०१९-२०२० | .. | १०४१० | २३५४ | २९४९ |
| ३ | २०२०-२०२१ | .. | ५००० | ० | ० |
| ४ | २०२१-२०२२ | .. | ५००० | १४७८ | १८५२ |
| ५ | २०२२-२०२३ (अपेक्षित) | .. | ५००० | २००० | ५००० |
| ६ | २०२३-२०२४ (अंदाजित) | .. | ५००० | २००० | ५००० |

६. उद्दिष्टांपेक्षा कमी साध्य झालेले असल्यास, त्याची कारणे. .. --

७. योजना अंमलबजावणीतील अडचणी .. --

८. अडचणी निवारण करण्यासाठी करण्यात आलेली उपाययोजना. .. --

## माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा तसेच अध्यापक विद्यालयातील सर्व स्तरावरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना पदव्युत्तर स्तरापर्यंत मोफत शिक्षण

**( लेखाशीर्ष - २२०२२९२७ )**

१. योजनेचे नाव व प्रस्तावना .. माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा तसेच अध्यापक विद्यालयातील सर्व स्तरावरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना पदव्युत्तर स्तरापर्यंत मोफत शिक्षण.

२. योजना/कार्यक्रमाचे स्वरूप/माहिती व व्याप्ती. .. शासन निर्णय, शालेय शिक्षण, विभाग क्रमांक एफईडी/१०९५/५४७८२/(१७७९/९५) साशि-५, दिनांक १९ ऑगस्ट १९९५ अन्वये १९९५-९६ या शैक्षणिक वर्षापासून राज्यातील अनुदानित अशासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील शाळा व अध्यापक विद्यालयातील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे पाल्यांना सर्व स्तरावर मोफत शिक्षण देण्याची योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. या योजनेखाली शिक्षण शुल्क, प्रवेश शुल्क, प्रयोगशाळा शुल्क व परीक्षा शुल्क यांची प्रतिपूर्ती करण्यात येते. इयत्ता १० वी पर्यंत सर्वांना नि:शुल्क शिक्षण देण्याची योजना कार्यान्वित असल्याने या योजनेचा लाभ उच्च माध्यमिक स्तर व तत्सम अभ्यासक्रमाखालील इतर लाभार्थी तसेच पदवी/पदव्युत्तर स्तरावरील उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी/विद्यार्थीनींना देण्यात येतो. व्यावसायिक अभ्यासक्रमाखाली अनुदानित तसेच विनाअनुदानित शिक्षण संस्थेत मुक्त जागी प्रवेश घेतलेल्या शिक्षकांच्या पाल्यांना प्रमाणित दराने फीची प्रतिपूर्ती करण्यात येते. या सवलती समाधानकारक प्रगती, चांगली वर्तणूक व नियमित उपस्थिती असल्यास विहित अभ्यासक्रम संपेपर्यंत चालू राहतात.

३. योजनेचा उद्देश .. शासनाच्या धोरणात्मक निर्णयानुसार सदर योजना राबविण्यात येते.

४. अंमलबजावणी यंत्रणा .. शिक्षणाधिकारी (माध्यमिक योजना), जिल्हा परिषद.

५. योजनेची उद्दिष्टे, आर्थिक तरतूद तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च :

(रुपये हजारांत)

| अ. क्र. | वर्ष | तरतूद | लाभार्थी | खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | २०१८-२०१९ .. | -- | -- | -- |
| २ | २०१९-२०२० .. | -- | -- | -- |
| ३ | २०२०-२०२१ .. | -- | -- | -- |
| ४ | २०२१-२०२२ .. | -- | -- | -- |
| ५ | २०२२-२०२३ (अपेक्षित) .. | -- | -- | -- |
| ६ | २०२३-२०२४ (अंदाजित) .. | -- | -- | -- |

६. उद्दिष्टांपेक्षा कमी साध्य झालेले असल्यास, त्याची कारणे. .. —

७. योजना अंमलबजावणीतील अडचणी .. —

८. अडचणी निवारण करण्यासाठी करण्यात आलेली उपाययोजना. .. —

# धार्मिक अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी असलेली प्रि-मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना
# १०० टक्के केंद्र पुरस्कृत योजना

१. योजनेचे नाव व प्रस्तावना .. धार्मिक अल्पसंख्याक इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी असलेली प्रि-मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना.

२. योजना/कार्यक्रमाचे स्वरूप/माहिती व व्याप्ती. .. अल्पसंख्याक समाजाच्या कल्याणासाठी मा. पंतप्रधान यांनी घोषित केलेल्या १५ कलमी कार्यक्रमानुसार केंद्र शासनाने अल्पसंख्याक समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या इयत्ता १ ली ते १० वी या वर्गातील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांसाठी शासन निर्णय, क्रमांक पंपका-२००७/२७०/०७/असंक, दिनांक २३ जुलै २००८ अन्वये अल्पसंख्याक मुस्लीम, ख्रिश्चन, बौद्ध, शीख, पारशी व जैन समाजातील विद्यार्थ्यांसाठी प्रि-मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना सन २००८-०९ पासून सुरू केली आहे. मागील वर्षी ५० टक्केपेक्षा जास्त गुणाने उत्तीर्ण झालेले तसेच पालकांचे वार्षिक उत्पन्न रुपये एक लाखापेक्षा कमी असलेले विद्यार्थी या योजनेस पात्र ठरणार आहेत. मुलींसाठी ३० टक्के शिष्यवृत्ती राखीव आहे. कुटुंबातील दोन पेक्षा जास्त विद्यार्थी सदर योजनेचा लाभ घेऊ शकत नाहीत. सदर योजना राज्यातील इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतच्या सर्व मान्यता प्राप्त शासकीय / निमशासकीय / खाजगी शाळांमधून शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी लागू आहेत. सन २०१४-१५ पासून सदर योजना १०० टक्के केंद्र शासन अनुदानित झालेली आहे. तसेच सन २०१५-१६ पासून शिष्यवृत्तीचे वितरण केंद्र शासनामार्फत लाभार्थ्यांच्या बँक खात्यात DBT (Direct Benefit Transfer) mode द्वारे करण्यात येत आहे.

३. योजनेचा उद्देश .. धार्मिक अल्पसंख्याक आर्थिकदृष्ट्या मागास गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना इयत्ता १ ली ते १० वी पर्यंत शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे, विद्यार्थ्यांची गळती थांबावी व अल्पसंख्याक पालकांना त्यांच्या पाल्यास शाळेत पाठविण्यास उत्तेजन देण्यासाठी ही योजना राबविण्यात येत आहे. शिक्षणाद्वारे मुलांचे सक्षमीकरण करणे हा योजनेचा हेतू आहे.

४. अंमलबजावणी यंत्रणा .. संचालक, अल्पसंख्याक व प्रौढ शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

**सदर योजनेसाठी शिष्यवृत्तीचे खालीलप्रमाणे दर आहे**

| अ.क्र. | बाब | वसतिगृहात राहणारे विद्यार्थी | वसतिगृहात बाहेरील विद्यार्थी |
|---|---|---|---|
| १) | प्रवेश शुल्क इयत्ता ६ वी ते १० वी | रुपये ५०० प्रतीवर्ष प्रत्यक्षात असलेल्या शुल्काच्या मर्यादेत. | रुपये ५०० प्रतीवर्ष प्रत्यक्षात असलेल्या शुल्काच्या मर्यादेत. |
| २) | शिक्षण शुल्क इयत्ता ६ वी ते १० वी | रुपये ३५० प्रतीमाह प्रत्यक्षात असलेल्या शुल्काच्या मर्यादेत. | रुपये ३५० प्रतीमाह प्रत्यक्षात असलेल्या शुल्काच्या मर्यादेत. |
| ३) | परिरक्षण भत्ता शैक्षणिक वर्षात १० महिन्यांकरिता | -- | -- |
| | इयत्ता १ ली ते ५ वी | -- | रुपये १०० प्रतीमाह. |
| | इयत्ता ६ वी ते १० वी | रुपये ६०० प्रतीमाह प्रत्यक्षात असलेल्या शुल्काच्या मर्यादेत. | रुपये १०० प्रतीमाह |

५. सन २०२१-२२ च्या वर्षात केंद्र शासनाने धार्मिक अल्पसंख्याक नवीन विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीसाठी कोटा मंजूर केला आहे तो खालीलप्रमाणे.-

| मुस्लीम | ख्रिश्चन | बौद्ध | शीख | पारशी | जैन | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १,६६,४०४ | १३,८५६ | ८३,७८७ | २,८६४ | ५७५ | १७,९६५ | २,८५,४५१ |

६. योजनेची भौतिक उद्दिष्टे, आर्थिक तरतूद तसेच वर्षनिहाय साध्य व झालेला खर्च. .. धार्मिक अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी असलेली प्रि-मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना ही १०० टक्के केंद्र शासन पुरस्कृत योजना असून सन २०१५-१६ पासून या योजनेंतर्गत मिळणारी शिष्यवृत्ती रक्कम केंद्र शासनामार्फत PFMS द्वारे थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर DBT mode ने जमा केली जाते.

**सन २०२१-२०२२**

| | उद्दिष्ट | | साध्य | | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | भौतिक (विद्यार्थी) | आर्थिक (रुपये) | भौतिक (विद्यार्थी) | आर्थिक (रुपये कोटींमध्ये) | |
| नवीन | २,८५,४५१ | -- | ३,०१,७४२ | ८८.८५ | निवास व अनिवासी विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्तीची रक्कम वेगवेगळी असल्यामुळे आर्थिक उद्दिष्ट निश्चित करता येत नाही. |
| नूतनीकरण | ७,०८,६७८ | -- | ५,००,३७९ | | |

सन २०२१-२२ या वर्षात केंद्र शासनाने धार्मिक अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी खालीलप्रमाणे शिष्यवृत्तीचे संच मंजूर केले आहेत.

| | मुस्लीम | ख्रिश्चन | बौद्ध | शीख | पारशी | जैन | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| नवीन | २,२१,४५५ | ११७८ | ७१,५३८ | ७८१ | १३ | ६७७७ | ३,०१,७४२ |
| नूतनीकरण | ३८३४६२ | २२५४ | १,०१,७६३ | १०७१ | २३ | ११,८०६ | ५,००,३७९ |
| **एकूण ..** | **६,०४,९१७** | **३,४३२** | **५,५९,२१९** | **१,८५२** | **३६** | **१८,५८३** | **८,१२,१२१** |

उद्दिष्टांपेक्षा कमी साध्य झालेले असल्यास त्याची कारणे ..

(१) सन २०२१-२२ मध्ये नवीन विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र राज्याकरिता असलेला कोटा २,८५,४५१ पैकी ३,०१,७४२ इतक्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळालेला आहे. (कारण जाहीर केलेल्या धर्मनिहाय कोट्यापेक्षा कमी अर्ज न आल्यामुळे).

(२) नूतनीकरणाचे जे विद्यार्थी शाळा बदलतात किंवा इतर शिष्यवृत्तीचा लाभ घेतात त्यांना नूतनीकरणाचा अर्ज समर्पित करून नवीन विद्यार्थी म्हणून अर्ज करावा लागतो. १,३३,४०६ नूतनीकरण विद्यार्थ्यांनी त्यांचे नूतनीकरणाचे अर्ज समर्पित केले.

(३) गुण व उत्पन्न या अटींमध्ये पात्र न झाल्यामुळे काही अर्ज उद्दिष्टांपेक्षा कमी आले.

७. योजना अंमलबजावणीतील अडचणी .. या शिष्यवृत्तीसाठी अल्पसंख्याक विद्यार्थ्यांचे अर्ज ऑनलाईन पद्धतीने National Scholarship Portal (NSP 2.0) या वेबसाईटवर भरावे लागतात. देशभरात विविध प्रकारच्या शिष्यवृत्तींचे ऑनलाईन अर्ज सदर पोर्टलवर विहित मुदतीत भरले जात असल्याने पोर्टलची कार्यप्रणाली काही कालावधीसाठी मंदगतीने चालू राहते. विद्यार्थ्यांची कागदपत्रे वेळेमध्ये शाळेमध्ये जमा न केलेने अर्जांची पडताळणी विहित मुदतीत होण्यास विलंब लागतो.

८. अडचणी निवारण करण्यासाठी करण्यात आलेली उपाययोजना. .. प्रि-मॅट्रिक शिष्यवृत्तीचे ऑनलाईन अर्ज भरणे व त्या अर्जांची पडताळणी करण्याची अंतिम मुदत आवश्यकतेनुसार वाढवून दिली जाते.

९. वर्षनिहाय तरतूद, लाभार्थी व त्यावर झालेला खर्च : (रुपये कोटी)

| अ. क्र. | वर्ष | तरतूद | लाभार्थी | खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | २०१५-१६ .. | | ५,११,८८४ | ५२.४० कोटी |
| २ | २०१६-१७ .. | केंद्र शासनामार्फत DBT Mode द्वारे शिष्यवृत्तीची रक्कम थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर जमा केली जाते. | ४,४५,६३५ | ४७.२५ कोटी |
| ३ | २०१७-१८ .. | | ६,२०,५५६ | ६८.१८ कोटी |
| ४ | २०१८-१९ .. | | ६,८८,३१० | ७७.१२ कोटी |
| ५ | २०१९-२० .. | | ७,४४,२७३ | ८६.६६ कोटी |
| ६ | २०२०-२१ .. | | ७,३४,८१९ | ८१.६५ कोटी |
| ७ | २०२१-२२ .. | | ८,०२,१२१ | ८८.२५ कोटी |

१०. अधिक माहितीसाठी संकेतस्थळ : **www.scholarships.gov.in**

## पूर्व माध्यमिक / माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांसाठी खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती

### ( लेखाशीर्ष - २२०२-०३५१ )

१. योजनेचे नाव .. पूर्व माध्यमिक व माध्यमिक शाळातील विद्यार्थ्यांसाठी खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती

२. योजनेचे/स्वरूप/उद्देश .. गुणवान विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी पूर्व माध्यमिक व माध्यमिक शाळातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याची योजना अस्तित्वात आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेत असलेल्या स्पर्धात्मक परीक्षांच्या निकालावर प्रामुख्याने गुणवत्तेनुसार शिष्यवृत्या दिल्या जातात. ही शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांची समाधानकारक प्रगती व चांगल्या वर्तणुकीच्या आधारे पुढे चालू रहाते. शिष्यवृत्तीचा कालावधी तीन वर्षांचा आहे. ही शिष्यवृत्ती शैक्षणिक वर्षात १० महिन्यासाठी दिली जाते. प्रत्येक जिल्ह्याचे ग्रामीण व नागरी क्षेत्रासाठी शिष्यवृत्यांचे स्वतंत्र व ठराविक संच निर्धारित केलेले आहेत. शासन निर्णय क्रमांक एससीएच/२००९/९०/९/केपुयो, दिनांक २२ जुलै २०१० अन्वये पुढीलप्रमाणे राज्यात पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती व माध्यमिक शिष्यवृत्ती संच मंजूर करण्यात आले आहेत. सदरची शिष्यवृत्ती बँकेमार्फत शिष्यवृत्तीधारकाच्या खात्यावर सन २०१०-११ पासून जमा करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आलेला आहे. बृहन्मुंबई क्षेत्रातील पूर्व माध्यमिक व माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते.

३. योजनेचे निकष .. पूर्व माध्यमिक / माध्यमिक शाळातील विद्यार्थ्यांसाठी खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती परीक्षा पास होऊन गुणवत्ता यादीत नाव असणे आवश्यक आहे. (मान्य संचानुसार शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरविण्यात येते ).

४. साध्य .. वर्षनिहाय तरतूद, लाभार्थी व त्यावर झालेला खर्च :

(रुपये हजारांत)

| अ. क्र. | वर्ष | | तरतूद | लाभार्थी | खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ |
| १ | २०१८-१९ | .. | ८८०५ | ६३७८ | ८८०४ |
| २ | २०१९-२० | .. | २६०२७ | १६३९१ | २१०२६ |
| ३ | २०२०-२१ | .. | ५००० | ३९६० | ५००० |
| ४ | २०२१-२२ | .. | १०००० | ६८५० | ८५०० |
| ५ | २०२२-२३ (अपेक्षित) | .. | १०००० | ६८५० | १०००० |
| ६ | २०२३-२४ (अंदाजित) | .. | १०००० | -- | १०००० |

६. उद्दिष्टांपेक्षा कमी साध्य झालेले असल्यास, त्याची कारणे. .. —

७. योजना अंमलबजावणीतील अडचणी .. —

८. अडचणी निवारण करण्यासाठी करण्यात आलेली उपाययोजना. .. —

# राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती योजना

| | | | |
|---|---|---|---|
| १. | योजनेचे नाव व प्रस्तावना | .. | राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती योजना |
| २. | योजना/कार्यक्रमाचे स्वरूप/ माहिती व व्याप्ती. | .. | सदर योजना केंद्र पुरस्कृत असून राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन प्राशिक्षण परिषद, नवी दिल्ली (एन.सी. इ.आर.टी.) यांनी सन २००७-०८ पासून आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी सदरची परीक्षा इयत्ता ८ वी पासून सुरू केली आहे. महाराष्ट्र राज्यासाठी ही परीक्षा महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फत जिल्ह्यातील विविध केंद्रांवर सर्वसाधारण नोव्हेंबर महिन्यामध्ये घेण्यात येते. महाराष्ट्रासाठी जिल्हानिहाय विद्यार्थीसंख्येनुसार दरवर्षी केंद्र शासनाकडून राज्यासाठी निश्चित केलेल्या कोट्यानुसार वार्षिक रुपये १०,००० शिष्यवृत्ती दिली जाते. ही शिष्यवृत्ती विद्यार्थ्याला इयत्ता ९ वी ते १२ वी पर्यंत दिली जाते. ज्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न (आई व वडील दोघांचे मिळून) रुपये १,५०,००० पेक्षा कमी आहे व ज्या विद्यार्थ्याला इयत्ता ७ वी मध्ये ५५ टक्केपेक्षा अधिक गुण मिळाले आहेत अशा महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही शासनमान्य अनुदानित, स्थानिक स्वराज्य संस्थेतील इयत्ता ८ वी मध्ये शिकत असलेल्या नियमित विद्यार्थी/विद्यार्थिनीस या परीक्षेस बसता येते. |
| ३. | योजनेचा उद्देश | .. | इयत्ता ८ वी च्या अखेर प्रज्ञावान विद्यार्थ्यांचा शोध घेऊन बुद्धिमान विद्यार्थ्यांना सर्वोत्तम शिक्षण मिळण्याच्या दृष्टीने त्यांना आर्थिक साहाय्य करावे व या साहाय्यातून त्यांची बुद्धिमत्ता विकसित व्हावी, त्या विकसित बुद्धिमत्तेने त्या विद्यार्थ्यांनी आपली विद्याशाखा व राष्ट्र याची सेवा करावी. |
| ४. | अंमलबजावणी यंत्रणा | .. | राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्तीसाठी ज्या विद्यार्थ्यांची केंद्र शासनामार्फत गुणवत्तेनुसार निवड झाली आहे, अशा विद्यार्थ्यांनी बँक खात्याची माहिती शिक्षणाधिकारी यांना सादर केल्यानंतर शिक्षणाधिकारी यांच्यामार्फत विहित नमुन्यात माहिती संचालनालयास प्राप्त होते. संचालनालय स्तरावर सर्व जिल्ह्यांच्या माहितीचे एकत्रीकरण करून विहित नमुन्यातील माहिती केंद्र शासनास सादर करण्यात येते. सन २०१५-१६ या वर्षापासून केंद्र शासनाने सदर योजना ऑनलाईन पद्धतीने राबविण्यास सुरुवात केली असल्याने विद्यार्थ्यां त्यांच्या बँक खात्याची माहिती केंद्र शासनाच्या नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर (www.scholarships.gov.in) ऑनलाईन पद्धतीने भरतात. ऑनलाईन पद्धतीने भरलेली माहिती तो विद्यार्थी ज्या शाळेत आहेत ती शाळा फॉर्म ची पडताळणी करून त्याची उपस्थिती व मार्क तपासून शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्या लॉग इन ला पाठवितात. व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) शाळेने भरलेली माहितीची पडताळणी झाल्यानंतर केंद्र शासनाच्या लॉग इत ला पाठविली जाते. केंद्र शासनामार्फत विद्यार्थ्यांच्या आधार लिंक बँक खात्यात स्टेट बँक ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांच्यामार्फत शिष्यवृत्ती वर्ग केली जाते. |
| ५. | योजनेची उद्दिष्टे, आर्थिक तरतूद तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च. | .. | सदर शिष्यवृत्ती ही केंद्र शासनामार्फत दिली जाते.<br>शासन निर्णय क्रमांक NMMSS-2018/प्र. क्र. 66/एसडी-5, दिनांक २० ऑगस्ट २०१८ पासून रक्कम १२००० रुपये झाली आहे. सदरची शिष्यवृत्ती सन २०१७-१८ देय आहे. |

| वर्ष<br>१ | | | महाराष्ट्रासाठी कोटा<br>२ | शिष्यवृत्तीस पात्र<br>३ |
|---|---|---|---|---|
| अपेक्षित | २०१८-१९ | .. | ११६८२ | ११६८२ |
| अपेक्षित | २०१९-२० | .. | ११६८२ | ११६८२ |
| अपेक्षित | २०२०-२१ | .. | ११६८२ | ११६८२ |
| अपेक्षित | २०२१-२२ | .. | ११६८२ | ११६८२ |
| अपेक्षित | २०२२-२३ | .. | ११६८२ | ११६८२ |
| अंदाजित | २०२३-२४ | .. | ११६८२ | ११६८२ |

| | | | |
|---|---|---|---|
| ६. | उद्दिष्टांपेक्षा कमी साध्य झालेले असल्यास, त्याची कारणे. | .. | विद्यार्थ्यांची निवड गुणवत्ता व आरक्षणानुसार होते. केंद्र शासनाने योजनेकरिता महाराष्ट्र राज्यासाठी ११६८२ शिष्यवृत्त्या (कोटा) ठरवून दिल्या आहेत. |
| ७. | योजना अंमलबजावणीतील अडचणी | .. | विद्यार्थ्यांच्या बँकखाते क्रमांकाची माहिती अचूक व वेळेत मिळत नाही. |
| ८. | अडचणी निवारण करण्यासाठी करण्यात आलेली उपाययोजना. | .. | शिक्षणाधिकारी यांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत. |

# विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी करावयाच्या उपाययोजना

## ( लेखाशीर्ष - २२०२H१५१ )

१. योजनेचे नाव व प्रस्तावना .. विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांतर्गत द्यावयाच्या शैक्षणिक सवलती. पश्चिम विदर्भातील सहा जिल्ह्यांतील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी मा. पंतप्रधान व मा. मुख्यमंत्री यांनी घोषित केलेल्या विशेष पॅकेज अंमलबजावणीसाठी डॉ. नरेंद्र जाधव, कुलगुरू, पुणे विद्यापीठ यांच्या अध्यक्षतेखाली महसूल व वन विभागाच्या क्रमांक एससीवाय-२००७/प्र. क्र. ३२८/म-७, दिनांक १३ नोव्हेंबर २००७ च्या शासन निर्णयान्वये **शेतकरी आत्महत्या प्रतिबंध पॅकेजेस एकसदस्य मूल्यमापन समिती** स्थापन करण्यात आली होती. विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी समितीने शासनास शिफारशी सादर केल्या असून त्यामध्ये शालेय शिक्षण व क्रीडा विभागाशी संबंधित शिफारशी खालीलप्रमाणे आहेत.

(१) संपूर्ण प्रवेश व शैक्षणिक शुल्काचा परतावा महाविद्यालय/शाळेला किंवा पावतीच्या आधारे संबंधित विद्यार्थ्यास करावा.

(२) वह्या, पुस्तके व इतर किरकोळ खर्चापोटी प्रत्येक विद्यार्थ्यास किमान रुपये ५०० वार्षिक अनुदान शैक्षणिक सत्राच्या सुरुवातीस संबंधित शैक्षणिक संस्थांच्यामार्फत वाटप करण्यात यावे. हे अनुदान विद्यार्थ्यास इतर कोणत्याही सदराखाली मिळणाऱ्या शिष्यवृत्तीशिवाय असावे.

२. योजना/कार्यक्रमाचे स्वरूप/माहिती व व्याप्ती. .. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय, क्रमांक एफईडी-२००९/(०६/०९)/केंपुयो, दिनांक २७ फेब्रुवारी २००९ अन्वये पश्चिम विदर्भातील अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वाशिम व वर्धा या सहा जिल्ह्यांतील अत्यंत अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांच्या ४,३४,२९१ कुटुंबातील सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलती देण्यासाठी खालील सर्व बाबीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(१) वरील जिल्ह्यांतील अत्यंत अडचणीत असलेल्या ४,३४,२९१ कुटुंबातील इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंत शिक्षण घेत असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना शासकीय दरानुसार पावतीच्या आधारे संपूर्ण प्रवेश व शैक्षणिक शुल्काचा परतावा अदा करावा.

(२) सदर कुटुंबातील इयत्ता १० वी व १२ वी च्या शालान्त परीक्षेला बसणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांस शासकीय दरानुसार परीक्षा शुल्क माफ करण्यात यावे.

(३) तसेच प्रस्तुत कुटुंबातील शिक्षण घेत असलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यास वह्या, पुस्तके व इतर किरकोळ खर्चापोटी किमान रुपये ५०० वार्षिक अनुदान शैक्षणिक सत्राच्या सुरुवातीस संबंधित शैक्षणिक संस्थांच्यामार्फत अदा करण्यात यावे.

(४) सदर योजना इयत्ता १ ली ते १२ वी च्या सर्व शासकीय / निमशासकीय / शासकीय अनुदानित /विनाअनुदानित खाजगी शाळांमधून शिक्षण घेणाऱ्या पात्र लाभार्थींना लागू असेल.

उपरोक्त योजनेसाठी लाभार्थींचे पुन:सर्वेक्षण व पुन:प्रमाणिकरण जिल्हाधिकाऱ्यांमार्फत करण्यात येणार असून जिल्हाधिकारी यांनी प्रमाणित केलेल्या लाभार्थ्यांनाच या योजनेचा लाभ देण्यात येईल. या योजनेची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २००८-०९ पासून करण्यात येत आहे.

३. योजनेचा उद्देश .. शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखणे.

४. अंमलबजावणी यंत्रणा .. विभागीय शिक्षण उपसंचालक, अमरावती व नागपूर यांना तरतुदीचे वाटप केले जाते व शिक्षण उपसंचालकांचे स्तरावर सदर योजना राबविण्यात येते.

५. योजनेची उद्दिष्टे, आर्थिक तरतूद तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च : (रुपये हजारांत)

| अ. क्र. | वर्ष | | तरतूद | लाभार्थी | खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ |
| १ | २०१८-१९ | .. | ३७१२६ | ५९३७८ | २९६८६ |
| २ | २०१९-२० | .. | २५९८८ | २६६१२ | १३३०६ |
| ३ | २०२०-२१ | .. | ४०००० | ० | ० |
| ४ | २०२१-२२ | .. | ४०००० | ० | ० |
| ५ | २०२२-२३ (अपेक्षित) | .. | ४०००० | २५००० | ४०००० |
| ६ | २०२३-२४ (अंदाजित) | .. | ४०००० | २५००० | ४०००० |

६. उद्दिष्टांपेक्षा कमी साध्य झालेले असल्यास, त्याची कारणे. .. निरंक

७. योजना अंमलबजावणीतील अडचणी .. --

८. अडचणी निवारण करण्यासाठी करण्यात आलेली उपाययोजना. .. --

## माध्यमिक शाळेतील मुलींना राष्ट्रीय योजनेतून (NSIGSE) रुपये ३,००० प्रोत्साहन भत्ता

| | | | |
|---|---|---|---|
| १. | योजनेचे नाव व प्रस्तावना | .. | माध्यमिक शाळेतील मुलींना राष्ट्रीय योजनेतून रुपये ३,००० प्रोत्साहन भत्ता. |
| २. | योजना/कार्यक्रमाचे स्वरूप/माहिती व व्याप्ती. | .. | सदरची योजना खाजगी विनाअनुदानित शाळांमधील व ज्या मुली कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातून इयत्ता ८ वी उत्तीर्ण झालेल्या आहेत, इयत्ता ९ वी मध्ये शिकत असलेल्या अनुसूचित जाती-जमाती मधील वय वर्ष १६ पूर्ण न झालेल्या अविवाहित मुलींसाठीच ही योजना लागू आहे. खाजगी विनाअनुदानित शाळांमधील व केंद्र शासनाकडून चालविल्या जाणाऱ्या शाळांसाठी सदर योजना लागू नाही. |
| ३. | योजनेचा उद्देश | .. | माध्यमिक स्तरावरील १४ ते १८ वयोगटातील मुलींचे गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी एस्‌सी व एसटी संवर्गातील मुलींची संख्या वाढविण्यासाठी व त्या मुली शिक्षणाच्या प्रवाहात १८ वर्षांपर्यंत राहण्यासाठी सदर योजना सुरू करण्यात आली आहे. |
| ४. | अंमलबजावणी यंत्रणा | .. | शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्याकडून इयत्ता ८ वी मध्ये शिकत असलेल्या पात्र विद्यार्थिनीची माहिती विहित नमुन्यात एक्सेल सीटमध्ये प्राप्त करून घेण्यात येते. संचालनालय स्तरावरून माहितीचे एकत्रीकरण करून केंद्र शासनास प्रस्ताव सादर करण्यात येतो. सन २०१५-१६ या वर्षापासून केंद्र शासनाने सदर योजना ऑनलाईन पद्धतीने राबविण्यास सुरुवात केली असल्याने विद्यार्थ्यांच्या बँक खात्याची माहिती नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर (www.scholarships.gov.in) ऑनलाईन पद्धतीने शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडून संचालनालयास (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य पुणे येथे येते. संचालनालयाच्या स्तरावरुन राज्याची एकत्रित माहिती केंद्र शासनास ऑनलाईन पद्धतीने पाठविण्यात येते. सदर योजनेनुसार रुपये ३,००० प्रत्येकी लाभार्थी विद्यार्थिनीच्या नावे सदर लाभार्थी १० वीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर व १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर जमा करण्यात येतात. |
| ५. | योजनेची उद्दिष्टे, आर्थिक तरतूद तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च. | .. | सदर शिष्यवृत्ती ही केंद्र शासनामार्फत दिली जाते. |

| वर्ष<br>१ | | | शिष्यवृत्तीस पात्र<br>२ |
|---|---|---|---|
| | २०१७-१८ | .. | ५०,४१० |
| | २०१८-१९ | .. | ५५,००० |
| | २०१९-२० | .. | ४९,९३० |
| | २०२०-२१ | .. | ४९,९३० |
| अपेक्षित | २०२१-२२ | .. | ४९,९३० |
| अंदाजित | २०२२-२३ | .. | ४९,९३० |

| | | | |
|---|---|---|---|
| ६. | उद्दिष्टांपेक्षा कमी साध्य झालेले असल्यास, त्याची कारणे. | .. | -- |
| ७. | योजना अंमलबजावणीतील अडचणी | .. | विद्यार्थ्यांच्या बँक खाते क्रमांकाची माहिती अचूक व वेळेत मिळत नाही. |
| ८. | अडचणी निवारण करण्यासाठी करण्यात आलेली उपाययोजना. | .. | शिक्षणाधिकारी यांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत. |

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार

१. योजनेचे नाव व प्रस्तावना .. शिक्षण हा समाजाच्या सर्वांगीण विकासाचा पाया आहे. समर्पित वृत्तीने काम करणाऱ्या शिक्षकांमुळेच समाज व राष्ट्राचा विकास होतो. अशा समर्पित वृत्तीने काम करणाऱ्या शिक्षकांना दरवर्षी शालेय शिक्षण व क्रीडा विभागातर्फे राज्य आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविले जाते.

राज्य आदर्श शिक्षक पुरस्काराचे निकष सुधारित करून सन २०२१-२२ पासून सदर पुरस्कार क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार या नावाने देण्यात येत आहेत.

२. योजना/कार्यक्रमाचे स्वरूप/ माहिती व व्याप्ती. .. दिनांक २८ जून २०२२ रोजीच्या शासन निर्णयातील अटी, शर्ती व निकषांनुसार क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्काराचे प्रस्ताव पात्र शिक्षकांकडून शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून ऑनलाईन मागविण्यात येतात. अस्तित्वात असलेल्या मार्गदर्शक सूचना / निकषांनुसार जिल्हास्तरावर जिल्हा निवड समिती प्रस्तावांची छाननी करून प्रवर्गनिहाय पात्र प्रस्ताव शिक्षण संचालक स्तरावर गठीत करण्यात आलेल्या राज्य निवड समितीकडे पाठविते. सदर शिफारशीवर शिक्षकांच्या गुणवत्तेनुसार अंतिम निवड करून राज्य निवड समितीकडून शासनाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात येतात. पुरस्कार सर्वसाधारणपणे १५ ऑगस्ट रोजी जाहीर करून त्याचे प्रत्यक्ष वितरण ५ सप्टेंबर या शिक्षक दिनाच्या दिनांकाला सन्माननीय व्यक्तींच्या हस्ते करण्यात येते. प्रवर्गनिहाय पुरस्कारार्थींची संख्या पुढीलप्रमाणे आहे. प्राथमिक- ३८, माध्यमिक- ३९, आदिवासी क्षेत्रात उत्कृष्ठ काम करणारे शिक्षक (प्राथमिक)-१९, थोर समाजसुधारक क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार- ८, विशेष शिक्षक कला/क्रीडा-२ (१+१), दिव्यांग शिक्षक/दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शाळेतील शिक्षक- १, स्काऊट/गाईड- २ (१+१), अशी एकूण पुरस्कार संख्या १०९ इतकी आहे.

पुरस्कार १५ ऑगस्ट रोजी जाहीर केले जातात व ५ सप्टेंबरला खास समारंभात प्रदान केले जातात. राज्य पुरस्कारप्राप्त शिक्षकांचा रोख रक्कम रुपये १०,००० व प्रशस्तिपत्र सन २०१३ पासून स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात येतो. सन २०१३-१४ पासून राष्ट्रीय /राज्य पुरस्कारप्राप्त शिक्षकांना दोन वेतनवाढी ऐवजी रोख रक्कम रुपये १.०० लाख देण्याचा शासनाने निर्णय घेतला. राष्ट्रीय स्तरावर शिक्षकांना पुरस्कार देण्याची केंद्र शासनाची योजना असून सहा नावे नामनिर्देशित केली जातात. सन २०१५-१६ पासून राज्य आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी Online पद्धतीने आवेदन स्वीकारून कार्यवाही पूर्ण केली असून राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार व राज्यशिक्षक पुरस्कार दोन्हीसाठी ऑनलाईन पद्धतीने आवेदन स्वीकारण्यात येत आहेत.

३. योजनेचा उद्देश .. शिक्षकांना त्यांच्या अंगिकृत कार्यात प्रोत्साहन मिळावे.

४. अंमलबजावणी यंत्रणा .. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

५. योजनेची उद्दिष्टे, आर्थिक तरतूद तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च :

(रुपये हजारांत)

| अ. क्र. | वर्ष | | तरतूद | लाभार्थी | खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ |
| १ | २०१७-१८ | .. | १८१५० | १०७ | १८१५० |
| २ | २०१८-१९ | .. | १९९६५ | १०७ | १८१५० |
| ३ | २०१९-२० | .. | १८१५० | -- | -- |
| ४ | २०२०-२१ | .. | २०५०१ | -- | -- |
| ५ | २०२१-२२ (अपेक्षित) | .. | ७०५०१ | १०८ | १९०४५.७ |
| ६ | २०२२-२३ (अंदाजित) | .. | २०९०० | -- | -- |

६. उद्दिष्टांपेक्षा कमी साध्य झालेले असल्यास, त्याची कारणे. .. सन २०१९-२०, सन २०२०-२१ मध्ये कोविड-१९ च्या महामारीच्या पार्श्वभूमीवर राज्य पुरस्काराची निवड प्रक्रिया झालेली नाही.

७. योजना अंमलबजावणीतील अडचणी .. --

८. अडचणी निवारण करण्यासाठी करण्यात आलेली उपाययोजना. .. --

## शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या शैक्षणिक संस्थांना राज्य पुरस्कार

१. योजनेचे नाव व प्रस्तावना .. शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या शैक्षणिक संस्थांना राज्य पुरस्कार.--या पुरस्कारासाठी प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षण देणाऱ्या संस्थांचाच विचार करण्यात येतो. यासाठी प्रत्येक माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागीय शिक्षण मंडळ क्षेत्रातील शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या एका शिक्षण संस्थेची विहित निकषानुसार व गुणवत्तेनुसार निवड करण्यात येते. एकूण ८ शिक्षण संस्था निवडल्या जातात.

२. योजना/कार्यक्रमाचे स्वरूप/माहिती व व्याप्ती. .. या पुरस्कारासाठी संस्थांची निवड करण्यासाठी विभागीय निवड समिती असून ही समिती ८ संस्थांची निवड करून राज्य निवड समितीकडे शिफारस करते. राज्य निवड समिती विभागनिहाय १ संस्थेची अंतिम निवड करते. एखाद्या वर्षी विहित गुणवत्ता व निकषानुसार पात्र संस्था उपलब्ध न झाल्यास त्या विभागासाठी त्या वर्षी पुरस्कार जाहीर करण्यात येत नाही व त्या वर्षाचा अनुशेष पुढे समजण्यास येत नाही. या पुरस्कारासाठी रक्कम रुपये १,००,००० व प्रशस्तिपत्र देऊन संस्थेचा दिनांक ५ सप्टेंबर - शिक्षकदिनी सन्मान करण्यात येतो.

३. योजनेचा उद्देश .. शैक्षणिक संस्थांना त्यांच्या अंगीकृत कार्यात प्रोत्साहन मिळावे.

४. अंमलबजावणी यंत्रणा .. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

५. योजनेची उद्दिष्टे, आर्थिक तरतूद तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च :

(रुपये हजारांत)

| अ. क्र. | वर्ष | | तरतूद | लाभार्थी | खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ |
| १ | २०१७-१८ | .. | १०० | -- | -- |
| २ | २०१८-१९ | .. | १०० | -- | -- |
| ३ | २०१९-२० | .. | १०० | -- | -- |
| ४ | २०२०-२१ | .. | १०० | -- | -- |
| ५ | २०२१-२२ (अपेक्षित) | .. | -- | -- | -- |
| ६ | २०२२-२३ (अंदाजित) | .. | -- | -- | -- |

६. उद्दिष्टांपेक्षा कमी साध्य झालेले असल्यास, त्याची कारणे. .. निवड समिती गठीत न झाल्यामुळे उद्दिष्ट पूर्तता झालेली नाही.

७. योजना अंमलबजावणीतील अडचणी .. संस्थाद्वारा निकषांची पूर्तता होऊ शकत नाही. राज्य निवड समिती गठीत झालेली नाही.

८. अडचणी निवारण करण्यासाठी करण्यात आलेली उपाययोजना. .. राज्य निवड समिती गठीत झाल्यानंतर पुरस्कारासाठी शिफारशी करण्यात येतील.

# राष्ट्रीय शिक्षक कल्याण प्रतिष्ठान

१. योजनेचे नाव व प्रस्तावना .. राष्ट्रीय शिक्षक कल्याण प्रतिष्ठान.
केंद्र शासनाने राष्ट्रीय शिक्षक कल्याण प्रतिष्ठानची स्थापना, चॅरिटेबल इंडोमेंट ॲक्ट, १८९० अनुसार १९६२ मध्ये करण्यात आलेली आहे.

२. योजना/कार्यक्रमाचे स्वरूप/माहिती व व्याप्ती. .. शिक्षक कल्याण निधी या योजनेसाठी दरवर्षी अर्थसंकल्पात कायमस्वरूपी २.०० लाख रुपयाचे सहाय्यक अनुदान मंजूर करण्यात येते व त्या अनुदानातून राज्य सरकार केंद्र शासनाच्या या प्रतिष्ठानास दरवर्षी रुपये १,००,००० अंशदान देते. तसेच जमा संकलित निधीतून १० टक्के रक्कम केंद्र शासनास बँकेमार्फत जमा केली जाते. त्यामधून केंद्र शासन राबवित असलेल्या (१) पुरस्कारप्राप्त शिक्षकांना १४ दिवसांपर्यंत रजा प्रवास सवलत योजना, (२) गंभीर आजारपणात आर्थिक साहाय्य, (३) शिक्षकांच्या पाल्यांना व्यावसायिक शिक्षणासाठी रुपये १५,००० पर्यंत आर्थिक मदत, (४) शिक्षक भवन या इमारतीत परगावाहून येणाऱ्या शिक्षकांची अल्प दरात राहण्याची सोय, (५) शिक्षक कल्याण निधीमार्फत पाठविण्यात येणाऱ्या प्राप्त अर्जदारांना आर्थिक मदत देण्यात येते.

३. योजनेचा उद्देश .. शिक्षकांना व त्यांच्या कुटुंबीयांना आपत्कालीन परिस्थितीत (उदा. अवलंबित व स्वत:चे आजारपण, वंधत्व व इतर गंभीर आजार) यासाठी आर्थिक साहाय्य देणे हा आहे. या कारणासाठी आवश्यक निधी उपलब्ध होण्यासाठी दरवर्षी ५ सप्टेंबर या शिक्षक दिनाचे निमित्ताने निधी संकलित केला जातो.

४. अंमलबजावणी यंत्रणा .. निधी संकलित करणेसाठी दरवर्षी अर्थसंकल्पात मंजूर केलेल्या अनुदानातून ५ सप्टेंबर शिक्षक दिनानिमित्त, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद कार्यालये, प्रशासन अधिकारी, महानगरपालिका, शिक्षण मंडळे यांना बिल्ले छापून त्यांचे विक्रीपासून जमा झालेला निधी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या मुख्य शाखेत नॅशनल फौंडेशन फॉर टीचर्स वेलफेअर या खात्यात जमा केला जातो. तसेच सर्व प्रशासकीय कामकाज हे राज्यस्तरीय समितीमार्फत केले जाते.

५. योजनेची उद्दिष्टे, आर्थिक तरतूद तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च :

(रुपये हजारांत)

| वर्ष | | भौतिक उद्दिष्ट | आर्थिक तरतूद | | योजनेवरील खर्च | भौतिक साध्य |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | अर्थसंकल्पीय | वितरित | | |
| १ | | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| २०१८-१९ | .. | -- | २०० | -- | -- | -- |
| २०१९-२० | .. | -- | २०० | -- | -- | -- |
| २०२०-२१ | .. | -- | २०० | -- | -- | -- |
| २०२१-२२ | .. | -- | १०० | -- | -- | -- |
| २०२२-२३ (अपेक्षित) | .. | -- | १०० | -- | -- | -- |
| २०२३-२४ (अंदाजित) | .. | -- | १०० | -- | -- | -- |

६. उद्दिष्टांपेक्षा कमी साध्य झालेले असल्यास, त्याची कारणे. .. निरंक

७. योजना अंमलबजावणीतील अडचणी .. --

८. अडचणी निवारण करण्यासाठी करण्यात आलेली उपाययोजना. .. --

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे

## शिक्षण मंडळाची संरचना



## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ

१. योजनेचे नाव व प्रस्तावना .. सन १९६५ च्या कायद्यानुसार स्थापन झालेल्या महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत माध्यमिक शालान्त (इयत्ता १० वी) व उच्च माध्यमिक (इयत्ता १२ वी) च्या परीक्षा घेणे.

२. योजना/कार्यक्रमाचे स्वरूप/माहिती व व्याप्ती. .. राज्य मंडळ आपल्या अधिपत्याखाली राज्यातील पुणे, नागपूर, औरंगाबाद, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी च्या परीक्षांचे आयोजन करून निकाल जाहीर करते.

३. योजनेचा उद्देश .. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाचा किमान व समान दर्जा राखणे.

४. अंमलबजावणी यंत्रणा .. इयत्ता १० वी व १२ वीच्या परीक्षांचे आयोजन व निकाल जाहीर करणे, राज्य मंडळ आपल्या अधिपत्याखालील नऊ विभागीय मंडळांमार्फत व मंडळाच्या विविध वैधानिक समित्यांच्या निर्णयानुसार पार पाडते.

५. योजनेची उद्दिष्टे, आर्थिक तरतूद, तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च :--

(रुपये हजारांत)

| अ. क्र. | वर्ष | | तरतूद | लाभार्थी | खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ |
| १ | २०१७-१८ | .. | २८५६०२२ | ३४९७७५७ | २८२६५३८ |
| २ | २०१८-१९ | .. | ३१४७६२६ | ३४०७५१० | २९१५०१५ |
| ३ | २०१९-२० | .. | ३१६७६७२ | ३६१४५४९ | ३३९७००५ |
| ४ | २०२०-२१ | .. | ३०३४२३२ | ३६६२९२३ | ३०५८२८८ |
| ५ | २०२१-२२ | .. | ३०३५६१८ | ३६७२८६८ | ३०८३८५७ |
| ६ | २०२२-२३ | .. | ३४४१९४५ | ३३९७१९५ | ३६०२३०३ |

६. उद्दिष्टांपेक्षा कमी साध्य झालेले असल्यास, त्याची कारणे. .. निरंक

७. योजना अंमलबजावणीतील अडचणी .. विद्यार्थी संख्येविषयी अंदाज निश्चितपणे बांधता येत नाही.

८. अडचणी निवारण करण्यासाठी करण्यात आलेली उपाययोजना. .. इयत्ता ९ वी व ११ वी मध्ये विद्यार्थ्यांची सशुल्क नोंदणी करणे प्रस्तावित आहे.

# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

**रचना**



# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

| | | |
|---|---|---|
| १. योजनेचे नाव व प्रस्तावना | .. | माध्यमिक शालांत परिक्षेशिवाय शासनाने आयोजित केलेल्या वेगवेगळ्या परीक्षांकरिता महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद ही स्वायत्त यंत्रणा कार्यरत आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे कामकाज शिक्षण संचालक दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली चालते. त्यांना आयुक्त, उपआयुक्त व सहायक आयुक्त हे अधिकारी कार्यालयीन कामकाजात सहाय्य करतात.<br>महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे मार्फत एकूण १२ परीक्षा घेतल्या जातात. त्यांचा तपशील खालीलप्रमाणे.-<br>पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ५ वी)<br>(१) पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ८ वी)<br>(२) (अ) अध्यापक शिक्षण पदविका परीक्षा (अभ्यासक्रम २००४)<br>(ब) प्राथमिक शिक्षण पदविका (डी. एल. एड.) अभ्यासक्रम २०१६ (नवीन अभ्यासक्रम)<br>(३) राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा (राज्यस्तर) (इयत्ता १० वी) (N. T.S.)<br>(४) राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज, डेहराडून प्रवेश परीक्षा (R.I.M.C.)<br>(५) विभागीय सेवा प्रवेशोत्तर परीक्षा (शिक्षण विभागातील वर्ग ३ कर्मचाऱ्यांसाठी)<br>(६) शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा (मॅन्युअल टंकलेखन, संगणक टंकलेखन)<br>(७) ट्रेन टीचर्स सर्टिफिकेट परीक्षा (T. T.C.)<br>(८) राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थी शिष्यवृत्ती योजना परीक्षा (इयत्ता ८ वी) (N.M.M.S.)<br>(९) शिक्षक पात्रता परीक्षा (T. E. T.)<br>(१०) शिक्षक अभियोग्यता व बुद्धीमत्ता चाचणी (T.A.I. T.)<br>(११) बाह्य परीक्षा विभाग<br>या व्यतिरिक्त महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद अधिनियम, २००२ मधील कलम २३ (२) नुसार परिषदेने मान्य केलेल्या अटी व शर्तीनुसार इतर विभागांच्या परीक्षांचे परिषदेमार्फत आयोजन केले जाते.<br>या सर्व परीक्षांचे संचलन राज्यातील विविध शैक्षणिक संस्था, शिक्षणाधिकारी व विभागीय शिक्षण उपसंचालक यांच्या सहकार्याने केले जाते. परिषदेच्या सर्व परीक्षांचे नियमितपणे मूल्यमापन केले जाऊन परीक्षांच्या कार्यपद्धतीत आवश्यक त्या सुधारणा केल्या जातात. |
| २. योजना/कार्यक्रमाचे स्वरूप/माहिती व व्याप्ती. | .. | या परीक्षांचे संचलन परीक्षा परिषदेमार्फत केले जाते. सर्व परीक्षा क्षेत्रिय स्तरावर जिल्हा शिक्षणाधिकारी व शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई (उ/प/द) यांचेमार्फत घेतल्या जातात. RIMC ही परीक्षा वर्षातून दोन वेळा राज्यस्तरावर घेण्यात येते. शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा व डी. टी. एड., डी. एल. एड. या परीक्षा वर्षातून दोनदा घेतल्या जातात. |
| ३. योजनेचा उद्देश | .. | प्राथमिक / माध्यमिक स्तरावरील गुणवान विद्यार्थ्यांचा शोध घेऊन स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून त्यांच्या सुप्तगुणांना वाव देणे, डी. टी. एड., डी. एल. एड., टी.टी.सी.,टी.ई.टी. टी.ए.आय.टी., जी. सी. सी. परीक्षांमधून भावी शिक्षक, लिपिकवर्गीय सक्षम मनुष्यबळ निर्माण करण्याकरिता आवश्यक अर्हता मिळवून देणे, हे या परीक्षांचे मुख्य उद्देश आहेत. तसेच आर.आय.एम.सी. परीक्षेतून यशस्वी विद्यार्थ्यांना आर.आय.एम.सी., डेहराडून येथे इयत्ता ८ वी साठी प्रवेश मिळतो. |
| ४. अंमलबजावणी यंत्रणा | .. | शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक), शिक्षण निरीक्षक (बृहन्मुंबई) यांचेमार्फत क्षेत्रिय स्तरावर या परीक्षा घेतल्या जातात. विभागीय शिक्षण उपसंचालक व महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेद्वारे परीक्षांचे नियंत्रण केले जाते. |
| ५. योजनेची उद्दिष्टे, आर्थिक तरतूद, तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च. | .. | महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत ज्या विविध परीक्षा घेतल्या जातात त्यासाठी शासनाद्वारे कोणतीही आर्थिक तरतूद उपलब्ध करून दिली जात नाही. विविध परीक्षांसाठी शुल्कापोटी जे शुल्क आकारले जाते, त्यातून परीक्षेसाठीचा व आस्थापनाविषयक सर्व खर्च भागविला जातो. अधिकारी व कंत्राटी कर्मचारी यांचे वेतनसुद्धा परिषदेकडे मिळणाऱ्या उत्पन्नातून केले जाते. अधिकाऱ्यांचे वेतन शासनाकडून कोषागारामार्फत अदा केले जाते, त्यानंतर परिषदेकडून भरणा केला जातो. |
| ६. उद्दिष्टांपेक्षा कमी साध्य झालेले असल्यास, त्याची कारणे. | .. | निरंक |
| ७. योजना अंमलबजावणीतील अडचणी | .. | निरंक |
| ८. अडचणी निवारण करण्यासाठी करण्यात आलेली उपाययोजना. | .. | निरंक |

# राष्ट्रीय छात्रसेना

| | | |
|---|---|---|
| १. योजनेचे नाव व प्रस्तावना | .. | राष्ट्रीय छात्र सेना. |
| | | सन १९४८-४९ मध्ये देशव्यापी स्वरूपात राष्ट्रीय छात्र सेना दलाची स्थापना आपल्या माध्यमिक व महाविद्यालयांमध्ये शिक्षण संस्थांमधील विद्यार्थ्यांसाठी झाली. महाराष्ट्रात सन १९७२-७३ च्या शैक्षणिक वर्षापासून सुरू झालेल्या १० + २ + ३ ह्या बदललेल्या शिक्षण पद्धतीनुसार राष्ट्रीय छात्र सेनेच्या माध्यमिक स्तरावरील (इयत्ता ८ वी ते १० वी) अभ्यासक्रमात ऐच्छिक विषयाखालील एक उपक्रम म्हणून अंतर्भाव करण्यात आला आहे. सदर योजना कनिष्ठ महाविद्यालय / महाविद्यालय पातळीवरदेखील लागू करण्यात आली आहे. |
| २. योजना/कार्यक्रमाचे स्वरूप/ माहिती व व्याप्ती. | .. | आपल्या शिक्षण पद्धतीचा एक घटक म्हणून राष्ट्रीय छात्र सेना हा केंद्र सरकार तथा राज्य सरकार ह्यांना जोडणारा एक जबाबदार दुवा म्हणून कार्य करते. सेना दलातील ब्रिगेडियर या हुद्याचा अधिकारी उपमहासंचालक, राष्ट्रीय छात्र सेना, मुंबई, केंद्र शासन अधिकाऱ्यांचे प्रशासकीय आणि प्रशिक्षणे व कार्यक्रमे विभाग सांभाळतात. विभागीय गटप्रमुख व समादेशक अधिकारीसुद्धा सेना दलातील असतात. सेनादलातील अधिकाऱ्यांचे वेतन व भत्ते, शस्त्रांची किंमत, दारूगोळा आणि इतर साहित्य यांचा खर्च केंद्र सरकार करते. राज्यात एकूण ६६ राष्ट्रीय छात्र सेना कार्यालये असून त्या कार्यालयांतील नागरी कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते, छात्रांचा अल्पोपहार, धुलाई व चकाकी भत्ता, मानधन भत्ता, कार्यालयीन नियमित खर्च इत्यादींवरील खर्च राज्य शासनामार्फत करण्यात येतो. |
| | | उपमहासंचालक, राष्ट्रीय छात्र सेना, महाराष्ट्र, मुंबई यांचेकडून ७५ टक्के व आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, म. रा., पुणे यांचेकडून २५ टक्के तरतूद प्रशिक्षणे व शिबिरे यासाठी उपलब्ध करून देण्यात येते. सदर कार्यालये राज्यातील ६६ राष्ट्रीय छात्र सेना कार्यालयांना तरतूद उपलब्ध करून त्यांच्यामार्फत छात्रांचे प्रशिक्षण कार्यक्रम राबवितात. सदर कार्यक्रमांमध्ये अंशकालीन अधिकारी सहभागी असतात. |
| ३. योजनेचा उद्देश | .. | सदर योजनेची ध्येय व उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.--<br>(१) नेतृत्त्व गुणांची वृद्धी, चारित्र्यसंवर्धन, खिलाडूवृत्ती, आदर्श सेवाभाव, इत्यादी गुणांचे संवर्धन करणे.<br>(२) देशाच्या आपत्कालीन परिस्थितीत साहाय्यभूत व्हावी अशी एक शिस्तबद्ध आणि प्रशिक्षण शक्ती निर्माण करणे.<br>(३) अधिकारीवृत्तीच्या गुणांची जोपासना करून आणि सेनादलामध्ये अधिकारी म्हणून प्रवेश करण्याच्या पात्रतेसाठी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देणे. |
| ४. अंमलबजावणी यंत्रणा | .. | आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे या संचालनालयाच्या अधिपत्याखालील विभागीय उपसंचालक, मुंबई, नाशिक, कोल्हापूर, पुणे, औरंगाबाद, नागपूर, लातूर, अमरावती या कार्यालयांना राज्यातील ६६ राष्ट्रीय छात्र सेना कार्यालयांमध्ये कार्यरत असलेले वर्ग-३, वर्ग-४ चे १,०१६ नागरी कर्मचाऱ्यांचे सर्व प्रशासकीय बाबींचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. तथापि, राज्यातील ६६ राष्ट्रीय छात्र सेना कार्यालयांना तरतूद वाटप करण्याचे नियंत्रणाबाबत सर्व वित्तीय अधिकार व संचालनालय स्तरावरील प्रशासकीय बाबी आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहेत. |
| | | राज्यातील ७ गट मुख्यालय कार्यालयाच्या अधीन असलेल्या ५९ समादेशक अधिकारी कार्यालयांमार्फत राष्ट्रीय छात्र सेना योजनेची अंमलबजावणी करण्यात येते. |
| ५. योजनेची उद्दिष्टे, आर्थिक तरतूद, तसेच वर्षभरातील व झालेला खर्च. | .. | छात्र सैनिकांना सैनिकी प्रशिक्षण देऊन त्यांना भावीकाळात देशोपयोगी नागरिक बनविणे हे सदर योजनेचे उद्दिष्ट असून त्याबाबतचे उद्देश वर नमूद करण्यात आले आहेत. चालू आर्थिक वर्षात अंदाजे ९३,०६४ साध्य छात्र सैनिकांना प्रशिक्षणे व शिबिरे देण्याचे उद्दिष्ट आहे. |

सदर योजना राबविण्यासाठी खाली नमूद केल्याप्रमाणे खर्च झालेला आहे :

(रुपये लाखांत)

| अ. क्र. | वर्ष | | तरतूद | लाभार्थी | खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ |
| १ | २०१७-१८ | .. | ५५६८.२४ | १२१००० | ४३९९.८३ |
| २ | २०१८-१९ | .. | ५०७७.७५ | १०००८४ | ४४३४.५१ |
| ३ | २०१९-२० | .. | ६१००.६४ | १२१००० | ६१००.६४ |
| ४ | २०२०-२१ | .. | ६०५३.४५ | १२१००० | ४५५२.३६ |
| ५ | २०२१-२२ (अपेक्षित) | .. | ५८४१.७१ | १२१००० | ५८४१.७१ |
| ६ | २०२२-२३ (अंदाजित) | .. | ६९७९.९० | १२१००० | -- |

६. उद्दिष्टांपेक्षा कमी साध्य झालेले असल्यास, त्याची कारणे. .. राष्ट्रीय छात्र सेना योजनेअंतर्गत साध्य असलेल्या १,००,००० छात्रांना सैनिकी प्रशिक्षण देण्यात आले आहे.

७. योजना अंमलबजावणीतील अडचणी .. --

८. अडचणी निवारण करण्यासाठी करण्यात आलेली उपाययोजना. .. --

---

# महाराष्ट्र छात्रसेना योजना

| | | | |
|---|---|---|---|
| १. | योजनेचे नाव व प्रस्तावना | .. | महाराष्ट्र छात्रसेना योजना. |
| २. | योजना/कार्यक्रमाचे स्वरूप/ माहिती व व्याप्ती. | .. | शालेय विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व, चारित्र्य, बंधुत्व, खिलाडूवृत्ती, सेवाभाव, इत्यादी गुणांचे संवर्धन निर्माण होण्यासाठी राज्यातील इयत्ता ९ वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय छात्रसेनेच्या धर्तीवर प्रशिक्षण अनिवार्य करण्याबाबत शासनाने १९९६-९७ पासून कार्यान्वित केले त्यानुसार आता सदर योजना इयत्ता ८ वी व ९ वी च्या विद्यार्थ्यांना ऐच्छिक राहील. परंतु सर्व माध्यमिक शाळांसाठी अनिवार्य राहील. |
| ३. | योजनेचा उद्देश | .. | विद्यार्थ्यांमध्ये छात्रवृत्ती जोपासावी, देशप्रेमाची जागृती व्हावी. |
| ४. | अंमलबजावणी यंत्रणा | .. | शिक्षण संचालक, शालेय शिक्षण विभाग हे या योजनेची राज्यस्तरावरील अंमलबजावणी करतात. |

५. योजनेची उद्दिष्टे, आर्थिक तरतूद, तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च :

**महाराष्ट्र छात्रसेना योजना**

**लेखाशीर्ष - २२०४१३१७**

(रुपये हजारांत)

| अ. क्र. | वर्ष | | लाभार्थी (कार्यरत) (तालुका समादेशक संख्या) | अर्थसंकल्पिय तरतूद | योजनेवरील प्रत्यक्ष खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ |
| १ | २०१६-१७ | .. | ७८ | ४,१२,२९ | ३,०६,६८ |
| २ | २०१७-१८ | .. | ७७ | ३,६०,६६ | २,६७,४८ |
| ३ | २०१८-१९ | .. | ४४ | ३,३५,७२ | २,१३,१८ |
| ४ | २०१९-२० | .. | २४ | ४,३०,४१ | १,५५,२९ |
| ५ | २०२०-२१ | .. | १३ | २,६७,३३ | ७७,४४ |
| ६ | २०२१-२२ | .. | ५ | २,४५,८७ | ५९.८७ |
| ७ | २०२२-२३ | .. | ३ | १,५८,८७ | ३५.४१ (दि. ६-१२-२०२२ अखेरचा खर्च) |
| ८ | २०२३-२४ | .. | ३ | ७९.०२ (प्रस्तावित) | -- |

| | | | |
|---|---|---|---|
| ६. | उद्दिष्टांपेक्षा कमी साध्य झालेले असल्यास, त्याची कारणे. | .. | उद्दिष्ट साध्य झालेले आहे. |
| ७. | योजना अंमलबजावणीतील अडचणी | .. | तालुक्यांच्या संख्येनुसार, तालुका समादेशक नियुक्त झाले नसल्याने व काही पदे रिक्त राहिल्याने आणि शासनाने मान्यता न दिल्यामुळे इतर समादेशकांकडून प्रशिक्षणाचे काम करून घ्यावे लागत असल्यामुळे योजना अंमलबजावणी करण्यास अडचण होत आहे. |
| ८. | अडचणी निवारण करण्यासाठी करण्यात आलेली उपाययोजना. | .. | समादेशकांना प्रशिक्षणा संदर्भात संचालनालयाकडून सूचना दिल्या जातात व त्यांचे काम व्यवस्थित व्हावे म्हणून शासनाने त्यांना वेतनश्रेणी लागू केली आहे. त्यांच्या कामावर शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचे नियंत्रण ठेवलेले आहे. |

# बालवीर व वीरबाला

| | | | |
|---|---|---|---|
| १. | योजनेचे नाव व प्रस्तावना | .. | महाराष्ट्र राज्य स्काऊट व गाईड योजना (बालवीर व वीरबाला).<br>माध्यमिक शाळांसाठी सन १९७२-७३ या सालापासून इयत्ता ८ वी, ९ वी व १० वी इयत्तेसाठी बालवीर व वीरबाला हा विषय ऐच्छिक विषय म्हणून सुरू करण्यात आला आहे. |
| २. | योजना/कार्यक्रमाचे स्वरूप/माहिती व व्याप्ती. | .. | बालवीर व वीरबाला ही योजना महाराष्ट्र राज्य स्काऊट व गाईड, मुंबई या संस्थेमार्फत राज्यामध्ये राबविली जाते. सदर संस्थेमध्ये २९७ कर्मचारीवर्ग कार्यरत असून राज्यातील ३५ जिल्ह्यांच्या ठिकाणी कार्यालय आहे. संबंधित संस्थेच्या नियंत्रणाखाली जिल्हा कार्यालयामार्फत सदर योजना प्रभावीपणे राबविली जाते. राज्यातील माध्यमिक शाळांमध्ये इयत्ता ८ वी ते १० वी इयत्तेपर्यंत ऐच्छिक विषय म्हणून बालवीर व वीरबाला योजना राबविली जाते. |
| ३. | योजनेचा उद्देश | .. | मुला-मुलींमध्ये व युवा स्त्री, पुरुषांच्या चारित्र्याचा विकास करणे, त्यांच्या शारीरिक, मानसिक, नैतिक व अध्यात्मिक शक्तीचा विकास करणे व समाजात त्यांच्या सेवेचा उपयोग व्हावा यासाठी कायद्याने वागणारे चांगले नागरिक निर्माण करणे, चारित्र्यवान, सेवाभावी, स्वावलंबी, नम्र व विनयशील राष्ट्रप्रेमी असे चांगले नागरिक घडविण्याचे कार्य करणे. |
| ४. | अंमलबजावणी यंत्रणा | .. | बालवीर व वीरबाला ही योजना महाराष्ट्र राज्य स्काऊट व गाईड, मुंबई या संस्थेमार्फत त्यांच्या अधीन असलेल्या जिल्ह्यांच्या कार्यालयामार्फत प्रभावीपणे राबविण्यात येते. यासाठी त्यांच्या संस्थेमध्ये कार्यरत असलेल्या २९७ कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते यांकरिता आयुक्त, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत शा. नि. क्र. एससी.जी./२००७/प्र.क्र. १६/माशि-७, दिनांक २१ नोव्हेंबर २००८ अन्वये १०० टक्के साहाय्यक अनुदान प्रतिवर्षी मंजूर करण्यात येते. वेतनेतर बाबींसाठी वार्षिक खर्चाची मर्यादा रुपये २४,०८,६५० शा.नि. दिनांक २१ नोव्हेंबर २००८ अन्वये निश्चित करण्यास शासनाने मंजुरी दिलेली आहे. |
| ५. | योजनेची उद्दिष्टे, आर्थिक तरतूद, तसेच वर्षभरातील साध्य व झालेला खर्च. | .. | बालवीर व वीरबाला या योजनेत अंदाजे १३,८६,०७५ प्रशिक्षणार्थी भाग घेतात. त्यांनी खालीलप्रमाणे वर्षभरातील साध्य पूर्ण केले आहे. |

(रुपये हजारांत)

| अ. क्र. | वर्ष | | तरतूद | लाभार्थी | खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ |
| १ | २०१७-१८ | .. | ९५२.५३ | १५००००० | ८३१.९१ |
| २ | २०१८-१९ | .. | ९९२.७३ | १५००००० | ९५५.४० |
| ३ | २०१९-२० | .. | १२८०.६२ | १५००००० | १०१७.२१ |
| ४ | २०२०-२१ | .. | १४४५.८४ | १५००००० | १०९५.५५ |
| ५ | २०२१-२२ (अपेक्षित) | .. | १६३८.९६ | १५००००० | १९२०.५८ |
| ६ | २०२२-२३ (अंदाजित) | .. | २२५७.०२ | १५००००० | -- |

| | | | |
|---|---|---|---|
| ६. | उद्दिष्टांपेक्षा कमी साध्य झालेले असल्यास, त्याची कारणे. | .. | बालवीर व वीरबाला या योजनेचे अपेक्षित साध्य पूर्ण झाले आहे. |
| ७. | योजना अंमलबजावणीतील अडचणी | .. | सदर योजनेसाठी चालू वर्षी रुपये १६३८.९६ लक्ष तरतूद शासनामार्फत उपलब्ध करून देण्यात आली आहे. |
| ८. | अडचणी निवारण करण्यासाठी करण्यात आलेली उपाययोजना. | .. | |

## राजमाता जिजाऊ मोफत सायकल वाटप योजना

| | | |
|---|---|---|
| १. योजनेचे नाव व प्रस्तावना-- | .. | राजमाता जिजाऊ मोफत सायकल वाटप योजना |
| २. योजना/कार्यक्रमाचे स्वरूप-- | .. | मुलींच्या शिक्षणाला चालना देण्यासाठी तसेच ग्रामीण भागातील शाळांमध्ये मुलींचे गळतीचे प्रमाण कमी करण्याकरिता व मुलींना शिक्षणाकडे आकर्षित करून घेण्याच्या दृष्टीने माध्यमिक शाळेत शिक्षण घेणाऱ्या दारिद्र्यरेषेखालील इयत्ता ८ वीच्या मुलींसाठी ही योजना सुरू करण्यास शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२००८/३३८९२ (१८१/०८)/माशि-३, दिनांक १८ फेब्रुवारी २००९ अन्वये मान्यता देण्यात आली. सन २००८-०९ या आर्थिक वर्षासाठी २०.०० कोटी इतका अतिरिक्त निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.<br><br>ग्रामीण भाग व ' क ' वर्ग नगरपरिषद क्षेत्रातील शाळा या ठिकाणी ही योजना लागू राहील. तसेच इयत्ता ७ वीमध्ये ४५ टक्के गुण प्राप्त केले असावेत. तसेच लाभार्थी ही शासन मान्यताप्राप्त अनुदानित माध्यमिक शाळेत शिक्षण घेत असावी. लाभार्थीची निवड करताना दुर्गम/अतिदुर्गम ग्रामीण भाग तसेच शहरी भागातील झोपडपट्टी/गलिच्छवस्तीतील मुलींना प्राधान्य द्यावे. |
| ३. योजनेचा उद्देश-- | .. | या योजनेचा लाभ घेण्यास इयत्ता ८ वीतील दारिद्र्यरेषेखालील मुली पात्र राहतील. |
| ४. अंमलबजावणी यंत्रणा-- | .. | सदरील योजना शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्या स्तरावर राबवावयाची असून त्यांनी निकषाप्रमाणे लाभार्थ्यांची निवड करावयाची आहे. सन २००८-२००९ मध्ये या योजनेअंतर्गत लेडीज सायकली पुरविण्यासाठी जाहीर निविदा मागविण्याची प्रक्रिया महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नी रोड, मुंबई या कार्यालयामार्फत करण्यात आली आहे. सदर योजनेची अंमलबजावणी करण्यासंदर्भात महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नी रोड, मुंबई यांचेकडून निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन पुरवठादार निश्चित झालेले आहेत व त्यांना लाभार्थी संख्येनुसार सायकली संबंधित जिल्ह्यास पुरविणेबाबत महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक परिषदेकडून कळविण्यात आलेले आहे. सन २००८-२००९ या वर्षातील या योजनेचा मंजूर निधी (रुपये २०.०० कोटी) प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांचेकडे वर्ग केला आहे. तसेच सन २००८-२००९ मध्ये ६२,५४४ लाभार्थी संख्या महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद यांनी कळविली आहे. सन २००८-२००९ मध्ये जाहीर निवेदनाद्वारे सायकलचा दर रुपये २,९९१ होता. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक परिषदेकडून पुरवठादारामार्फत सर्व जिल्ह्यांना त्यांनी कळविलेल्या लाभार्थी संख्येनुसार सायकलींचा पुरवठा झालेला आहे. सन २०१०-२०११ व २०११-२०१२ व २०१२-२०१३ मध्ये सदर योजनेसाठी तरतूद प्राप्त झालेली नाही. सन २०१३-२०१४ मध्ये सदर योजनेसाठी रुपये १० कोटी तरतूद मंजूर आहे. सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पित तरतुदीला निविदा जाहीर करण्याच्या दृष्टीने १८ फेब्रुवारी २००९ च्या शासन निर्णयातील कार्यपद्धतीने अंमलबजावणी होऊ न शकल्याने रुपये १० कोटी (रुपये दहा कोटी) समर्पित करण्यात आली. सन २०१४-१५ मध्ये सदर योजनेसाठी एक हजार रुपये तरतूद मंजूर होती. प्रशासकीय मान्यता नसल्यामुळे खर्च निरंक समजावा. सन २०२०-२१ मध्ये सदर योजनेखाली रुपये निरंक तरतूद मंजूर आहे. |

# ६. महिलांचे सक्षमीकरण

**सर्वसाधारण माहिती**

"महिला धोरण-२००१ या मसुद्यातील शासनाने जाहीर केलेल्या विविध योजनांचा शिक्षण विभागाअंतर्गत झालेल्या अंतर्भावात खालील योजनांचा तपशील देण्यात येत आहे :—

**(१) माध्यमिक शाळांमधून स्वच्छतागृहांची सुविधा.–** राज्यातील अशासकीय अनुदानित माध्यमिक शाळांत विद्यार्थ्यांसाठी स्वच्छतागृहांची सोय प्रामुख्याने करण्यासाठी शासनाने दिनांक ११ नोव्हेंबर १९९९ च्या परिपत्रकान्वये आदेश दिले आहेत. यामध्ये खालील मुद्द्यांचा समावेश आहे :—

(१) ज्या अनुदानित माध्यमिक शाळांमध्ये स्वच्छतागृहे उपलब्ध नाहीत, त्या शाळा व्यवस्थापनांनी मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहाची व्यवस्था करावी.

(२) ज्या अनुदानित माध्यमिक शाळांमध्ये स्वच्छतागृहे उपलब्ध नाहीत, त्या शाळेचे इमारत भाडे स्वच्छतागृहाची सुविधा उपलब्ध होईपर्यंत रोखण्यात यावे.

(३) संस्थेने विहित मुदतीत स्वच्छतागृहांची सुविधा उपलब्ध न केल्यास संबंधित संस्थेचे वेतनेतर अनुदान रोखून ठेवण्यात यावे.

(४) ज्या संस्थांना माध्यमिक शाळा सुरू करण्याकरिता नव्याने परवानगी दिलेली आहे अशा संस्थांच्या शाळांमध्ये जोपर्यंत स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करून दिली जात नाही तोपर्यंत त्या शाळांना मान्यता देण्यात येऊ नये.

(५) शाळा अनुदानास पात्र ठरविताना स्वच्छतागृहांची सोय उपलब्ध होईपर्यंत सदर शाळेस अनुदान अदा करू नये.

(६) विनाअनुदानित शाळांनी शासनाच्या आदेशापासून ६ महिन्यांच्या आत स्वच्छतागृहाची सुविधा उपलब्ध करून द्यावी अन्यथा शाळांची मान्यता काढून घेण्याबाबत संबंधित शिक्षणाधिकाऱ्यांनी कार्यवाही सुरू करावी.

(७) माध्यमिक शाळांत मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे असल्यास, मूल्यांकनात ५ गुण अनुज्ञेय आहेत.

शासनाच्या वरील सूचनांनुसार शिक्षण उपसंचालक यांचेकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

तसेच विद्यार्थ्यांच्या आरोग्याबाबत माध्यमिक शाळा संहिता नियमावली, १९८६ मधील नियम, ४७, ४८ नुसार वैद्यकीय तपासणीचे अनुषंगाने कार्यवाही करण्याची तरतूद आहे. त्यानुसार कार्यवाही केली जाते. त्याचप्रमाणे शाळा तपासणीचे वेळीही सर्व बाबी तपासून पाहिल्या जातात.

**(२) अहिल्याबाई होळकर मुलींना मोफत प्रवास योजना.–** स्त्री शिक्षण हे प्रगतीचे सूत्र मानून महाराष्ट्र शासन मुलींच्या शिक्षणाकरिता प्रयत्न करीत आहे. ग्रामीण भागातील ज्या मुली गावात शाळा नसल्यामुळे शिक्षण घेऊ शकत नाहीत त्यांचेकरिता जून १९९६ या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंतच्या ग्रामीण भागातील मुलींना शाळेत जाण्यासाठी एस. टी. ने मोफत प्रवास करण्याची सवलत देण्याचा निर्णय दिनांक १३ ऑगस्ट १९९६ अन्वये शासनाने घेतला आहे. या योजनेस **अहिल्याबाई होळकर मुलींना मोफत प्रवास योजना** असे संबोधण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. ही सवलत फक्त ग्रामीण भागातील मुलींसाठीच आहे. ग्रामीण भागातील स्थानिक ठिकाणी माध्यमिक शिक्षणाची सोय असल्यास दुसऱ्या गावात अथवा शहरात जाऊन माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींना ही सवलत घेता येणार नाही. प्रतिवर्षी लाभार्थी संख्या ३.७६ लक्ष एवढी आहे.

**(३) इयत्ता ११ वी / १२ वी मधील मुलींना मोफत शिक्षण.–** शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक एफईडी-१०८३/१५६७२/साशि-५, दिनांक २४ ऑगस्ट १९८३ अन्वये राज्यातील शासनमान्य अनुदानित माध्यमिक शाळांतील मुलींना इयत्ता ५ वी ते १० वीपर्यंतचे शिक्षण मोफत करण्याचा निर्णय जाहीर केला. त्यानंतर पुन्हा शासनाने राज्यातील सर्वच मुलींना मोफत शिक्षण देण्याच्या हेतूने शासन निर्णय क्रमांक एफईडी-१०८४/२५६८/साशि-५, दिनांक ६ फेब्रुवारी १९८७ अन्वये इयत्ता १ ली ते १२ वीपर्यंतचे शिक्षण राज्यातील सर्वच मुलींना मोफत केलेले आहे. या योजनेचा समावेश **इयत्ता १ ली ते १० वी सर्वांना मोफत शिक्षण** या योजनेत १९९६-९७ या वर्षापासून झाला आहे. त्यामुळे सद्य:स्थितीत इयत्ता ११ वी व इयत्ता १२ वी या दोन इयत्तेतील मुलींचा समावेश या योजनेत होतो. या योजनेच्या अंमलबजावणीचे काम जिल्हा स्तरावर शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद हे पाहतात. शैक्षणिक वर्षात किमान आवश्यक उपस्थिती आणि समाधानकारक प्रगती या अटींवर पुढील शैक्षणिक वर्षी ही सवलत चालू राहते. एखादी विद्यार्थिनी शैक्षणिक वर्षात अनुत्तीर्ण झाल्यास आणि तिने त्याच वर्गात पुन्हा प्रवेश घेतल्यास, त्यावर्षी त्या विद्यार्थिनीला या योजनेचा लाभ मिळू शकत नाही.

अनुदानित उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये यांच्या वेतनावर १०० टक्के अनुदान शासनाकडून दिले जात असल्याने या योजनेखाली अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयांना फक्त सत्र शुल्क/प्रवेश शुल्क यांची प्रतिपूर्ती करण्यात येते आणि विनाअनुदानित कनिष्ठ महाविद्यालयांच्या बाबतीत शैक्षणिक शुल्क, सत्र शुल्क, प्रवेश शुल्क यांची प्रमाणित दराने प्रतिपूर्ती करण्यात येते.

या योजनेच्या लाभासाठी कोणत्याही प्रकारच्या उत्पन्नाची अट नाही. त्यामुळे सर्व आर्थिक स्तरावरील विद्यार्थिनी आपोआपच या योजनेला पात्र ठरतात. कुटुंबातील पहिल्या तीन अपत्यांपर्यंत या योजनेचा लाभ मिळेल.

**(४) अध्यापक विद्यालयामधील महिलांसाठी ३० टक्के आरक्षण.–** स्त्री शिक्षणास प्रोत्साहन दिल्यामुळे महिला शिक्षकांच्या संख्येत वाढ व्हावी व महिलांकरिता प्राथमिक शाळेत जागा राखीव ठेवण्याचे जे धोरण शासनाने ठरविले आहे, त्याची अंमलबजावणी व्हावी या उद्देशाने महिला साक्षरतेच्या राष्ट्रीय प्रमाणापेक्षा स्त्री साक्षरतेचे प्रमाण कमी असलेल्या महाराष्ट्रातील औरंगाबाद, जालना, लातूर, नांदेड, उस्मानाबाद, परभणी, बीड, धुळे, नंदुरबार व गडचिरोली या जिल्ह्यांतील शासकीय अनुदानित व विनाअनुदानित अध्यापक विद्यालयातील प्रवेशक्षमतेच्या ५० टक्के जागा महिलांसाठी आरक्षित ठेवण्यास शासन निर्णय क्रमांक टीसीएम-१०९६/(८/९६)/माशि-४, दिनांक ५ सप्टेंबर १९९६ अन्वये संमती देण्यात आली होती. शासन निर्णय क्रमांक टीसीएम-१००१/१५६/२००१/माशि-४, दिनांक ६ ऑगस्ट २००१ अन्वये हे आरक्षण ३० टक्के एवढे करण्यात आले आहे.

राज्यातील राज्यस्तरीय गुणवत्तेनुसार करावयाची बी. एड्. प्रवेश प्रक्रिया व डी. एड्. प्रवेशाकरिता राज्यातील महिलांसाठी ठेवण्यात आलेले ३० टक्के आरक्षण या बाबी विचारात घेऊन राज्यस्तरीय गुणवत्तेनुसार औरंगाबाद, जालना, लातूर, नांदेड, उस्मानाबाद, परभणी, बीड, धुळे व गडचिरोली या ९ जिल्ह्यांतील ज्या मुलींना ३० टक्के महिला आरक्षणाअंतर्गत प्रवेश देण्यात येईल व त्यापैकी ज्या मुली दारिद्र्यरेषेखाली असतील, त्यांना गुणवत्तेनुसार व त्यांच्या पसंतीनुसार राज्यातील कोणत्याही मान्यताप्राप्त शासकीय अनुदानित, विनाअनुदानित विद्यालयात प्रवेश दिला तरी त्यांना मोफत शिक्षण देण्यात येईल. या सवलतीसाठी संबंधित स्त्री उमेदवारांनी त्या जिल्ह्याचा १५ वर्षे रहिवासी असल्याचे प्रमाणपत्र व दारिद्र्यरेषेखाली असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

# ७. मंत्रालय

**प्रस्तावना**

मंत्रालय पातळीवर सामान्य शिक्षण या क्षेत्रातील विषयाचा प्रशासनिक विभाग म्हणून काम पाहिले जाते. इयत्ता १२ वीपर्यंतच्या अभ्यासक्रमापर्यंत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, १९८६ ची अंमलबजावणी करणे, शिक्षणविषयक शासकीय धोरण ठरविणे, त्याबाबत शैक्षणिक संस्थांना मान्यता, मार्गदर्शन व मदत करणे व शिक्षणाचा दर्जा वाढविणे ही या विभागाची प्रमुख कामे आहेत. त्याचप्रमाणे पाठ्यपुस्तकांचा दर्जा वाढविणे, स्थानिक स्वराज्य संस्था व इतर स्वयंसेवी संघटना यांना शैक्षणिक कामांसाठी व प्रौढ शिक्षणाच्या कामासाठी अनुदान देणे व त्यांना उत्तेजन देणे आणि अनौपचारिक शिक्षण क्षेत्रातील कार्यक्रमांना चालना देण्याची विभागाची जबाबदारी आहे. विभागातील काम पाहण्याकरिता आय.ए.एस. श्रेणीतील प्रधान सचिवांची नियुक्ती करण्यात आली आहे. या विभागातील सचिवांना साहाय्य करण्याकरिता विभागामध्ये १ सहसचिव, ४ उपसचिव, ११ अवर सचिव, १ सहसचिव (विधी), १ उपसंचालक (सांख्यिकी), २१ कक्ष अधिकारी व इतर सहायक कर्मचारीवृंद अशी मंजूर पदे आहेत. या विभागाच्या प्रशासनिक नियंत्रणाखाली आयुक्त (शिक्षण), पुणे हे नियंत्रण व समन्वय अधिकारी असून त्यांच्या नियंत्रणाखाली इतर ७ संचालक काम पाहतात. उदा. (१) माध्य., (२) प्राथ., (३) SCERT, (४) प्रौढ, (५) बालभारती, (६) राज्य परीक्षा मंडळ, (७) परीक्षा परिषद याशिवाय आयुक्त, क्रीडा व युवक सेवा व राज्य प्रकल्प संचालक (MPSP) हे विभागप्रमुख आहेत.

---

## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे प्रशासकीय मुख्य कार्य म्हणजे शालेय शिक्षण विभागाच्या अखत्यारीत येणाऱ्या कार्यक्रमांचे कार्यान्वयन, संबंधित विभागप्रमुख किंवा कार्यालय प्रमुखांद्वारे केले जाते. कार्यक्रमाच्या कार्यभाराचा सारांश प्रत्येक कार्यक्रमाची कामगिरी व लक्ष्य दर्शवितो.

हे विभाग अनुदानाद्वारे राबविण्यात येणारे कार्यक्रम संचालनालयीन स्तरावर घेतलेल्या धोरणाविषयक निर्णयानुसार कार्यान्वित केले जातात. मंत्रालयीन विभागातर्फे विकासाची कामे प्रत्यक्ष कार्यान्वित करण्यात येत नाहीत. त्यामुळे या विभागासाठी जी निधीची मागणी केली जाते ती मुख्यत्वेकरून खालील बाबींसाठी असते :—

(अ) आस्थापना अधिकारी वर्ग व इतर कर्मचारी यांचा पगार, भत्ता व आकस्मिक खर्च.

(ब) विभागातील कर्मचारीवृंदांना कर्जे व अग्रिमधन.

याकरिता संचालनालयीन विभागांना कार्यक्रमाच्या कारभाराचा गोषवारा देण्यासाठी कोणतीही मानके विहित करणे योग्य व सुसंबद्ध ठरणार नाहीत. ही मानके फक्त प्रत्येक कार्यात्मक कार्यक्रमाच्या प्रगतीचा अंदाज घेण्यासाठी उपयुक्त आहेत.

---

## Strengthening Teaching — Learning and Results for States (स्टार)

जागतिक बँकेद्वारे अर्थसाहाय्य केल्या जाणाऱ्या Strengthening Teaching — Learning and Results for States (स्टार) या प्रकल्पासाठी महाराष्ट्रासह एकूण सहा राज्यांची (हिमाचल प्रदेश, महाराष्ट्र, ओडीसा, राजस्थान, मध्यप्रदेश आणि केरळ) Perfomance Grading Index मधील कामगिरीच्या आधारे निवड करण्यात आली आहे. सदर प्रकल्प आर्थिक वर्ष २०२४-२५ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे.

**स्टार प्रकल्पाची थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे आहे.—**

**प्रकल्पाची उद्दिष्टे**— STAR प्रकल्पाचे उद्दिष्ट हे निवडलेल्या राज्यात विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास आणि शालेय शिक्षण विभागाचे प्रशासन (Governance) यात सुधारणा करणे आहे.

**STAR स्टार प्रकल्पाच्या गाभा क्षेत्रात खालील घटकांचा समावेश होतो.—**

१) पूर्व प्राथमिक (Early Childhood) शिक्षणाचे सशक्तीकरण.

२) अध्ययन मुल्यांकन पद्धतीत सुधारणा करणे.

३) वर्ग सूचना (Classroom Instruction) आणि उपाय यांच्या माध्यमातून शिक्षकांना विकास आणि शालेय नेतृत्त्वाचे सशक्तीकरण.

४) शाळा ते काम / शाळा ते उच्च शिक्षण हे संक्रमण सुलभ करणे.

५) प्रगत सेवा पुरविण्यासाठी प्रशासन व विकेंद्रीत व्यवस्थापन करणे.

समग्र शिक्षा अभियानाच्या एकात्मिक राज्य अंमलबजावणी सोसायटी (SIS) द्वारे STAR प्रकल्पाची राज्यस्तरावर अंमलबजावणी करण्यात येणार आहे. जिल्हा स्तरावरील निरीक्षणाची कामे जिल्हा शिक्षणाधिकारी यांच्याद्वारे केली जातील.

तर जिल्हाधिकारी हे जिल्हा शिक्षण समितीचे प्रमुख असतील. जिल्हा प्रकल्प कार्यालय हे जिल्ह्याचा सदर प्रकल्प विषयक वार्षिक कृती आराखडा आणि अर्थसंकल्प तयार करेल आणि प्रकल्पाची भौतिक आणि आर्थिक प्रगती यावर देखरेख ठेवेल.

**प्रकल्पाचे लाभार्थी**— STAR प्रकल्प पूर्व प्राथमिक ते उच्च माध्यमिक शिक्षण घेणारे विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षक-शिक्षण संस्था यांच्यासाठी असला आणि या विद्यार्थ्यांमध्ये ४ ते १८ वयोगटातील विद्यार्थ्यांचा समावेश होत असला तरी अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST) आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांत (EWS) मोडणाऱ्या विद्यार्थ्यांवर विशेष लक्ष दिले जाईल.

**प्रकल्पाची वित्तीय तरतूद** – सदर प्रकल्पाचे वित्तीय प्रमाण जागतिक बँक आणि राज्य यांच्या दरम्यान ६० : ४० या प्रमाणात राहणार आहे. त्यानुसार सदर प्रकल्प महाराष्ट्र राज्यासाठी एकूण रुपये ९५३.३० कोटी इतक्या रकमेचा असून त्यात जागतिक बँकेचा वाटा रुपये ५७१.९८ कोटी इतका असून राज्य शासराचा वाटा रुपये ३८१.३२ कोटी इतका असणार आहे.

सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात केंद्र व राज्य शासनाचा निधी असा एकूण रुपये ४१.७१६६ कोटी इतका निधी वितरित करण्यात आला असून सन २०२१-२२ या वित्तीय वर्षात केंद्र व राज्य शासनाचा समरूप हिस्सा असा एकूण रुपये ४११७.७३ लक्ष निधी वितरित करण्यात आला आहे.

---

## ठेव संलग्न विमा योजना

**भविष्यनिर्वाह निधी**.— वर्गणीदाराच्या कुटुंबीयांना अधिक सामाजिक सुरक्षितता लाभावी म्हणून राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना अधिक बचत करण्यास प्रोत्साहन मिळावे म्हणून ही योजना शासनाने सुरू केली आहे. कर्मचाऱ्याला कोणतीही मासिक वर्गणी न देता विम्याची सुरक्षितता लाभते. काही अटींच्या अधीन या योजनेखाली राज्य शासनाच्या कर्मचाऱ्याला जास्तीतजास्त रुपये ६०,००० मिळू शकतील. मात्र मृत्यूसमयी त्याची कमीतकमी ५ वर्षे सेवा झाली असली पाहिजे व भविष्यनिर्वाह निधीत कमीतकमी शेवटच्या वर्षाकरिता खालीलप्रमाणे शिल्लक असली पाहिजे.

| अ. क्र. | ज्या पदावर कर्मचाऱ्याने मृत्यूपूर्वीच्या तीन वर्षांमधील जास्तीत जास्त कालावधी व्यतीत केला असेल त्या पदाच्या ग्रेड वेतनाची कमाल मर्यादा | उक्त तीन वर्षांच्या कालावधीत त्याच्या खात्यामध्ये कोणत्याही वेळी शिल्लक असणे आवश्यक आहे अशी रक्कम |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | वेतनश्रेणी मधील पे बँड (रुपये ९३००—३४८००) किंवा त्यावरील पद धारण करणारे आणि प्रती महिना रुपये ४८०० वा अधिक ग्रेड पे घेणाऱ्या वर्गणीदारांच्या प्रकरणी. | रुपये २५,००० |
| २ | वेतनश्रेणी मधील पे बँड (रुपये ९३००—३४८००) किंवा त्यावरील पद धारण करणारे आणि प्रती महिना रुपये ४२०० वा अधिक परंतु प्रती महिना ४८०० पेक्षा कमी ग्रेड घेणाऱ्या वर्गणीदारांच्या प्रकरणी. | रुपये १५,००० |
| ३ | वेतनश्रेणी मधील पे बँड-२, पे बँड-१ किंवा पे बँड-१S (रुपये ४४००—७४४०) मध्ये पद धारण करणारे आणि प्रती महिना रुपये १४०० वा अधिक परंतु प्रती महिना ४२०० पेक्षा कमी ग्रेड पे घेणाऱ्या वर्गणीदारांच्या प्रकरणी. | रुपये १०,००० |
| ४ | वेतनश्रेणी मधील पे बँड-१S (रुपये ४४००—७४४०) मध्ये पद धारण करणारे आणि प्रती महिना रुपये १३०० वा अधिक परंतु प्रती महिना १४०० पेक्षा कमी ग्रेड पे घेणाऱ्या वर्गणीदारांच्या प्रकरणी. | रुपये ६,००० |

(१) वर्ग १ व २, रुपये २५,००० (२) वर्ग ३ व ४, रुपये १०,०००.

---

## शासकीय कर्मचाऱ्यांना कर्जे

शासकीय कर्मचाऱ्यांना निधीच्या उपलब्धतेनुसार पुढील बाबींसाठी कर्जे मंजूर करण्यात येतात :--

(१) घरबांधणीसाठी अगर विकत घेण्यासाठी, घरबांधणीसाठी जो निधी उपलब्ध करण्यात येतो त्यातील ५० टक्के निधी अनुसूचित जाती व जमाती आणि मागासवर्गीय कर्मचाऱ्यांसाठी राखून ठेवण्यात येतो.

(२) वाहन विकत घेण्यासाठी.

(३) संगणक यंत्रे विकत घेण्यासाठी.

(४) राष्ट्रीय व धार्मिक सण साजरे करण्यासाठी.

---

## मा. आयुक्त, शिक्षण यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

## कर्मचारी वर्गाचा गोषवारा

| अ. क्र. | पदनाम | वेतन संरचना सातव्या वेतन आयोगानुसार पे मॅट्रीक लेव्हल व मूळ वेतन | | पद संख्या |
|---|---|---|---|---|
| | **गट-अ राजपत्रित** | | | |
| १ | आयुक्त, शिक्षण (भा.प्र.से.) .. | एस-३० : | १४४२००-२१८२०० | ०१ |
| २ | शिक्षण सहसंचालक .. | एस-२५ : | ७८८००-२०९२०० | ०१ |
| ३ | शिक्षण उपसंचालक .. | एस-२३ : | ६७७००-२०८७०० | ०२ |
| ४ | प्रशासन अधिकारी, म.शि.से. गट (प्रशासन शाखा) .. | एस-२० : | ५६१००-१७७५०० | ०१ |
| | **एकूण गट-अ** | | | **०५** |
| | **गट-ब** | | | |
| ५ | अधीक्षक, म.शि.से. गट-ब (प्रशासन शाखा) .. | एस-१७ : | ४७६००-१५११०० | ०२ |
| ६ | विशेष अधिकारी (र व का) .. | एस-१७ : | ४७६००-१५११०० | ०१ |
| | **एकूण गट-ब** | | | **०३** |
| | **गट-क** | | | |
| ७ | लघुलेखक (निम्नश्रेणी) .. | एस-१४ : | ३८६००-१२२८०० | ०१ |
| ८ | सहायक अधीक्षक .. | एस-१४ : | ३८६००-१२२८०० | ०३ |
| ९ | स्वीय सहाय्यक (अराजपत्रित) .. | एस-१४ : | ३८६००-१२२८०० | ०१ |
| १० | मुख्य लिपिक .. | एस-१३ : | ३५४००-११२४०० | ०७ |
| ११ | वरिष्ठ लिपिक .. | एस-८ : | २५५००-८११०० | १७ |
| १२ | लिपिक-नि-टंकलेखक .. | एस-६ : | १९९००-६३२०० | १४ |
| १३ | वाहनचालक .. | एस-६ : | १९९००-६३२०० | ०२ |
| | **एकूण गट-क** | | | **४५** |
| | **गट-ड** | | | |
| १४ | नाईक .. | एस-३ : | १६६००-५२४०० | ०१ |
| १५ | शिपाई .. | एस-१ : | १५०००-४७६०० | ०७ |
| | **एकूण गट-ड** | | | **०८** |
| | **एकूण आयुक्त, शिक्षण कार्यालयातील पदे** | | | **६१** |

शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१८/प्र.क्र. १०/१८/प्रशा-५, दि. १६ जानेवारी २०१८ अन्वये शिक्षण उपसंचालक, संवर्गातील (वेतनश्रेणी १५,६००-३९,१०० ग्रेड पे ६,६००) जनसंपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई या पदाची विभागात आवश्यकता नसल्याने तसेच राज्य तंत्रज्ञान शिक्षण संस्था, पुणे (बालचित्रवाणी) ही संस्था बंद करण्यात आल्यामुळे सदर संस्थेतील प्रशासकीय अधिकारी, राज्य तंत्रज्ञान शिक्षण संस्था, पुणे या पदाचीही विभागात आवश्यकता नसल्याने सदर दोन्ही पदे आयुक्त शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या कार्यालयात शिक्षण उपसंचालक म्हणून वर्ग करण्यात येत आहेत.

## शिक्षण संचालनालय ( माध्यमिक व उच्च माध्यमिक ) मंजूर कर्मचारीवर्गाचा गोषवारा

| अ.क्र. | पदनाम | | वेतन स्तर | | वेतन श्रेणी | पद संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | शिक्षण संचालक | .. | एस-२९ | : | १३११००-२१६६०० | ०१ |
| २ | शिक्षण सहसंचालक | .. | एस-२५ | : | ७८८००-२०९२०० | ०१ |
| ३ | शिक्षण उपसंचालक | .. | एस-२५ | : | ६७७००-२०८७०० | २ |
| ४ | प्रशासन अधिकारी | .. | एस-२० | : | ५६१००-१७७५०० | २ |
| ५ | सहायक संचालक (लेखा) | .. | एस-२० | : | ५६१००-१७७५०० | १ |
| ६ | सहायक संचालक (विद्या शाखा) | .. | एस-२० | : | ५६१००-१७७५०० | १ |
| ७ | अधीक्षक (म.शि.से.) | .. | एस-१७ | : | ४७६००-१५११०० | ३ |
| ८ | स्वीय सहायक | .. | एस-१६ | : | ४४९००-१४२४०० | १ |
| ९ | अधीक्षक (सा.रा.से) | .. | एस-१४ | : | ३८६००-१२२८०० | १ |
| १० | लघुलेखक (निम्नश्रेणी) | .. | एस-१४ | : | ३८६००-१२२८०० | २ |
| ११ | सहायक अधीक्षक | .. | एस-१४ | : | ३८६००-१२२८०० | ६ |
| १२ | सहायक शिक्षण उपनिरीक्षक | .. | एस-१३ | : | ३५४००-११२४०० | १ |
| १३ | मुख्य लिपिक | .. | एस-१३ | : | ३५४००-११२४०० | ७ |
| १४ | वरिष्ठ लिपिक | .. | एस-८ | : | २५५००-८११०० | १५ |
| १५ | कनिष्ठ लिपिक | .. | एस-६ | : | १९९००-६३२०० | २३ |
| १६ | वाहनचालक | .. | एस-६ | : | १९९००-६३२०० | ३ |
| १७ | नाईक | .. | एस-६ | : | १६६००-५२४०० | ३ |
| १८ | शिपाई | .. | एस-१ | : | १५०००-४७६०० | १४ |
| १९ | सफाई कामगार | .. | एस-१ | : | १५०००-४७६०० | १ |
| २० | मानसेवी संघटक | .. | | | २५०० | १ |
| | | | | | **एकूण** ... | **८९** |

## अल्पसंख्याक व प्रौढ शिक्षण संचालनालय

| अ.क्र. | पदनाम | | वेतन स्तर | | वेतन श्रेणी | पद संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | **गट-अ राजपत्रित** | | | | | |
| १ | शिक्षण संचालक | .. | एस-२९ | : | १३११००-२१६६०० | ०१ |
| २ | शिक्षण उपसंचालक | .. | एस-२३ | : | ६७७००-२०८७०० | ०२ |
| ३ | सहायक संचालक / जिल्हा प्रौढ शिक्षणाधिकारी | .. | एस-२० | : | ५६१००-१७७५०० | ३१ |
| | **गट-ब** | | | | | |
| ४ | समाज शिक्षणाधिकारी / अधीक्षक / कार्यक्रम अधिकारी / लेखाधिकारी / उपशिक्षणाधिकारी / प्रकल्प अधिकारी. | .. | एस-१५ | : | ४१८००-१३२३०० | ३८ |
| | **गट-क अराजपत्रित** | | | | | |
| ५ | उच्चश्रेणी लघुलेखक | .. | एस-१६ | : | ४४९००-१४२४०० | १ |
| ६ | सहायक अधीक्षक / लघुलेखक | .. | एस-१४ | : | ३८६००-१२२८०० | ३३ |
| ७ | सहायक शिक्षण उपनिरीक्षक / शिल्प संघटक / कार्यक्रम सहायक / मुख्य लिपिक | .. | एस-१३ | : | ३५४००-११२४०० | २७९ |
| ८ | वरिष्ठ लिपिक / सांख्यिकी सहायक / पर्यवेक्षक | .. | एस-८ | : | २५५००-८११०० | १२१ |
| ९ | कनिष्ठ लिपिक / वाहन चालक / ऑपरेटर | .. | एस-६ | : | १९९००-६३२०० | ११५ |
| | **गट-ड** | | | | | |
| १० | नाईक | .. | एस-३ | : | १६६००-५२४०० | १ |
| ११ | शिपाई | .. | एस-१ | : | १५०००-४७६०० | ७२ |
| | | | | | **एकूण** ... | **६९४** |

## प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - १

| अ.क्र. | पदनाम | | वेतन स्तर | | वेतन श्रेणी | पद संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | **गट-अ** | | | | | |
| १ | शिक्षण संचालक | .. | एस-२९ | : | १३११००-२१६६०० | ०१ |
| २ | शिक्षण सहसंचालक | .. | एस-२५ | : | ७८८००-२०९२०० | ०१ |
| ३ | शिक्षण उपसंचालक | .. | एस-२३ | : | ६७७००-२०८७०० | ०२ |
| ४ | प्रशासन अधिकारी | .. | एस-२० | : | ५६१००-५७७५०० | ०१ |
| | | | | | **एकूण ...** | **०५** |
| | **गट-ब** | | | | | |
| ५ | स्वीय सहायक | .. | एस-१५ | : | ४१८००-१३२३०० | ०१ |
| ६ | समन्वयक | .. | एस-२० | : | ५६१००-१७७५०० | ०१ |
| ७ | लेखाधिकारी | .. | एस-१६ | : | ४४९००-१४२४०० | ०१ |
| ८ | अधीक्षक (सा.रा.से.) गट ब | .. | एस-१४ | : | ३८६००-१२२८०० | ०१ |
| ९ | अधीक्षक (म.शि.से.) गट ब | .. | एस-१५ | : | ४१८००-१३२३०० | ०५ |
| १० | सांख्यिकी अधिकारी | .. | एस-१५ | : | ४१८००-१३२३०० | ०२ |
| | | | | | **एकूण ...** | **११** |
| | **गट-क** | | | | | |
| ११ | निम्नश्रेणी लघुलेखक | .. | एस-१४ | : | ३८६००-२२२८०० | ०२ |
| १२ | सहायक लेखाधिकारी | .. | एस-१५ | : | ४१८००-१३२३०० | ०१ |
| १३ | सहायक अधीक्षक | .. | एस-१४ | : | ३८६००-१२२८०० | ०२ |
| १४ | मुख्य लिपिक | .. | एस-१३ | : | ३५४००-११२४०० | १० |
| १५ | वरिष्ठ लिपिक | .. | एस-८ | : | २५५००-८११०० | २१ |
| १६ | कनिष्ठ लिपिक | .. | एस-६ | : | १९९००-६३२०० | २७ |
| १७ | संशोधन सहायक | .. | एस-१४ | : | ४१८००-१३२३०० | ०४ |
| १८ | विशेष शिक्षक | .. | एस-१३ | : | ३५४००-११२४०० | ०१ |
| १९ | लघुटंकलेखक | .. | एस-८ | : | २५५००-८११०० | ०१ |
| २० | वाहन चालक | .. | एस-६ | : | १९९००-६३२०० | ०६ |
| | | | | | **एकूण ...** | **७२** |
| | **गट-ड** | | | | | |
| २१ | शिपाई | .. | एस-१ | : | १५०००-४७६०० | १३ |
| २२ | नाईक | .. | एस-३ | : | १६६००-५२४०० | ०२ |
| | | | | | **एकूण ...** | **१५** |
| | | | | | **एकूण ...** | **१०३** |

**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय, दिनांक १७-१०-२०१६, दिनांक १३ जुलै २०१७ व दिनांक ७ डिसेंबर २०१८ नुसार परिषदेची व परिषदेच्या अधिनस्त कार्यालयांची पुनर्रचना करण्यात येऊन नव्याने निश्चित केलेल्या संरचनेनुसार पदांचा तपशील**

**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण, महाराष्ट्र, पुणे, प्रादेशिक विद्या प्राधिकरण, (सर्व) व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (सर्व)**

| अ. क्र. | पदनाम | | वेतनबँड (सहाव्या वेतन आयोगानुसार) | ग्रेड वेतन | पे मॅट्रिक्स (सातव्या वेतन आयोगानुसार) | पदाचा तपशील आवश्यक पदसंख्या | प्रत्यक्ष उपलब्ध पदसंख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **गट-अ** | | | | | | |
| १ | संचालक | .. | ३७४००-६७००० | ८९०० | एस-२९ : १३११००-२१६६०० | १ | १ |
| २ | सहसंचालक | .. | १५६००-३९१०० | ७६०० | एस-२५ : ७८८००-२०९२०० | २ | १ |
| ३ | प्राचार्य | .. | १५६००-३९१०० | ६६०० | एस-२३ : ६७७००-२०८७०० | ४३ | ४२ |
| ४ | वरिष्ठ अधिव्याख्याता/सहायक संचालक (प्रशासन)/प्रशासन अधिकारी (आस्थापना)/ सहायक संचालक (लेखा). | | १५६००-३९१०० | ५४०० | एस-२० : ५६१००-१७७५०० | १६४ | १६४ |
| | **गट-ब** | | | | | | |
| १ | कार्यक्रम अधिकारी (प्रशासन) / अधीक्षक (म.शि.से.) प्राध्यापक | .. | ९३००-३४८०० | ४८०० | एस-१७ : ४७६००-१५११०० | ८० | ७८ |
| २ | लेखाधिकारी / स्वीय सहायक | .. | ९३००-३४८०० | ४६०० | एस-१६ : ४४९००-१४२४०० | ०७ | ०२ |
| ३ | अधिव्याख्याता | .. | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ : ४१८००-१३२३०० | १९८ | १९८ |
| ४ | अधीक्षक (सा. रा. से.) | .. | ९३००-३४८०० | ४३०० | एस-१४ : ३८६००-१२२८०० | ३८ | ३८ |
| | **गट-क** | | | | | | |
| १ | विषय सहायक / समुपदेशक | .. | ९३००-३४८०० | ४४०० | एस-१५ : ४१८००-१३२३०० | ५९५ | १५० |
| २ | कार्यशाळा सहायक / लघुलेखक (निम्नश्रेणी) सहायक अधीक्षक/ग्रंथपाल | .. | ९३००-३४८०० | ४३०० | एस-१४ : ३८६००-१२२८०० | ७१ | ७१ |
| ३ | तंत्रज्ञ/लेखापाल/मुख्य लिपिक | .. | ९३००-३४८०० | ४२०० | एस-१३ : ३५४००-११२४०० | ७१ | ७१ |
| ४ | सांख्यिकी सहायक / ग्रंथपाल | .. | ५२००-२०२०० | २८०० | एस-१० : २९२००-९२३०० | ६९ | ६९ |
| ५ | वरिष्ठ लिपिक | .. | ५२००-२०२०० | २४०० | एस-८ : २५५००-८११०० | १६ | १५ |
| ६ | सहायक ग्रंथपाल | | ५२००-२०२०० | २००० | एस-७ : २१७००-६९१०० | १ | १ |
| ७ | कनिष्ठ लिपिक / वाहनचालक | .. | ५२००-२०२०० | १९०० | एस-६ : १९९००-६३२०० | १०६ | १०६ |
| | **गट-ड** | | | | | | |
| १ | नाईक | .. | ४४००-७४४० | १६०० | एस-३ : १६६००-५२४०० | ४ | ४ |
| २ | शिपाई | .. | ४४४०-७४४० | १३०० | एस-१ : १५०००-४७६०० | ११४ | ११४ |
| | | | | | **एकूण ..** | **१५८०** | **११२५** |

**टीपा.--**(१) शासन निर्णय, दि. १७ ऑक्टोबर २०१६ अन्वये परिषदेची व अधिनस्त कार्यालयांची पुनर्रचना करण्यात आलेली आहे. पुनर्रचने अंतर्गत परिषदेची व परिषदेच्या अधिनस्त कार्यालयातील पदांची संरचना नव्याने निश्चित केली आहे. यामध्ये काही पदे ही नव्याने आवश्यक ठरविण्यात आलेली आहेत. तर मूळ आकृतीबंधातील काही पदांची आवश्यकता राहिलेली नसल्याने अशी पदे कमी करण्यात आलेली आहेत.

(२) पुनर्रचनेअंतर्गत जी पदे नव्याने निश्चित करण्यात आलेली आहेत त्यापैकी जी पदे समकक्ष स्तरावर उपलब्ध आहेत, अशी पदे शासन निर्णय, दि. ३१ जुलै २०१७ व दि. ७ डिसेंबर २०१८ अन्वये समान वेतनश्रेणीमध्ये उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत.

(३) शासन निर्णय, दि. २३ ऑगस्ट २०१८ अन्वये (१) शैक्षणिक तंत्रज्ञान कक्ष, वरळी, मुंबई, (२) महाराष्ट्र राज्य, दृकश्रवण संस्था, (३) व्यवसाय मार्गदर्शन व निवड संस्था (एकूण ७) अशा एकूण ९ संस्थांचे विलिनीकरण करण्यात आलेले आहे.

(४) शासन निर्णय, दि. १७ ऑक्टोबर २०१६ अन्वये जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्थेमध्ये विषय सहायक पदांची नव्याने आवश्यकता निश्चित केलेली आहे.

(५) परिषदेतील व अधिनस्त कार्यालयातील शासन निर्णय, दिनांक १७ ऑक्टोबर २०१६ अन्वये नव्याने आवश्यक ठरविण्यात आलेली एकूण पदे ही सुधारित आकृतीबंधासाठी प्रस्तावित करण्यात आलेली आहेत. सध्या शासन स्तरावरुन सुधारित आकृतीबंध अंतिम करण्याचे काम सुरू असून अद्याप अंतिम झालेला नाही. सबब वरील पदांमध्ये बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## कर्मचारीवर्गाचा गोषवारा

| अ. क्र. | पदनाम | | वेतन स्तर | सातवा वेतन आयोग | संख्या |
|---|---|---|---|---|---|
| | **महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ** | | | | |
| | **गट-अ राजपत्रित** | | | | |
| १ | अध्यक्ष | .. | एस-२९ : | १३११००-२१६६०० | ०१ |
| २ | विभागीय अध्यक्ष | .. | एस-२५ : | ७८८००-२०९२०० | ०९ |
| ३ | सचिव | .. | एस-२३ : | ६७७००-२०८७०० | ०१ |
| ४ | सहसचिव (राज्य) | .. | एस-२० : | ५६१००-१७७५०० | ०१ |
| ५ | विभागीय सचिव | .. | एस-२३ : | ६७७००-२०८७०० | ०९ |
| ६ | विभागीय सहसचिव | .. | एस-२० : | ५६१००-१७७५०० | ०९ |
| | **गट-ब** | | | | |
| १ | सहायक सचिव | .. | एस-१७ : | ४७६००-१५११०० | ०१ |
| २ | विभागीय सहायक सचिव | .. | एस-१७ : | ४७६००-१५११०० | ०९ |
| | | | | **एकूण ..** | **४०** |
| | **महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे - १** | | | | |
| | **गट-अ राजपत्रित** | | | | |
| १ | अध्यक्ष | .. | एस-२९ : | १३११००-२१६६०० | ०१ |
| २ | आयुक्त | .. | एस-२५ : | ७८८००-२०९२०० | ०१ |
| ३ | उपआयुक्त | .. | एस-२३ : | ६७७००-२०८७०० | ०२ |
| ४ | सहायक आयुक्त | .. | एस-२० : | ५६१००-१७७५०० | ०४ |
| ५ | प्रशासन अधिकारी | .. | एस-२० : | ५६१००-१७७५०० | ०१ |
| | | | | **एकूण ..** | **०९** |
| **गट-ब राजपत्रित** | | | | | |
| ६ | अधीक्षक / सहायक वाणिज्य शाळा निरीक्षक / कार्यक्रम संयोजक अधिकारी. | .. | एस-१७ : | ४७६००-१५११०० | १३ |
| ७ | लेखाधिकारी | .. | एस-१६ : | ४४९००-१४२४०० | ०१ |
| | | | | **एकूण ..** | **१४** |
| | | | | **एकूण गट अ + गट ब ..** | **२३** |

## कर्मचारीवर्गाचा गोषवारा

### (शासन निर्णय क्रमांक एनसीसी-२०११/प्र.क्र. १५/क्रीयुसे-३, दिनांक २० सप्टेंबर २०११ सोबतचे सहपत्र)
### राष्ट्रीय छात्रसेनेअंतर्गत नवीन आकृतीबंधानुसार पदांचा तपशील

| अ. क्र. | पदाचे नाव | वेतनश्रेणी वेतन स्तर व मूळ वेतन | | सध्याची मंजूर पदसंख्या | नवीन आकृतीबंधानुसार मंजूर पदसंख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | अधीक्षक .. | एस-१४ : | ३८६००-१२२८०० | ०७ | ०७ |
| २ | लघुलेखक (उच्चश्रेणी) .. | एस-१५ : | ४१८००-१३२३०० | ०६ | ०६ |
| ३ | मुख्य लिपिक .. | एस-१३ : | ३५४००-११२४०० | ५९ | ५२ |
| ४ | लेखा लिपिक .. | एस-८ : | २५५००-८११०० | ४६ | ४६ |
| ५ | वरिष्ठ लिपिक .. | एस-८ : | २५५००-८११०० | १३९ | १३९ |
| ६ | कनिष्ठ लिपिक .. | एस-६ : | १९९००-६३२०० | १६२ | १५२ |
| ७ | वाहन चालक .. | एस-६ : | १९९००-६३२०० | १५३ | १४० |
| ८ | हवाई प्रतिमान निदेशक .. | एस-१३ : | ३५४००-११२४०० | ३ | ३ |
| ९ | नौका वाहन निदेशक .. | एस-१३ : | ३५४००-११२४०० | ४ | ४ |
| १० | लष्कर .. | एस-३ : | १६६००-५२४०० | २६४ | २५४ |
| ११ | शिपाई .. | एस-१ : | १५०००-४७६०० | ८४ | ७५ |
| १२ | चौकीदार .. | एस-१ : | १५०००-४७६०० | ६४ | ६४ |
| १३ | सफाई कामगार .. | एस-१ : | १५०००-४७६०० | ६० | ५३ |
| १४ | बोट-किपर .. | एस-३ : | १६६००-५२४०० | ०७ | ०७ |
| १५ | सॅडरल .. | एस-१ : | १५०००-४७६०० | ०१ | ०१ |
| १६ | फेरीअर .. | एस-१ : | १५०००-४७६०० | ०१ | ०१ |
| १७ | उदवाहक .. | एस-३ : | १६६००-५२४०० | ०२ | ०२ |
| १८ | वाहनचालक (बाह्यस्त्रोताद्वारे) .. | | | | ०४ |
| १९ | शिपाई (बाह्यस्त्रोताद्वारे) .. | | | | ०२ |
| २० | चौकीदार (बाह्यस्त्रोताद्वारे) .. | | | | ०२ |
| २१ | सफाई कामगार (बाह्यस्त्रोताद्वारे) .. | | | | ०२ |
| | **एकूण पदे** .. | | | **१०६२** | **१०१६** |

**कर्मचारीवर्गाचा गोषवारा**--चालू

**(शासन निर्णय क्रमांक भास्कागा-१११ १/प्र.क्र. ८२/क्रीयुसे-३, दिनांक २० सप्टेंबर २०११ सोबतचे सहपत्र)**

**महाराष्ट्र राज्य भारत स्काऊटस् आणि गाईडस् संस्थेच्या आस्थापनेवरील सध्या मंजूर असलेली व नव्याने मंजूर केलेल्या पदांचा तपशील**

| अ. क्र. | पदाचे नाव | वेतनश्रेणी वेतन स्तर व मूळ वेतन | सध्याची मंजूर पदसंख्या | नव्याने मंजूर केलेली पदसंख्या | नवीन आकृतीबंधानुसार मंजूर पदसंख्या (रकाना ४ + ५) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | राज्य चिटणीस .. | एस-१५ : ४१८००-१३२३०० | १ | ० | १ |
| २ | राज्य सहचिटणीस .. | एस-१५ : ४१८००-१३२३०० | ० | १ | १ |
| ३ | राज्य संघटन आयुक्त (स्काऊट) .. | एस-१४ : ३८६००-१२२८०० | १ | ० | १ |
| ४ | राज्य संघटन आयुक्त (गाईड) .. | एस-१४ : ३८६००-१२२८०० | १ | ० | १ |
| ५ | सहायक राज्य चिटणीस .. | एस-१३ : ३५४००-११२४०० | २ | ० | २ |
| ६ | राज्य प्रशिक्षण आयुक्त (स्काऊट) .. | एस-१४ : ३८६००-१२२८०० | ० | १ | १ |
| ७ | राज्य प्रशिक्षण आयुक्त (गाईड) .. | एस-१४ : ३८६००-१२२८०० | ० | १ | १ |
| ८ | सहायक राज्य संघटन आयुक्त .. | एस-१३ : ३५४००-११२४०० | १ | १ | २ |
| ९ | सहायक राज्य प्रशिक्षण आयुक्त .. | एस-१३ : ३५४००-११२४०० | ० | २ | २ |
| १० | स्थापत्य अभियंता .. | एस-१३ : ३५४००-११२४०० | ० | १ | १ |
| ११ | अधीक्षक .. | एस-१३ : ३५४००-११२४०० | ० | १ | १ |
| १२ | जनसंपर्क अधिकारी .. | एस-१३ : ३५४००-११२४०० | ० | १ | १ |
| १३ | लेखापाल .. | एस-१३ : ३५४००-११२४०० | ० | १ | १ |
| १४ | लघुलेखक .. | एस-१४ : ३८६००-१२२८०० | ० | २ | २ |
| १५ | जिल्हा संघटक (स्काऊट/गाईड) .. | एस-१० : २९२००-९२३०० | ३९ | ३५ | ७४ |
| १६ | सहायक लेखापाल .. | एस-८ : २५५००-८११०० | १ | ० | १ |
| १७ | रोखपाल .. | एस-८ : २५५००-८११०० | १ | ० | १ |
| १८ | वरिष्ठ लिपिक .. | एस-८ : २५५००-८११०० | ० | १९ | १९ |
| १९ | टंकलेखक .. | एस-७ : २१७००-६९१०० | ५ | ० | ५ |
| २० | कनिष्ठ लिपिक .. | एस-६ : १९९००-६३२०० | ५० | २७ | ७७ |
| २१ | वाहन चालक .. | एस-६ : १९९००-६३२०० | ० | १ | १ |
| २२ | नाईक .. | एस-३ : १६६००-५२४०० | २ | ४ | ६ |
| २३ | चौकीदार .. | एस-१ : १५०००-४७६०० | ९ | ७ | १६ |
| २४ | शिपाई .. | एस-१ : १५०००-४७६०० | ३१ | ४० | ७१ |
| २५ | शिपाई (कंत्राटी पद्धतीने) .. | ७५०० | ८ | ० | ८ |
| | **एकूण पदे** .. | | **१५२** | **१४५** | **२९७** |

येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे ४११ ००६